भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथम

पुणें नगर संशोधन वृत्त
खंड २ रा

BHĀRAT ITIHĀS SANSHODHAKA MANDAL
Quarterly 1943 July [24-1]

(93)

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष २४ वें] त्रैमासिक [अंक १ ला

(९३)

१८६५ आषाढ

किंमत १॥ रुपया

हें त्रैमासिक मुंबई इलाख्यांतील प्राथमिक व दुय्यम शाळा आणि शैक्षणिक(Training)संस्था व मध्यप्रांतांतील हायस्कुलें व नॉर्मल् स्कुलें व सिंध यांसाठीं मंजूर आहे.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. हं. वगैरे निराळें. फुटकळ अंक १॥ रुपया
Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. Re. 1-8

Printed by Mr. Vithal Hari Barve at the Aryabhushan Press, House No. 915/1 Shivaji-Nagar Poona City and published by Sardar Gangadharrao Narayanrao Mujumdar, C.I.E., Mr. C. G. Karve, and Prof. C. B. Joshi, at 313A Sadashiv Peth, Poona 2, India.

ई।१६८

संपादकीय प्रस्ताव

पुणें-नगर-संशोधन वृत्ताचा हा **दुसरा खंड** मागील खंडानंतर एक वर्षानें निघत आहे. भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकाच्या द्वारेंच हा पुन्हां काढावा लागतो आहे. स्वतंत्रपणें काढण्याचा खर्च मंडळास तूर्त झेपणार नाहीं. शिवाय मंडळाचें इतर महत्त्वाचें प्रकाशन आर्थिक अडचणीमुळें पडून आहे. अशा नगर-संशोधन-कार्याला सरकार व नगरपालिका यांचेंच भरीव साहाय्य पाहिजे. विशेषतः नगर-पालिकेच्या आवश्यक कार्यांत हें येतें; एरवीं तिची सुधारणा व प्रगति झाली असें म्हणतां यावयाचें नाहीं.

पहिला खंड निघाल्यानंतर सर्वांनीं त्याचें स्वागत केलें व ही नगरसंशोधनाची नवी प्रथा इतर नगरांना अनुकरणीय आहे असें सिद्ध झालें. या खंडांत संशोधनाच्या ज्या दिशा दाखवून दिल्या होत्या त्या पुष्कळांना उपयुक्त वाटल्या व अशा संशोधनाची आवड समाजांत उत्पन्न करण्याच्या कामीं मंडळाला कांहीं यश आलें.

प्रस्तुत खंडांत पहिल्या खंडापेक्षां निराळें धोरण ठेवलें आहे. या खंडांतील माहिती बहुतेक अस्सल, कोठें न प्रसिद्ध झालेल्या कागदांवरून घेतलेली आहे. कांहीं चांगल्या माहितगारांकडून मिळविली आहे; तीहि नवीनच आहे. ही सर्व माहिती १ पुणें-सामान्य; २ पुणें-घराणीं; ३ पुणें-पेठा; ४ पुणें-देवळें व मठ; ५ पुणें-बागा व पूल; ६ पुणें-वाडे व ७ पुण्याचा कारभार अशा प्रकरणांतून मांडिली आहे.

पुण्याच्या प्राचीन निशाण्या व जमीन मोजणीचे उतारे फार महत्त्वाचे आहेत. घरपट्टी-माफीच्या यादीवरून पेशवाई कारभारांत यासंबंधीं कोणतें धोरण असे हें कळून येणार आहे. आज दुर्लक्ष करण्यांत येणारा शिराळशेट त्या काळीं केवढी माना-पानाची बाब होऊन बसली होती!

घराण्यांच्या माहितींत तुळशीबागवाले व गोविंद हरि जोशी यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. तुळशीबागवाले तर अद्यापि प्रसिद्ध घराणें आहे. गोविंद हरि जोशी यांचे वृद्ध वंशज श्री. लक्ष्मण नारायण जोशी यांची माहिती जुने कादंबरी-नाटककार, निबंध-चरित्रकार व श्रौतस्मार्त वाङ्मयाचे अभ्यासी म्हणून पुष्कळांना आहे. ते आतां फार थकले आहेत, पण त्यांची स्मरणशक्ति दांडगी असून त्यांच्या-जवळ जुन्या गोष्टींचा मोठा सांठा आहे. जुनें पेशवाई पुणें ते हुबेहूब डोळ्यांपुढें उभें करतात.

पेठांमध्यें रास्ता, मंगळवार यांची जुनी खानेसुमारी आहे. पेठांचे वसूल किती येत हेंहि कळून येईल. गुरुवार पेठेची कितीतरी माहिती तुळशीबागवाले दप्तरांतून निवडून काढली आहे. पण ती येथें देतां आली नाहीं.

खुन्या मुरलीधर, कृष्णेश्वर व काशीकर राममंदिर ह्याविषयीं नवीन माहिती श्री. ल. ना. जोशी यांनींच दिली आहे. तांबड्या जोगेश्वरीचे पूजारी श्री. बेंद्रे यांचे फारसी कागद प्रथमच छापले आहेत. वसंतबाग व राधाबाईचा बाग या नव्यानेंच पुढें येत आहेत. वाड्यांमध्यें राजेबहादुरांच्या वाड्याचा शोध नवीन व महत्त्वाचा आहे.

शेवटीं पुणें म्युनिसिपालिटी स्थापन होण्यापूर्वींचा पुण्याचा कारभार जो संकलित दिला आहे तो इतिहास–अर्थशास्त्र–राजकारण या विषयांच्या संशोधकांस उपयुक्त वाटेल. एखाद्या शहराचा एकंदर कारभार पूर्वीं कसा चाले यासंबंधीं एकत्र माहिती कोठें फारशी नाहीं. पुणें नगरपालिकेनें नगरपालिका स्थापली गेल्यापासूनचा अर्वाचीन इतिहास आपल्या जवळच्या कागदपत्रांतून कसा तरी तयार केला आहे. त्या ग्रंथाचा पूर्वभाग म्हणून अशी माहिती देण्यास प्रस्तुत संपादकास सांगितलें; त्याप्रमाणें अनेक ग्रंथांवरून–टांचणांवरून ही माहिती काढली. पण पुढें आपल्या ग्रंथांत ती एकत्र न देण्याचें नगरपालिकेनें जेव्हां ठरविलें तेव्हां गेल्या संमेलनापुढें ती मांडून प्रस्तुत खंडांत तिचा अंतर्भाव केला. नगर संशोधनाच्या मर्यादा या लेखावरून कळून येणार आहेत.

पहिल्याप्रमाणें हाहि खंड इतिहाससाहित्यांत भर घालील अशी खात्री बाळगतों.

टीपः–पहिल्या खंडाला **सूची** नव्हती. तेव्हां दोन्ही खंडांची विषय व व्यक्ति-स्थलनाम **सूची** मंडळांतील संशोधक श्री. शं. ना. जोशी यांनीं तयार करून प्रस्तुत खंडाला जोडली आहे.

ई।१५

पुणें-नगरसंशोधनवृत्त-खंड २

अनुक्रमणिका

विषय-सूची

पुणें नगर संशोधनवृत्त

खंड २ रा

1 पुणें सामान्य—

८०

पुण्यांतील प्राचीन निशाण्या

१ खुद्द पुणें शहराबाबत व्हावें तसें संशोधन आपण केलेलें नाहीं. तिकडे अधिक लक्ष देणें अवश्य आहे. पुणें शहराबाबत अगदीं प्राचीन निशाण्या काय आढळतात त्या पहाण्याचें येथें योजिलें आहे. सांप्रतच्या नगरपरिसरांत सर्वांत प्राचीन निशाण्या म्हणजे येथें सापडणारीं **लेणीं**. हीं तीन आहेत:—

(१) वेताळाच्या टेकडीच्या मागें (फर्गसन् कॉलेज पलीकडे) डोंगराच्या मध्यावर छोटें एक;

(२) पर्वतीच्या पायथ्याशीं डावे बाजूचे डोंगरतळाला एक; आणि

(३) जंगली महाराजजवळचें पाताळेश्वर म्हणून प्रसिद्ध असलेलें हें तिसरें.

पैकीं शेवटच्या म्हणजे पाताळेश्वर लेण्यावर लेख आहे तो अस्पष्ट आहे.

या तिन्ही लेण्यांपैकीं पाताळेश्वराच्या लेण्यांतच कांहीं शिल्प आहे. फर्गसन टेकडीजवळील लेणीं हें एक विवरच आहे आणि पर्वती लेणीं हें पाण्याचें तळें झालेलें आहे. पाताळेश्वर लेण्यांतील शिल्पावरून तें पुष्कळ प्राचीन–कदाचित् ख्रिस्तारंभींचें–असावें असें वाटतें. डॉ. केतकर यांचेंहि मत असेंच असावें असें वाटतें.

यानंतरची प्राचीन निशाणी आढळली ती म्हणजे यादव–चालुक्य–राष्ट्रकूटादिकांच्या वेळच्या पैकीं '**पूनक**' विषयाचा उल्लेख, कृष्णराज राष्ट्रकूटाच्या ताम्रपटांत आलेला याच मंडळानें प्रसिद्ध केला आहे.

त्याच्यापुढें नागेश्वर या देवळाचा उल्लेख, नामदेवाच्याहि वेळीं प्राचीन म्हणून सापडतो हें मीं मागें एका टाचणांत मंडळापुढें दाखविलें आहे (आळंदीची पंचक्रोशी मं. इ. वृत्त १८३४ पृ. ३०४.)

तसेंच पुणेश्वर आणि नारायणेश्वर हीं देवळें उध्वस्त झालेलीं असून सांप्रत तेथें दर्गे झालेले आहेत. या दर्ग्यांचें नीट निरीक्षण केलें असतां तेथें ह्या मंदिराच्या प्राचीन निशाण्या आढळून येतात. परंतु त्यांचा यथोचित परामर्ष अद्यापि कोणीं घेतला

नाहीं. या मंदिराचे कांहीं अवशेष तेथें परिसरांत अजूनहि दिसतात आणि तिकडे लक्ष्य वेधणें हें या टांचणाचें मुख्य लक्ष्य आहे.

सांप्रत नदीवर जो शेकसह्या किंवा लॉइड् पूल बांधण्यांत आला आहे त्याच्या डाव्या अंगास आपण जाल तर तेथें प्राचीन

यादवकालीन घाटाचा अवशेष

स्पष्ट दिसतो. हा प्राचीन घाट विशेष बांधणीचा असतो. ती बांधणी कोचदार असते.



अशा बांधणीचे घाट विंगास आहेत, नेवाशास हि आहेत त्यावरून हें म्हणणें चट्दिशीं पटेल. याच पुण्याच्या घाटावर अद्यापिहि कांहीं **नक्षीदार शिल्पाचे अवशेष** आहेत. एका तुकड्यावर बहुधा एक **जैन अवशेष असावा** असा संशय मला येतो. आणखीहि कांहीं नकशीचे तुकडे इकडेतिकडे तेथें दिसतात. शिवाय तेथेंच आवारांत मूर्तिहि पुरलेल्या आढळांत आल्याचें ऐकिवांत आहे.

दुर्ग्यांचे आवारांतहि असे आणखी अवशेष आहेत. त्यांचीं चित्रें वगैरे केलीं गेलीं पाहिजेत आणि काजीसाहेबांच्या सहानुभूतीमुळें ही इच्छा पूर्ण होईल अशी आशा आहे.

तिसरी निशाणी जुन्या घरांचे, तटांचे **भिंतीचे पाये.** हे अजूनहि कोठें कोठें दिसतात. या वेळच्या या भिंतीचे दगड विशेष रुंद, चौकोनी, आतां पिवळसर झालेले असे ओळखतां येतात. असे पाये कसब्यांत बऱ्याच जागीं आढळतात.

चवथी निशाणी–**वीरगळ**

हे दगड आज तीन उपलब्ध झाले आहेत.

१ कासार देवीपाशीं फुटका–

२ पेठे–वाड्यांचे आवारांत आढळला, सांप्रत रा. दंडवते वकील यांचे रुपेनें मंडळांत आणला आहे.

३ शितोळे–वाड्याजवळचा, मंडळांत श्रीमंत शितोळे साहेब राजराजेंद्र यांनीं दाखल केला आहे.

कसबा गणपतीचे आसपास दोन तीन प्राचीन स्तंभांचे अवशेष मोकळेच पडलेले आहेत. ते मंडळाच्या संग्रहांत दाखल होणें अवश्य आहे. हे प्राचीन स्तंभ जिजाबाईसाहेबांच्या वेळेपूर्वीच्या कसबा गणपतीच्या किंवा केदारेश्वर देवळाचे असावे. येथें उत्खनन झालें पाहिजे.

उत्खनन

पूर्वी पुलाचे उजवे अंगास ड्रेनेजसाठीं खणणें झालें असतां ११ व्या शतकांतील **जैन मूर्ति** सांपडल्याचें प्रसिद्ध झालें होतें.

या दृष्टीनें उत्खनन केलें असतां पुष्कळ अवशेष–घाट, मूर्ति वगैरे सांपडतील.

हें उत्खनन नदीच्या कांठानें कसब्यांतील बाजूला **ज्या दरडी दिसतात तेथें** झालें पाहिजे. आगरवाल्यांच्या घराजवळील

बाळोबाच्या पारा भोंवतीं

सतीच्या दगडांचे फुटलेले तुकडे बरेच पडलेले होते. परंतु आतां पहावें तों तेथें कच्चा ओटा कोणी बांधून काढून ते अवशेष गाडून टाकले आहेत.

ही अज्ञानी गाडागाडी

कायद्याचा अंमल होऊन बंद झाली पाहिजे. पुढल्या मराठशाहींतले अवशेषहि आज बेदरकारपणानें नष्ट होऊं दिले जात आहेत तेथें प्राचीन अवशेषांची काळजी करतो कोण !

शहर म्युनिसिपालिटी, पुराणवस्तुसंरक्षणखातें, संशोधक, आपलें मंडळ व विद्वान् यांनीं इकडे लक्ष्य पुरवावें अशी विनंती आहे.

८१

पुण्याची जमीन मोजणी

ह्या मोजणीच्या तीन यादी श. १७०८,१७१३ व १७१६ मधील मिळाल्या आहेत. त्या *२।१।३ अशा पुढें दिल्या आहेत. ह्यांतील मजकूर सामान्यतः एकच असला तरी प्रत्येकांत थोडें अंतर आहे व तपशील कमी अधिक आहे; तुलनेनें हें सर्व सांगावयाचें पण प्रस्तुत यादीच पुढें मांडिल्या आहेत.

(नकल) श्री { श. १७१३ / इ. १७९१ }

यादी हिशेब जमीन जुमला निा मालिकम पुणें सुा इसने तिसेन मया व अलफ सन १२०१ जमाकास ——————————— टके ७॥१

पैकीं वजा कास टके

---

* कागदाच्या दुर्मिळतेमुळें मूळ कागदांतील एकाखालीं व पोटांत असलेला तपशील येथें डॅश काढून व स्वल्पविराम देऊन दाखविला आहे.

१०६॥ इनाम–१०४ कदीम–॥। **पीर शेकसल्ला,** ०४ **पीर इसाक मुदीन**
०८ विठोजी नाईक शितोळे देशमूख हल्लीं वस्ती भवानी पेठ=१०४
०२॥ जदीद कारकीर्द श्रीमंत राजे पंतप्रधान रुके–०॥. **कबीरबावा** थळ वैद पैकीं, ०२ रा. बापूजी आनंदराव कमाविसादर थळ रायचूर ०२॥=१०६॥

।३ कुरण नदी किनारे बेट नजीक संगम. हल्लीं बाग पेठे यांजकडे

॥४ नदी धुपण–०२ थळ दुगाणा, ०९ थळ झेडाळा, ।३ थळ लुकण, ०२ थळ पारखी=॥४

१॥६॥ वसाहत–॥६ बागाईतपैकीं–०६ मोहोतफ्यांकडे, ॥. मुजेरीकडे=॥६

१०।. कोक अलीकडे वस्ती झाली ते जमीन रुके–।. पेठ शहापूर ऊर्फ सोमवार कदीम खेरीज वस्ती झाली ते ०६ लुकण पैकीं, ०६ थळ झेडाला पैकीं=।. ।४ पेठ शनवार थळ **गाय उतार** येथें बाबूजी नाईक यांनीं वस्ती केली व श्री **ओंकारेश्वराचे देवालय** वगैरे, ०९ पेठ आस्तापूर ऊर्फ मंगळवार रुके ।६ पैकीं दुमाल्यांत मजुरा रुके ०९ बाकी लडकजाबद्धल टके, ०४ न्याहाल पेठ रुके ।१ पैकीं दुमाले मजुरा रुके ०९ बाकी थल पासऱ्या पैकीं रुके,–०१॥ भवानी पेठचे वस्तीस जमीन–०१॥ थळ रायचूर पैकीं–०॥. लडकजाबद्धल, ०१ पाढऱ्या पैकीं=०१॥
०।. थळ बारेबाज पैकीं=०१॥

०४ **संगमेश्वराचे देवालय** वगैरे पडजमीन थल दुगाणापैकीं, ०॥ थल वईद पैकीं वस्ती हलालखोराची होती हल्लीं हणवंत पेटकडे, ०१ गंजी गवताच्या रा. रामचंद्र नारायण सुभेदार थळ पाढरापैकीं रुके.–१०।

०॥ मनसाराम सावकार याचे बागाखाली थळ रायचूर–०। लडकजपैकीं, ०। कुळकर्णी ०॥.–१॥६॥—३॥८।

बाकी जमीनकास टके ३॥४॥ ⌣—— रुपये

३८९॥ दुमाले जमीन रुके ⌣– रुपये, १८८। बागाखाली रुके ।३॥ ⌣– रुपये, ७॥ राघोबा आचार्या थळ दागलपैकीं रुके ०३ रुपये, २५ कडकोबा परभू थळ रायचूरपैकीं रुके ०२॥–रुपये, ४८ महीपंतराव चिटणीस थळ वैदपैकीं हल्लीं वस्ती पेठ शिवपुरीं रुके ०२॥ ⌣– रुपये, ९ रा. तुकोजी होळकर यास थळ दुगाणापैकीं हल्लीं दलपतगीराकडे रुके ०३ ⌣– रुपये, ४६॥ रा. आबा मजुमदार यास थळ बारेबाज-पैकीं हल्लीं वस्ती पेठ हणवंत रुके ०१॥ ⌣– रुपये, ३२ मोरो बल्लाळ जोशी थळ वैदपैकीं हल्ली वस्ती शिवपुरी रुका ०१, २०.**महादोबा देव** थळ वैदपैकीं रुका ०१ रुपये ।३॥=१८८।

६१॥ ज्याचे त्याजकडे वहितीस आहेत ते रुके ०१०॥ ⌣– रुपये, १२६॥ वस्ती जाली–८० पेठ शिवपुरीं निशाणी रा. लक्ष्मणराव रास्ते रुके ०३॥ ⌣– रुपये,

४६॥ हणवंत पेठ निा रा. नाना फडणीस रुके ०१॥ मजमदारबद्दल ‿– रुपये, १२६॥=१८८।

२०१॥ वसाहतीखालीं जमीन रुके ‿– रुपये, १८ न्याहाल पेठ वस्ती रुके ·।१ पैकीं जमीन खर्च रुके ०४ बाकी थळ पारखी रुके ०९ ‿– रुपये, ४५ मंगळवार रुके ·।६ पैकीं जमीन खर्च रुके ०९ बाकी थळ दुगाणापैकीं रुके ०९ ‿– रुपये, ३९ गणेश पेठ खासगीकडील थळ ढोले बागाइती रुके ·।· ‿– रुपये, ६ **गोसावी याचे वाडे** झाले ते थळ दुगाणापैकीं रुके ०१ ‿– रुपये, ४०॥ पेठ शिवपुरी नि॥ रा. लक्षुमणराव रास्ते ३६ थळ वईदपैकीं ०३॥, ११ पारखी याजबद्दल ०२, ११ ताम्हणी याबद्दल ०१, ८ वैदाबद्दल ०॥··३॥-३६, ४॥ थळ रायचूर ०॥, ३ ढुमण्याबद्दल ०॥·, १॥ पाहाडाबद्दल ०।·–०॥।·=४॥=४०॥, ७॥ मौजे **बानवडी येथून रास्ते यानी नळ आणला** त्याचे वदाळीमुळें चुन्याच्या भट्या व चाकें चुन्याचीं वगैरे रुके ०१।, ३९॥ श्रीमंत राजेश्री बाळाजी जनार्दन फडणीस यानी पेठ वसविली तिजखालीं जमीन रुके ०९ पैकीं वजा मजमदार याजबद्दल खर्चपडली रुके ०१॥ बाकी रुके ०३। एकूण रुपये,–७॥ लडकताबद्दल दाळी बन रुका ०१। एकूण रुपये, ६ ढोल्याबद्दल दाळिंबन रुका ०१ एकूण रुपये, ६ पाहाडाबद्दल रायचूर रुका ०१ ए. रुपये, २० विहीर हुडा विहिरी एकूण ३।=३९॥

६ हलालखोरास वस्तीस जागा साल मजकुरीं दिली थळ दुगाणा जमीन दरवड्याबद्दल व दुगाण्याबद्दल रुका ०१–॥४॥–९०८॥–२०१॥=३८९॥।·

३५६॥ सालगुदस्तपावेतों ३३ सालगुदस्ता–३८९॥

६६२॥ रयत निसबत जमीन रुके २॥८। ‿– रुपये

५२३॥ वाहाती रुके १॥३। ‿– रुपये,४६३॥ जिराईत रुके १॥५।–दर रुका रु. ६ प्रमाणें, ६० बागाईत रुके ०१० दर रुका रु. ६ प्रमाणें=१॥३।—५२३॥

११९ उस्ती जमीन रुके ·॥५ ‿–, २० विहीर हुंडा विहिरी खुकट ४ जमीन रुके २॥८॥–६६२॥·।=१०५२।·

पैकीं वजा रुपये

२५९।· गांवखर्च व हकदार सालगुदस्तप्रमाणें सालमजकुरीं

२०४ खासा स्वारी कृष्णा स्नानास जातां भाद्रपद मासीं मुकाम झाला असतां तळाखालीं जमीन गेली बाा पहाणी छ ७ मोहरम रुके ·॥१० दर रुका रु. ६ प्रमाणें–४६३।·

बाकी ५८९ रुपये पांचसे एकूणनव्वद रुपये करार करावे

(नकल) { श. १७०८ / इ. १७८६

श्री

यादी हिशेब जमीन जुमला निा मालिकम पुणें सुा सबा समानिन मया व अलफ सन ११९६ जमा कास

टके

पैकीं वजा जमीन टके ७॥१

१०६॥ इनाम–१०४ कदीम–॥४**पीर शेखसला,** ०४ **पीर इसाक मुदीन,** ०८ विठोजी–देशमुख=१०४

०२॥ जदीद कारकीर्द श्रीमंत राजश्री पंतप्रधान–०॥ **कबीरबाबा** हल्लींवस्ती शिवपुरीं, ०२ बापुजी अनंदराव ०२॥=१०६॥

·।३ कुरण नदी किनारे बेट नजीक संगम, ·॥४ नदी धुपण जमीन बागाइत रुके १॥६। वसाहात–॥६ कदीम–०६ निा मोहतर्फा, ·॥· निा मुजेरी=·॥६

१०। कारकीर्द श्रीमंत पंतप्रधान–·। पेठ शहापुर ऊर्फ सोमवार कडील या खेरीज पेठ मंगळवारचे वस्ती जमीन उत्तरेकडे व पूर्वेस, ·।४ पेठ मोचुंदाबाद ऊर्फ शनवार, ०९ पेठ अस्तापूर ऊर्फ मंगळवार रुके ·।६ पैकीं मजुरा येतात रुके ०९ बाकी सदरहु रुके, ०४ न्याहाल पेठ रुके ·।१ पैकीं मजुरा रुके ०९ बाकी सदरहु, ०१॥ भवानी पेठचे वाा (वस्ती) वगैरे ०३॥ थळ रायचूर ०। बारेबाज पैकीं=०१॥।

०४ **संगमेश्वराचे देवालय व मसणवाट** वगैरे पड जमीन. ०॥ वाा (वस्ती) हलालखोर ०१ मंजी गवताची रा. नारो आप्पाजी=१०।=१॥६।

०॥ बाग जदीद मनसाराम सावकार कुलकर्णी व गोहाड व लडकजपैकीं ३॥८। बाकी जमीन टके ३॥।४॥

तपशील

जिराईत टके २॥१॥

बागाइत टके १०५

∪——आकार——————————रुपये

३०७। दुमाला नजीक सालाबाद मजुरा येती–१९९ वसाहत ·॥११॥·– १८ न्याहाल पेठ रुके ·।१ पैकीं मजुरा येत नाहीं रुके ०९ बाकी सदरहु पारखी, ४५ पेठ मंगळवार रुके ·।६ पैकीं मजुरा येत नाहीं ०९ बाकी सदरहु, ३९ गणेश पेठ वाा ढोल्या पैकीं रुके ·।· एकूण रुपये, ९७ पेठ शिवपुरी रा. अण्णा रास्ते यांनीं वस्ती केली–४८ महीपंतराव चिटणीस बद्धल रुके ०२॥, ३२ मोरो बल्लाल बद्धल रुका ०१, १७ पारखी यांचा मळा विहिर सुद्धा रुके ०२=९७=१९९

८८। बाग रुके ०१०।-७॥ राघोबा आचार्य रुके ०३, २५ कडकोबा परभु रुके ०२॥, ९ रा. मल्हारजी होळकर रुके ०३, ४६॥। रा. आयाबा मजुमदार रुके ०१॥।=८८।

२० इनाम **श्रीमहादोबा देव** रुके ०२=रुके ८॥११॥।=३०७।

७४५ रयत जमीन टके २॥५-५७६ वाहाती टके ०२ ~- रुपये,-४८६ जिराइत १॥९ ~- रुपये, ९० बागाइत रुके ।३ ~- रुपये=५७६

११९ उस्ती जमीन रुके ।॥५ ~- रुपये, ५० विहीर हुंडा ७४५=१०५२।
पैकीं वजा गावखर्च व हक्कदार जमीदार गुदस्तप्रमाणें रुपये २७६
बाकी रुपये ७७६।

तपशील

३६॥। पायमाली बद्दल अलाहिदा ७३९॥ येन=७७६।
सातसे सव्वाशहात्तर रुपये दुमाला सुद्धा जमा करार करावे.

(नकल) श्री { श. १७१६ / इ. १७९४ }

यादी हिशेब जमनि जुमला निा मालिकम पुणें सुा खमस तिसेन मया व अलफ सन १२०४

जमा कास टके
पैकीं वजा कास ७॥१ टके

१०६॥ इनाम १०४ कदीम ।॥४ **पीर शेकसल्ला,** ०४ **पीर इसाक मुदीन,** ०८ शितोळे देशमुख=१०४

०२॥ जदीद-०॥ **कबीरबावा,** ०२ बापूजी आनंदराव कमावीसदार=०२॥ =१०६॥

।३ बाग बेटाचा नजीक संगम निा पेटे याजकडे हल्लीं आहे रुके
।॥४ नदी धुपण रुके

१॥६॥ वसाहत जमीन टके ।॥६-मोहोतर्फाकडे ०६ व मुजरीकडे ।॥। १०। कोला अलीकडे वस्तीस जमीन घेतली ती रुके, ।। पेट शहापूर कदीम खेरीज- ।४ पेठ शनवार निा बाबूजी, ०९ पेठ मंगळवार नि. कर्णे रुके ।६ पैकीं

दुमाला ०९ बाकी जमीन रुके, ०४। न्याहाल पेठ रुके ·।१ पैकीं दुमालाकडे रुके ९, बाकी, ०१॥। भवानी पेठेकडे वस्तीस जमीन रुके, ०४ **संगमेश्वराचें देवालय** वगैरे पड जमीन रुके, ०१ गंजी गवताच्या राजश्री रामचंद्र नारायण पांढरे, ०॥· हलालखोराचे वस्तीस दिली होती ते हल्लीं हणमंत पेठेकडे घेतली ते रुके=१०।· ०॥· मनसाराम सावकार याचे बागाखालीं=१॥६॥=३॥८।·

बाकी कास जमीन टके ३॥४॥

~– रुपये

४०७॥ दुमाळे जमीन रुके ~–रु.६१॥ बागा जमीन सरकारातून दिली त्यापैकीं हल्लीं ज्याची त्याजकडे आहे ते रुके ०१०॥ एकूण रुपये ७॥–राघोबा आचार्य रुके०३ एकून रुपये, २५ कडकोबा परभू रुके ०२॥ एकूण रुपये, २० **महादोबादेव** रुके २ ए. रुपये, ९ राजश्री तुकोजी होळकर रुके ३ हल्लीं दलपतगीर रुपये=०१०॥ रुके=६१॥

३४६। वसाहतीस जमीन घेतली ते व बागास जमीन दिली होती त्यात वसाहत झाली ते रुके १८२ एकूण रुपये–१८ न्याहाल पेठ रुके ·।१ पैकीं दुमालाकडे रुके, ०९ ए. रुपये, ४५ मंगळवार पेठ रुके ·।६ पैकीं दुमाला रुके ०९, ३९ गणेशपेठ निा खासगी रुके ·।· ~–रु.,१२०॥ पेठ शिवपुरी निा रास्ते याजकडे रुके, ०७॥ एकूण रुपये,–९७ नेमून दिली जमीन ते रुके ०५॥, १७ वेदमाळी रुके, ०२ पारख्याबद्दल, ४८ महीपंतराव चिटणीस रुके ०२॥ ए. रुपये, ३२ मोरो बल्लाळ जोशी रुका ०१ ए. रुपये रुके ०५॥=९७

२३॥ शिवाय मागाहून जमीन घेतली ते रुके ०२। रुपये ~–रुके ०७॥=१२०॥

५ **गोसावी याचे वाडे** जाहाले ते रुके ०१ रु., ७। रास्ते याचे नळा खाली जमीन रुके ०१।~– रु., १०४। राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस यांचे पेठे खाली जमीन रुके ०९–३३॥ डाळींबन रुके ०२।, १३॥ जमीन रुके ०२।~–रु., २० विहिरी चार दर ५ प्रमाणें रु.=३३॥

६ पाहाडाबद्दल रुका ०१ ~–रु., ९ लडकत व पाढरे रुके ०२ ~– रुपये ९ कुळकर्णी याचे जमीनी बद्दल त्या पैकी ०१॥ कुळकर्ण्याबद्दल, ०॥ गोहाड=०२ रु.

४६॥· राजश्री आबा मजमुदार यास बागास जमीन दिली होती ते हल्लीं वस्ती पेठ रुके ०१॥ ए. रु.=०९ रुके=१०४।

६ हलालखोरास वस्तीस जमीन रुका ०१ ~–रु.=१०२ रुके ३४६।·=११.॥ रुके ४०७॥·

रयत जमीन कास टके २॥४।~–रुपये ६४४॥

५११॥· वाहती जमीन टके १॥१।–४५१॥· जिराइत टके १॥३। दर रुका रुपये ६, ६० बागाइती रुके ०१० दर रुका रु. ६=१॥१।·=५११॥·

११३ उस्ती जमीन रुके ·॥३–२० विहीर हुंडा विहिरी सुकरी ४ दर पांच प्रमाणें रुपये=२॥४·=६४४॥·=१०५२१·

पैकीं वजा गावखर्च व हक्कदार व–सालाबादप्रमाणें साल मजकुरीं रुपये २७५ बाकी रुपये ७७७.

सातसे सवासत्याहत्तर रुपये करार करावे छ १५ जिलकाद खमस तिसेन सद्-रहु अस्सल गंगाधर बलाळ माळी कुळकर्णी निा माळी याजपाशीं असे

८२

पुण्याचें औरंगजेबकालीन नांव मुहियाबाद

१ औरंगजेबाचा नातू मुहि-उल्-मिलत हा पुणें येथें वारला. त्याचें स्मारक म्हणून औरंगजेबानें पुण्याचें नांव मुह्यियाबाद असें ठेविलें. या गोष्टीचे प्रत्यंतरास मुसलमानी इतिहासांतून खालील दाखले सांपडतील:—

(१) औरंगजेबाचे कारकीर्दीचा खात्रीलायक असा दरबारी इतिहास 'मआ-सिरअलमगिरी' नांवाच्या ग्रंथांत ग्रथित केलेला आहे. त्यांत वरील प्रसंगाचा उल्लेख करितांना, 'हिजरी सन १११४ मध्यें कोंडाणा किल्ला काबीज केल्यानंतरचा वर्षकाल मुह्यियाबाद–पुणें येथें घालविण्याचा औरंगजेबानें निश्चय केला' असा मजकूर दिलेला आढळतो.

(२) "कोंडाणा किल्ला काबीज केल्यानंतर, राजशक ४७ मध्यें वर्षकाल संपविण्याकरितां औरंगजेब मुहियाबाद–पुणें येथें आला," असा उल्लेख मआसिर-उल-उमरा नामक ग्रंथांत सांपडतो. हा ग्रंथ हिजरी सन ११९४ (इ. स. १७८०) त रचिला गेला.

(३) वरील दोन्ही ठिकाणांपेक्षां खाफीखान यानें वरील ऐतिहासिक बाब विस्तृत रीतीनें वर्णन केली आहे. खाफीखानच्या, या म्हणण्याचा सारांश इलियट आणि डासन यांनीं दिला आहे. (भाग ७, ३७३ टीप पहा). हाच आधार जमेस धरून ग्रँट डफ व ग्याक्षिटिअरकार यांनीं पुण्याचें नामांतर औरंगजेबानें केलें असें म्हटलें आहे. खाफीखानचा मूळ उतारा खालीलप्रमाणें:—

फारसी उतारा

"बअद ई फतह कूच फर्मूदे एखमा अय्यामे बरिश्काल दर्राहे पुना
"व मकामात हवेली कसबे मजकूर बराये आरामे लश्कर गुजारदन्द
"व आं मकानरा बिनाबर आंके शाहजादे मुहम्मद मुहीउल मिल्लत
"खलफे सिदके पादशाहजादे मुहम्मद कामबक्ष के अज बतने

" रानी मनोहरपुरी बूद व जियादे वदहसाल तम्मतो जिदगानी
" आरज न याफ्ते बे अजले थबीई महले पैमाये जन्नतुल
" मावा गश्त व दारान मकान मुत्तसिले मजारे फायिजुल अनवार
" शेख सलाहुद्धीन मदफुन गश्त लिहाजा मुहियाबाद मौसुम गर्दानीद "

अर्थ

" (सिंहगडचा किल्ला) सर केल्यानंतर, सैन्यास कूच करण्याचा बादशहानें हुकूम दिला व पुण्याचे रस्त्यावरील व त्या शहरचे आसपासचे गांवीं लष्करास विश्रांति देत वर्षकालापैकीं एक महिना घालविला. पातशाहाजादा महंमद कामबक्ष यास राणी मनोहरपुरी इचे पोटीं शाहाजादा महंमद मुहिउलमिलत नांवाचा मुलगा होता. त्यानें या नश्वर जगांतील सुखाचा अनुभव दहा वर्षांहून जास्त दिवस घेतला नव्हता. तोंच तो आजारी पडला, व त्यानें स्वर्गाचा मार्ग आक्रमिला. शेख सलाउद्धीन याचे कचरीचे नजीक त्यास पुरण्यांत आलें. या गोष्टीमुळें, बादशहानें पुण्याचें नांव मुहियाबाद असें ठेविलें. "

२ कोंडाणा किल्याचा हा वेढा शक १६२४ पौष वद्य ४, तारीख २७-१२-१७०२ ते शक १६२५ वैशाख शुद्ध ३, तारीख ८ एप्रिल सन १७०३ पावेतों होता. त्यानंतरचा वर्षकाल म्हणजे शक १६२५ चा वर्षकाल औरंगजेबानें पुणें येथें घालविल्याबद्दल दाखला आहे. औरंगजेबानें पुणें येथें वैशाख वद्य १२, ता. १ मे ते कार्तिक शु. १३, तारीख १० नोवेंबर सन १७०३ पावेतों तळ दिला होता ही गोष्ट सिद्ध आहे. अशा स्थितींत औरंगजेबाचा मुक्काम वरील तारखांचे दरम्यान पुण्यास असतांना, मुहिउलमिलत मृत्यू पावला असला पाहिजे.

३ पुण्याचा फौजदार काकडखान याचे दंगलीनंतर पुण्यांत स्वस्थता राखण्याकरितां औरंगजेबानें मोहनलाल नांवाचा इसम पाठविला. त्याचें स्मारक म्हणून मोहियाबाद असें एका पेठेस नांव दिल्याची लोकवार्ता पुणें ग्याझिटिअरकारांनीं दिली आहे (बाँबे ग्याझिटिअर, पुस्तक १८ वें भाग ३, पृ. ४०४-४०५ पहा). याहून या गोष्टीस आधार नाहीं. धाकटे शेख सल्ल्याचे दर्ग्यानजीक औरंगजेबाचे नातवाची कबर अद्याप दाखविण्यांत येते व नातवाचे मृत्यूमुळेंच पुण्याचें नांव मुहियाबाद असें ठेविण्यांत आलें असल्याबद्दल मुसलमानी तवारिखांतून स्पष्ट उल्लेख सांपडतात. या गोष्टी लक्षांत ठेविल्या म्हणजे पुण्याचें 'मुहियाबाद' हें नांव कां पडलें याचा स्पष्ट खुलासा होतो. पुण्याचे नांवाचा उल्लेख मुहियाबाद-पुणें अशा जोड नांवानेंहि करीत असत. औरंगजेबानें दिलेलें हें नांव फार दिवस टिकलें नाहीं. तें लवकरच मागें पडून पुण्यानें आपलें नामस्वातंत्र्य कायम राखिलें ही गोष्ट अभिमानाची आहे, यांत शंका नाहीं.

८३

पुणें येथील कांहीं जुनी माहिती

पुणें शहरीं थोरला व धाकटा शेखसल्ला ह्या नांवाचीं दोन पिराचीं स्थानें आहेत. त्यांपैकीं थोरला शेखसल्ला म्हणून जो आहे त्याचा दरगा शनवार पेठेंत कानडे यांच्या वाड्याजवळ नदीतीरीं आहे. हल्लीं जेथें दरगा आहे तेथें नारायणेश्वर नांवाचें शिवस्थान होतें, तें भ्रष्ट करून तेथें हा दर्गा बांधला. ह्या दर्ग्याचे वहिवाटदार जे मुजावर किंवा पीरजादे आहेत ते शामभट राजर्षि नांवाच्या ब्राह्मणाचे वंशज आहेत. हा ब्राह्मण शेखसल्ला अवलिया यांचा शिष्य होऊन पुढें मुसलमान झाला. त्यास अवलियानें आपल्या मागें आपला अधिकार चालविणारा नेमिलें. शामभटानें सांगितलें कीं आपण ब्राह्मणाचा मुसलमान झालों आहों, त्या अर्थी मुसलमान लोकांतला धर्माधिकार आपणास देववावा. तेव्हां अवलियानें खटपट करून पुण्याचा काजीपणा त्यास देवविला. हल्लींचे थोरल्या शेखसल्याचे पीरजादे व पुण्याचे काजी हे ह्या शामभटाचे वंशज होत. यरंडवणें हा गांव यांच्याकडे चालतो.

पुणें येथील अगदीं जुनीं वसाहतदार अशीं आठ घराणीं आहेत. त्यांस **आटघरे** असें म्हणतात. ह्या आठघऱ्यांचीं आडनांवें व गोत्रें अशीं आहेत:

आडनांव	गोत्र	आडनांव	गोत्र
ढेरे	वशिष्ठ	वैद्य	काश्यप
ठकार	काश्यप	कवलंगे	} जामदग्न्यवत्स
शालिग्राम	हारितस्	निलंगे	} जामदग्न्यवत्स
कानडे	...	भाराईत	} जामदग्न्यवत्स

ह्यांपैकीं कवलंगे, निलंगे व भाराईत ह्या तीनही घराण्यांचा निर्वंश झाला आहे. कवलंगे ह्यांचें उत्पन्न राजर्षि वहिवाटतात, निलंगे यांचें धर्माधिकारी वहिवाटतात व भाराईत यांचें ओतूरकर वहिवाटतात. ओतूरकर ह्यांस हल्लीं माळी असें म्हणतात. राजर्षि, धर्माधिकारी व भाराईत हे सर्व मूळचे एकाच घराण्यांतले आहेत. राजर्षिपैकीं शामभट हा बाटला होता तरी त्याचा ओढा ह्या आपल्या मूळच्या लोकांकडे होता. त्यानें नष्टांश झालेल्या घराण्यांचें उत्पन्न आपल्या घराण्यांतील लोकांस देवविलें असावें. भाराईत यांचा माळी नांवाचा गांव इनाम आहे म्हणून माळीकर म्हणत असत. परंतु पुढें माळी असेंच म्हणूं लागले. कदाचित् कर्नाटकी चालीप्रमाणें गांवाचें नांव तेंच आडनांव झालें असावें. ह्यांचा वाडा तुळशीबागेच्या पिच्छाडीस आहे. येणेंप्रमाणें माहिती मिळाली आहे. ही सर्व तोंडी आहे. पुणें ग्याझिटिअरमध्यें दिलेल्या माहितीशीं ही माहिती मेळानेंच आहे. तथापि ऐकीव माहितींत कांहीं अधिकही आहे.

८४

मुंजाबा व मुंजाबाचा बोळ

ह्या पुणें शहरांत "मुंजाबाचा बोळ" ह्या नांवाची एक आळी आहे. हा मुंजाबा कोण होता ह्याचा शोध करितां एकानें सांगितलें कीं, ह्या नांवाचा कोणी मनुष्य असल्याचें माहीत नाहीं; परंतु येथें जवळच एक पिंपळाचा पार आहे त्यास मुंजाबाचा पार म्हणतात. पुढें सहज जुन्नरच्या एका माणसाशीं बोलतांना त्याचा खुलासा झाला. अश्वत्थ वृक्ष लावून त्याची मुंज करून त्याखालीं अश्वत्थ नारायणाची म्हणजे वामनावतारी विष्णूची स्थापना करण्याची चाल आपल्या सर्व देशांत आहे, तशी ती इकडेही आहे. इकडे ह्या देवतेस मुंजाबा म्हणतात. पुष्कळ घराण्यांत अशी चाल आहे कीं–वडील मुलाची मुंज होण्यापूर्वी अशा प्रकारें मुंजाबाची स्थापना अगोदर करितात. मुलाच्या मुंजीच्या पूर्वीच पिंपळ लावून वाढवितात. मुलाची मुंज झाल्यावर त्या अश्वत्थास पार बांधतात. गांवाला नदी असल्यास नदीकाठीं अश्वत्थ लावितात. कुणबी लोक देखील अश्वत्थ-नारायणास मुलें जगण्यासाठीं किंवा व्हावीं म्हणून नवस करितात व इच्छेप्रमाणें घडल्यास पिंपळ लावून ब्राह्मणाकरवीं मुंजाबाची स्थापना करितात अशीं शेंकडों मुंजाबाचीं स्थानें आहेत. " मुंजाबा " हा शब्द सातान्याकडे नाहीं व अशा समजुतीही नाहींत. केवळ पुण्यकर्म म्हणून लोक अश्वत्थवृक्ष लावून त्यास मोठमोठे पार बांधतात. पुणें जिल्ह्यांत चाकणेस व नारायणगांवाजवळ प्रसिद्ध मुंजांचीं स्थानें आहेत म्हणतात. मुंजाबाच्या बोळाजवळच बोळाच्या पूर्व बाजूस असा मुंजाबा आहे. मुंजाबा अगोदरचा असून बोळांतील घरांची वसाहत मागून झालेली उघड दिसते.

८५

पुण्यांतील दोन तोफा

पुण्यांत शुक्रवार पेठेंत जुना तुरुंग ऊर्फ मामलेदार कचेरी हल्लीं आहे तो पूर्वीचा भाग ' खडक ' या नांवानें प्रसिद्ध आहे. येथेंच पेशव्यांचा व पानशांचा तोफखाना होता. या जुन्या तुरुंगाच्या प्रवेशद्वारीं दोन बाजूस दोन तोफा पुरलेल्या आहेत. त्यावर दोन लेख आहेत. बहुधा तोफांचीं नांवें व मगदुराचें माप हे लेख दर्शवित असावे. जातांना उजव्या बाजूची तोफ आहे तिजवर

सलाबत जंग ८८४॥

असा व डावे बाजूचे तोफेवर

फते मुबारख ८८७॥

असा लेख मोडींत आढळतो.

तिसरी तोफ पश्चिम अंगास आहे पण त्यावर लेख नाहीं. ४॥ व ७॥ शेराचा गोळा या तोफांतून अनुक्रमें उडत असावा.

८६

सिराळसेटीसंबंधीं कज्जा

१

श्री

{ श. १६९६ श्रावण शु. ६
{ इ. १७७४ आगष्ट १३

जबानी माहादजी पाटील झांबरे सुा खमस सबैन सुलतानजी पाटलाचे येथे आपण दोनचार वेला सांगून पाठविले की सिरालसेट काढा आमचा सिरालसेट आम्ही काढितो त्यास जानु सेलका बोलला जे तुमचा सिरालसेट येऊ देणे त्यास आपला सिरालसेट काढून सुलतानजी पाटलाचे.........(फाटलें आहे) आणिला आणि उभा केला त्यास सांगून पाठविले जानु सेलका याबरोबर तों त्यांच्या बायका पोर घेऊ लागल्या उपरातीक आपला सिरालसेट आपण नेला तिकडून येते वेलेस सुलतानजी पाटलाचा सिरालसेट येता पाहिला तों त्याच वाटेन आपली मुले जमावसुधा आली दोघाची गाठ पडली तों सुलतानजी पाटलाकडील माणूस बाल्या याणे होलाराचे ढोलगे फोडले सबब सबब[1] मारामारी आपल्या लेकासी व सुलतानजी पाटलाच्या भाच्यासी झाली येणेप्रो जबानी आसे छ ५ माहे जाार +सदरहूप्रा लिहिले सही

(आडवी ओळ)

माहादजी पाां याजला जामीन जोगोजी सेलका

२

श्री

{ श. १६९६ श्रावण शु. ६
{ इ. १७७४ आगष्ट १३

जबानी राणूबाई व पदाजी सितोले व जानु सेलका सुा खमस सबैन मया व आलफ माहादजी पाटलाकडील येकदोन वेला सागून पाठविले की सिरालसेट काढणे त्यास आम्ही जाबसाल केला की आम्ही तयारी करितों तों मााारनिलेनी सिरालसेट आणून दाराजवल आणू(न) उभा केला क्षणभर उभा केला आणि सिरालसेट पुढे

---

१ दुबार पडलें आहे. + अक्षर भिन्न.

गेला उपरांतिक आम्ही आपला सिरालसेट घटकाभरी मागून काढून दुसरे वाटेने काढून नदीस जात होतो तों तिकडून त्याणी आपली वाट सोडून राजश्री—बापुसाहेब मोकासी याचे रस्त्याने आले आणि श्री—मोकाशाचे दारापुढे आपल्या माणसानी त्याचे होलारासी कजिया केला कीं तुम्हास आठ रोज आम्ही विडा दिल्हा आसतां तुंम्ही त्याच्या सिरालसेटीबरोबर कैसे गेले म्हणून ढोलगेयावर हाटले तो ढोलगे फुटलें त्याजवर माहादजी पाटील याचे लेक गोरखोजी पा। व चादजी पा। याणी हाला म्हणून बोलिले त्याजवर ढोलगे फोडले त्या माणसास बहुत मारलें आणि पदाजी सितोळे सुलतानजी पा। याचे भाचे यांच्या तोंडात चादजी पाटील याणे मारली कजिया करून सिरालसेट पडला माणसे चौकडे चौघें गेलीं तो सिरालसेट राजश्री मोकाशांचे दारापुढे पडला आसे येणेप्रो जबानी असे त्या गडबडीमधे आपल्या मा(ण)सा जवल बुधली पितलेची होती ते गेली व माणसाचे पांघरून गेले छ ५ माहे जार सदरहू *लिां सही

(आडवी ओळ)

राणूबाईस जामीन जानोजी सेलका

३
श्री

{ श. १६९६ श्रावण शु. ६
{ इ. १७७४ आगष्ट १३

जबानी बा। गंगनाक बिन बावाजी होलार माहार सिंदरकर हली वस्ती को पुणें सु॥ खमस सबैन मया व अलफ सन ११८४ कारणे साहेबाचे शेवेसी जबानी लेहून दिल्ही यैसी जे आषाढमासी सुलतानजी पाटील यानी बाला माणूस पाठऊन आपणास सांगितले की श्रावण मासी सिरालसेट वाजवावयास आपले देवांबराबर येणे हे आपण कबूल केले पुढे त्यावर सिरालसेट निघावयाचे समई आपण वाजंत्री घेऊन सामान शुधा आलो आणि सुलतानजी पा। याचे बायेकोस सांगितले जे आम्हास आज्ञा काये तेव्हां ती म्हणाली की आम्ही देवाची पूजा करितो तुम्ही बसणे तेव्हां आपण बसलो यावर माहादजी पाटील याचे घरचा सिरालसेट आधी निघाला त्यानी आपणास पुढे घालून नेले त्याज ब (राबर) आपण जाऊन सिराळसेट नदीत टाकून माघारे आलो तो [1]सुलतानजी पाटील याचा सिरालसेट सेळकीयाचे घरावरून निघोन मोकासीयाचे दारावरीले रस्तीयाने येत होतो तो आम्ही देव टाकून माघारे आलो त्यावर प्रथम जाते समई गुरवाचे घरावरून गेलो त्या रस्तियानें जावे तें टाकून याजवरून आलो तो बाला माणूस यानें थाप आपले डफडियास हटली की आम्ही तुजला बलाविले आसता तू तिकडे कसा गेलास पुढे काही आपण त्यासी बोलावे तो माहादजीचे पुत्र यानी हला म्हणून सुलनान पा। या चे माणसास मारामार केली आपले

* अक्षर वेगळें. १ 'न' लिहावयाचा राहिला.

डफडियावर थाप हटली परंतु आपले डफडे काही फुटले नाही सिरालसेट पाडला तो आद्याप मोकासी याचेच घरी आहे संदरहू लेहून दिल्यास कमपेश जालो तर सरकारचे गुनेगार हे जबानी लेहून दिल्ही सही

(तेरीख)— २ ३ जार   निा उफड (गोल आकार)

(आडवी ओळ)

बिा बाजी आबाजी ठकार कुलकर्णी निा मोहोतर्फा कaा मजकूर

४ श्री   { श. १६९६ श्रावण शु. ६ / इ. १७७४ आगष्ट १३ }

जबांनी साक्षदार झांबरे पाा हरदू जणाचा कजिया जाला ते वेळेस

खंडोजी प्यादा निा राजश्री मोरो माधवराव पाटलाच्या दाराज(व)ल मी मौज पाहात उभे होतों तों माहादजी पाटलाचा सिरालसेट गेला त्याजबराबर त्याचे लेक गेले आणि मागून सुलतानजी पाा याचा सिरालसेट सेलक्याचे दारावरून राजश्री मोकासी याच्या रस्त्याने जात होता त्याजबरोबर आपण बालाजीपंताच्या घरास जात होतो तों तिकडून माहादजी पाटलाकडील सिरालसेट टाकून घरास येत होते त्यास हरदू जणाचा कजिया राजश्री मोकासी याचे उकरड्याजवल जाला ते तिकडून चालून आले आणि इकडल्यानी त्याचे ढोलगे फोडले त्याजवर माहादजी पाा याचे पुत्र दोघे याणी हालाबोलले आणि मारामारी केली आणि सिरालसेट पाडला +किवा उतरोन ठेविला हे आपणासठायके नाही ते वेळेस पदाजी सितोला याच्या तोंडावर चादजी पाटलानें हाटली व सोनाराच्या पोरानें धका दिल्हा व न्हाव्याच्या पोरानें बुकी मारली हें आपण पाहिले *हे सत्य स्मरून सांगितले आहे

संताजी प्यादा निसबत राजश्री मोरोबादादा सदरहू खंडोजी प्यादा निा राजश्री मोरो माधवराव याणे सांा त्याप्राो खरे आसे आपण पाहिले असे परंतु न्हाव्याने बुकी मारली हे आपण डोल्याने पाहिले नाही छ ५ माहे जाखर सन खमस सबैन

+ येथें 'त्याजवर' असें लिहिलेलें खोडलें आहे. * अक्षर निराळें.

५
श्री
{ श. १६९५
{ इ. १७७३

दा। बो। सुलतानजी पाटील झांबरे मोकदम नि। मुजेरी का। पुणे सु। आर्बा सबैन मया अलफ कारणें साहेबाचे सेवेसी कतबा लेहून दिल्हा येसा जे माहादजी पाटील झांबरे याचा व आपला सिरलसेटी बा। कजिया साहेबापासी पडिला आहे त्यास माहादजी पाटील म्हणतात की सुलतानजी पाटील याचे बायेकोने आपल्यास सिरलसेट पुढें न्या म्हटले म्हणून आपण आपला सिरालसेट पुढें नेला आहे त्यास आमचे बायकोने कांही याजला सिर...... येसे म्हटले नाही ये विसीचा सा...

(अपूर्ण)

८७

पुणें शहरांतील घरपट्टी माफीची यादी

[इंग्रजी अमदानी सुरू झाल्यानंतर कांहीं वर्षें पूर्ववत् राज्यकारभार एल्फिन्स्टननें चालू ठेविला होता. मात्र पूर्वीं कसकसा चालू होता याविषयीं माहिती गोळा करणें चालू होतें. पेशवाईत दर पेठांतून कांहीं घरावर पट्टया आकारल्या जात नसत. सरकारी चाकर, मर्जीतील माणसें व इतर गरीबगुरीब किंवा धार्मिक वृत्तीचीं माणसें यांना पट्टी माफ असे. पुढील यादीवरून यांची साधारण वर्गवारी कळेल. पेशवे द. च्या एका पुस्तकांत रविवार पेठेंतील माफीची दिलेली आहे. (पे. द. ४३.२१)]

× × × × +

तेव्हां ती सरकारची चाकरी सबब त्यास वसाहातीपासून पटी नाहीं

१ लक्ष्मण हा नाना फडणीस याजपासी गुलाबी कलवतीण होती तिचा हा साजिंदा सबब वसाहानीपासून पटी नाहीं

१ विठोजी गुरव कोडितकर हा सरकार चाकर होता सबब
―
४

२५८ तोफखान्याकडील कामगार होते ते पेशवे सरकारचे वेळेस तोफखान्यांत चाकरी करीत होते हाली कुपणी सरकारचे अमलात चाकरी सरकारची नाहीं परंतु त्यास वसाहातीपासून पटी नाहीं ते आ। बि।

२ बाणसाज, ९ भिस्ती, ८ सिंपी सिवणारे, २ जिनगर, १ कलाल, ३ तांबोली, १ नालबंद, २ बेलदार, ८ सुतार, २ चांभार परागंदा खिडारे, १ लोहार बहिरु, १ गुजराथी वलब सुंदर सावर, ७० मुसलमान यात कोणी गोलंदाज

गोलंदाज व कोणी खलांसी व कोणी बाणदार वगैरे हुद्याहुद्याने चाकरी करीत होते १४० कामाठी=२५८

१४ मुसलमान आलीबहादर वगैरे थोर लोक होते व येक हकीम यांस पटी नाही

६४ परदेसी सरकारांत सिपाईगिरीचे काम करीत होते व काही तोफखान्याकडे व कांहीं फडक्याकडे व नाना फडणीस याजकडे चाकरी करीत होते यास पटी नाही.

३ गोवर्धन भिक्षुक पंचाग सागोन उपजीविका करीत होते सबब

७ परभू दप्तरचे कारकून होते सबब

२ गुजराथी वलंब सुंदर सावर यांचे (मोठे १) सरकारी सबब पटी नाहीं.

१ खत्री भीक मागत होती पहिली जागा भोई याची माफीचीच होती तींत ती राहिली सबब

१० भोई सरकारचे पालखीचे चाकर नाईक लोक होते त्यास पटी नाहीं

११ न्हावी पेशवे सरकारचे वाजंत्री व काही हजामती करणार होते ते हाली चाकरी काहीयेक करीत नाही त्यास पटी नाही.

१ हलालखोर गरीब मजूरदार सबब

१ रूष्णा पाहाड (हाडप) हा सरकारचा गवई होता सबब पटी नाही

४२ गवली आां-२५ लिंगाईत गवली हे दरोबस्त कुणं व खासगीकडील कामगार सबब त्यास पटी नाही, १७ कोकणे गवली हे गौखान्याकडील सरकारचे चाकर होते सबब=४२

२ बागवान चवधरी १ व मेहेतरा १ येाा दोन आसामी यास पटी नाही, कासार भाडेवाला सबब पटी नाही

२९ छपरबंद हे पेशवे सरकारांत छपरे बांधावयास बिगारीने जात होते व स्वारीबरांबर जात होते तेथे छावणीची छपरे बांधीत होते व यासिवाय त्याचे घरी बैल होते ते बैल सरकारचे तोफखान्याबरोबर तोफेचे गोसे व दारु वगैरे घेऊन जात होते याप्रो चाकरी वरून राहिले कुपणी सरकारचे अमलात चाकरी काहीयेक करीत नाहीं त्यास वसाहातीपासून पटी नाही

१८ माहात पीलखान्याकडील चाकर सबब

६ कासार यांस पटीचा सिरस्ता नाहीं सबब

६ राऊळ यास पटीचा सिरस्ता नाही

२ सोनार सरकारचे दागिने जडण्याचे काम करीत होते सबब

१ सुतार सरकारचा नाईक चाकरी सरकारांत करीत होता सबब

१ चांभार मेहेत्रे सबब

१६४ कुणबी माळी–३५ थोर सरदार सरकार निा व सिंदे, १ मल्हारजी सिंदे नाटकशालेचा, १ बालाजी सिंदा, १ भिकाजी घारगा, २ जासूद आणसोजी नाईक, १ गंगाजी जासूद, १ देवकी कुणबी निा पानसे, १ बहिरु वणजारा सरकारचा, १ भवानी सिरसाट, १ पहिलवान माली, १ दौलतराव घाडगे, १ महिपतराव यादव, १ मोराजी जगताप, १ संताजी जगताप, १ बाबुराव आंग्रे, १ भवानी सागला, १ सखाराम थोरात, १ खंडूजी गुड, १ आनंदराव बाबर, १ कासिराम आणा कोकरे, १ कृष्णा सागला, १ खंडू वणजारा, १ तुकोजी सिंदा, १ सियाजी सिंदा, १ कृष्णाजी पडवल, १ विठु वणजारा, १ जानोजी जासूद नाईक, १ बालाजी नाईक करंजकडे (!) जासूद, १ विठू ढालाईत, २ रामजी साने निा खाजगी, १ नारायण जासूद, १ घोंडजी साठे निा नाना फडणीस, १ दताजी नाईक जासूद, १ बापू सिंदे कुडालकर =३५

१२९ बोथाटी बारदार व छडी बारदार व काठी सिपाई लोक व काची माली बागेवर चाकरीस होते ते वगैरे झाडून पटी वसाहतीपासून नाहीं. =१६४

१७ कुंभार, परदेसी गवंडी १३ व मराठे गवंडी ४ हे सरकार खाजगीकडील चाकर होते सबब त्यांस पटी नाहीं हाली चाकरी नाहीं व पटीचा दाखला हि नाहीं

१ जतीरंग विजई हे सुखवस्तु सबब

१ मुरली देवाची सबब

१ जंगम वाण्याचा गुन्ह सबब

१ रफूवाला सरकारचा चाकर होता सबब

१ पाथरवट यास पटी मामूल नाहीं

१३ गोसावी यास पटी मामूल नाहीं सबब

३६ कामाठी निा खासगीकडे चाकरी करीत होते त्यास पटी नाहीं

१७ सिंदे पोरगे सरकारचे आहेत त्याची घरे आहेत त्यास पटी नाहीं

१ पेशवे सरकारचे अमलांत माफीची घरे होती ती पुढें दुसरेयाणे घेऊन त्यात उदीम करून उदीमपटी देत नाहीं असे पेठमारी नाहीं व जी माफी पोा वगैरे घरे खरेदी विकरी जाहाली त्याची याद अलाहिदा सालवार मितिवार सरकारात पेशजी दिल्हीच आहे

१ उदीमपटीचे कमाल पेठ मारी रुाे ३ तीन हरयेक उद्मास आहे परंतु त्याचा उदीम पाहून जीव पाहून घ्यावयाचा सिरस्ता आहे.

१ वसुली घरापौ बखली पडल्या आहेत त्याचा ताा पटास लिहून दिल्हाच आहे

१ उदीमपटीचे कमाल किती सालानी कमी पटी असल्यास कमाल घ्यावयाचा

सिरस्ता काहीयेक नाही उदीम पाहून साल दरसाल कमज्याजती करावयाचा सिरस्ता आसे

१ तारकसवाले पेठ मारी राहून उदीम करीत आहेत परंतु पटी देण्याचा सिरस्ता नाही

× × × × ×

×श्रींत व कोणी थोर सावकार व कोणी नाना फडणीस याजकडील चाकर याप्रा़ो चाकरी करीत होते हाली कुपणी सरकारात चाकरी नाही व त्यास सनदा नाही व त्याचा दाखला पटीचा वसाहतीपासून काहीयेक नाही.—१२२ ।१६२

१९ वाणी हे सरकारचे कोठवले व पेठचे शेट्ये सबब त्यास माफी हे सरकारात कोठीकडे कोठवलेपणा करीत होते सबब त्यांस व शेट्ये हे वतंदार सबब त्यांस येकूण वाणीखुमातहि घरे वसाहातीपासून माफू आहेत.— १८।१

३ कलवंतीण रमी कोंडी ही बहिरापंत मेहेंदले याजपासी चाकरीस होती सबब तिची घरे पेठ वसाहातीपासून माफ

४ गुरव–२ नारायण व सुलतानजी हा देवदेवेश्वराकडे गावयांस रोज जात होते

(अपूर्ण)

---

२ पुणें घराणीं—

८८

तुळशीबागवाले यांची कांहीं मूळ हकीकत

सोबतचा कागद त्यांचेच दप्तरांतील आहे. ह्याचा काल इ. १७६१ जून १ हा आहे.

ह्या कागदांत तुळशीबागवाले यांनीं प्रांत गंगथडींतील परगणे कुंभारीपैकीं कंचनपूरसह कोकमठाण येथील पाटिलकीची चौथी तक्षीम व वडीलपण कसें घेतलें, तें आलें आहे. व त्याबरोबरच तुळशीबागवाले हे पागादार कसे झाले, मूळचे पागादार कोण इत्यादि वृत्त अनुषंगानें आलें आहे. तसेंच ग्रामव्यवस्थेच्या दृष्टीनेंहि कांहीं महत्त्वाचा खुलासा ह्यांत आढळेल.

तुळशीबागवाले हे दोघे बंधु बालकृष्ण आपाजी व नारो आपाजी हे कोरेगांव पैकीं पाडळी गांवचे मूळचे जोशी–कुलकर्णी. ह्या उभयतांनीं कोकमठाणच्या पाटिलकींतील ४ थी वाटणी व वडीलपण खरीदी केलें.

ह्या कोकमठाणची कमावीस मानसिंगराव बिन चत्रसिंग खेत्री याजकडे होती व त्यासाठीं त्याचे पदरीं पागाहि असे. हे खेत्री, ह्या गांवची कमावीस करूं लागण्यापूर्वी विष्णुराम पाटवदे हे ह्या सर्व प्रगण्याचे कमाविसदार होते. पाटवदे अधिकारावर असतां कोकमठाणच्या पाटिलकीची ४ थी तक्षीम पाटवदे यांचेच मार्फत माहादाजी अंबाजी पुरंदरे, बाळाजी बाजीरावांचे दिवाण, यांस ५ ह. स विकत दिल्ही. कमाविसदार विष्णुराम यांजमार्फत ह्या दिवाण पुरंदऱ्यांनीं ह्या पाटिलकीचा हिसा, बहुधा पाटलाला दिवाणदेणें, म्हणजे सरकारी वसूल देणें, घडलें नाहीं व त्यामुळें ही पाटिलकीची विक्री करण्याचा प्रसंग आला. त्यांत पुरंदरे यांनीं ५ ह. स पाटिलकी घेतो असें म्हटलें व पैसे विष्णुराम पाटवदे प्रगण्याचे कमाविसदार ह्यास भरण्यास सांगितलें.

विष्णुरामानें पैसे भरून पाटिलकी पुरंदऱ्यांकरितां घ्यावी तों त्यास कळलें कीं, कोकमठाणच्या गांवावर सावकाराचें देणें आहे; तें वारल्याशिवाय ही पाटिलकी घेण्यास मोकळीक होत नाहीं. म्हणून ती सावकाराचीं खतें २९४० रु. चीं होतीं तीं सोडविलीं व गांव मोकळा केला. पण सरकारदेणें राहिले म्हणून सरकारचा गुमस्ता गांवावर आला. आतां २९४० रु. जाऊन ५ ह. पैकीं सरकारदेणें द्यावें तो पुरंदरे यांनीं पाटिलकी आपणांस नको म्हणून सांगितलें. त्याबरोबरच सर्वच व्यवहार फार गुंतागुंतीचा होऊन बसला.

बरें, विष्णुराम पाटवदे ह्यांनीं राहिला पैका द्यावा—खरीदखत त्यांजवल होतेच; आणि त्यांनीं पाटिलकी घ्यावी तर त्यांजवळ पैसा नाहीं. उलट मागील पैशासाठीं म्हणजे २९४० रु. साठींच तगादा लागला. २९४० चें व्याज रु. ५६० झालें ते धरून रु. ३५०० झाले त्याबद्धल विष्णुराम ह्यांनीं गावकऱ्यांपासून रोखा घेतला.

पुढें गावकऱ्यांपासून ५ ह. ची बाकी यावयाची त्यासहि ठिकाण नाहीं. म्हणून खेत्री ह्यांना विष्णुरामास त्या रुपयांचें खत द्यावें लागले व पाटिलकी तर सरकारांत गुंतली व गुमस्ता हि गांवावर सरकारचा बसला होता.

तेव्हां गावकरी यांस तें कमीपणाचें वाटून त्यांनीं ह्या नारो आपाजीकडे पैगम लाविला व सरकारांतहि अर्ज केला की, गुमस्ता उठवावा; आणि पाटिलकी वडिलपणासुद्धां तुम्हास देतो. तुम्ही ५ ह. रु. द्या. पैकीं सावकारांचे देणें विष्णुरामानें दिले ते त्यास देऊन तीं खतें सोडवून, तसेंच त्याजवळ पाटिलकीचें खरीदपत्रहि पुरंदरे यांजकरतां केलेलें आहे तेंहि घ्या; आणि बाकी रु. २९६० आम्हास द्या. ते नारो आपाजीनी मान्य केलें व गुमास्ता उठला.

पण ह्यांत एक गोम राहिली. ती म्हणजे ५६० रु. व्याज द्यावें लागलें व त्याचेंहि खत दिलें आहे, ही गोष्ट गांवकऱ्यांनीं तुळशीबागवाल्यांस सांगितली नाहीं. इतक्यांत आणखी एक नवीनच गोष्ट घडली. ती म्हणजे हा विष्णुराम पाटवदे मेला व त्याचा मुलगा बाबुराव हिंदुस्थानांत गेला. तो २, ३ वर्षें आलाच नाहीं आणि

ह्या नारो आपाजींचें व श्रीमंत पेशव्यांचें कांहीं कारणानें थोडें बिनसलें व ते कारभारापासून कांहीं काल निवृत्त झाले.

पुढें कोकमठाणची कमावीस मानसिंगराव हा करीत होता. त्याजकडे बाबुराव पाटवदे हा आला. बाबुरावास मानसिंगरावाकडे येण्याचें ह्या व्यवहाराशिवाय आणखीही एक कारण होतें. तें म्हणजे मानसिंगरावाचा व नारोआपाजींचा स्नेह, मानसिंगरावासहि नारो आपाजीविषयीं आदर व आपलेपणा वाटत होता, म्हणून नारो आपाजींना कोकमठाण-विषयींची बाबुरावाच्या वडिलापाशीं म्हणजे विष्णुराम पाटवदे यांजपाशीं जें खरीदी खत व गांवकरी यांचीं रोखापत्रें होतीं तीं पाहिजे होतीं, तीं मिळवून देणें हें काम मानसिंगास कर्तव्य होतें. त्याप्रमाणें हे सर्व कागद बाबुरावापासून घेऊन नारो आपाजीस दाखविले. पण हे कागद घेतांना मानसिंगानें आपले जातखत ३५०० रु. चे दिले व मग ते कागद सोडविले.

म्हणजे ह्या कारभारांत येथें आणखी दोन गोष्टी घडल्या. पाटिलकी नारो आपाजींची. पण गावकऱ्यांनी सरकार देणें होतें तें द्यावयाचें आणि तें देऊन बाकी पैसे गावकऱ्यांना द्यावयाचे. पैकीं सरकारी देणें दिले आणि गांवकऱ्यांचे देण्याविशीं मुदत ठरविली. दरम्यान सदाशिवराव भाऊ निजामआलीवर म्हणजे उदगीरच्या लढाईस गेले; तींत विजयी होऊन ते येतात तों त्यास पानपतावर जावें लागलें व ह्या दोन्ही स्वारी प्रसंगांत मानसिंगराव खेत्री होते व मानसिंगाबरोबर त्याच्या पोथींत ह्या व्यवहाराचे कागद होते. लढाईत मानसिंग खेत्रीं व त्यांजबरोबरच ते सर्व कागद नष्ट झाले.

पुढें हे बाबुराव विष्णु खेत्री याजपासी कागद नाहींत हें जाणून मानसिंग खेत्री यांच्या वडिलाजवळ पैशाचा तगादा करूं लागला.


इतक्यांत श्रीमंतांचे व नारो आपाजींचे पुनः सूत जमलें व श्रीमंतांनीं समजाविसी केली आणि हे नारो आपाजी कारभार पाहूं लागले. सहजच ते कोकमठाण येथें देवदर्शनास आले. तेव्हां ह्या पाटिलकीचें सर्व वर्तमान नारो आपाजीस सांगितलें व नारो आपाजी पैसे देण्यास कबूल झाले. पण पूर्वील कागद एकहि नसतां पैसे कसे द्यावे, असें सहजच नारो आपाजी म्हणाले. तेव्हां गावकऱ्यांनीं म्ह. तीन तक्षिमदारांनीं नारो आपाजींस सांगितलें कीं, मानसिंग हा कागदपत्रांस न विसंबणारा होता तेव्हां कागद त्याजबरोबर नेले असणें अगदीं निश्चित व तो आणि ते कागद आतां नाहींत हें खरें. तसेंच बाबुराव विष्णूनें आपलेजवळील कागद माहादजी पाटील खिरडीकर याजवळ ठेविले होते तेहि आणिले व जुने कागद सापडल्यास ते रद्द असेत, व कागद आपणापासीं असोन नाहीं म्हणत असूं तर श्री गंगेची व कचेश्वराची शफत, असें हि सांगितलें. इतकें झाल्यानंतर ही तुळशीबागकरांनीं पाटिलकी खरेदी करून व्यवहार पुरा केला.

हा कागद मानसिंगरावाच्या संतोकराय ह्या मुलानें लिहून दिला आहे.

ह्यांत १ नारो आपाजी व श्रीमंत पेशवे ह्यांचे एकदां बिनसलें होतें ही गोष्ट नवीन. १ कोकमठाणचे कमविसदार व पागावाले प्रथम विष्णुराम पाटवदे, नंतर मानसिंगराव खेत्री होते हें हि वृत्त नवीन. शिवाय पाटिलकी व गांवगाडा कसा ह्याविषयीं दुजोऱ्याची माहिती आली आहे.

इत्यादि गोष्टी व तुळशीबागकरांची पाटिलकी–खरेदी ही मुख्य गोष्ट आलेली आहे. तुळशीबागकरांची वंशावळ प्रथम येथें थोडक्यांत देऊन नंतर पाटिलकीचा कागद दिला आहे.

तुळशीबागवाले वंशावळ



[तुळशीबाग वर्णन शक १८५४]

श्री. { श. १६८३ वैशाख वा. १३
{ इ. १७६१ जून १

शक १६८३ वृषानाम संवछरे वैशाख वदी १३ त्रयोदसी ते दिवसी रा॥ बालकृष्ण आपाजी व नारो आपाजी जोशी कुलकर्णी मौजे पाडली समत कोरेगांव प्रांत वांई व मुकदम मौजे कोंकमठाण × × मजरे कंचनपूर पा॥ कुंभारी प्रांत. गगथडी यासी–चत्रसिग खत्री मुकाम मौजे मजकूर लेहून दिल्हे ऐसीजे आपला पुत्र मानसिंगराव खेत्री याजकडे सरकारची पागा व मौजे मजकूरची कमावसि होती त्यास मौजेमजकूरची चौथी तक्षीम पाटीलकी पूर्वी विष्णुराम पारवदे प्रगणीयाची कमावीस करीत होते ते समयीं मौजे मजकूरचे पाटीलानी आत्मसंतोष विष्णुराम याचे मारफतीने राजश्री महादाजी आबाजी पुरंदरे दिवाण श्रीमंत राजश्री बाळाजी बाजीराव पंत प्रधान यासी विकत दिल्ही किमत रु॥ ५००० पाच हाजारास देऊन सदरहूचे खरीदखत मौजे मजकूरचे दरोबस्त मूकदमी पैा॥ चौथाई मूकदमी वडीलपण देखील मजरे कंचनपूर खरीदखत करून दिल्हे रुपयाचा भरणा करावयास विष्णुराम यास आज्ञा केली याणें येवजाचा भरणा करावा त्यास गांवकरी यानी सावकाराची कर्जे घेतली होती ती ते रु॥ वारून गावकरी याचे गुजारातीने रु॥ २९४० येकोणतीसर्से चालीसाची खते सोडविली गावावर सरकारचा गुमास्ता आला पुढें राहिले रुपयाचा भरना करावा तो पुरंदरे याणी सांगितलें कीं, पाटीलकी आपल्यास लागत नाहीं खरीदखत विष्णुरामाजवळ होते ते तसेच होते विष्णुपंतानी पुढें राहिला पैका देऊन पाटीलकी घ्यावी तरी त्याजवळ पैका नाहीं त्या हमानी मागील पैकीयास तगादा करून यैवज मागू लागले पहिले रु॥ येकोनतीसर्से चालीसाची खतें सोडविली होती त्याचे व्याज रु॥ पाचसेसाठ ५६० करून पस्तीसे रु॥याचा रोखा विष्णुराम यानें गावकरीयाचा घेतला व खरीद खतही त्याजवल गुंतले पुढें गावकरीयाची पाचा हजाराची बाकी यावी त्यास ठिकाण नाही पहिली खतें सोडविली त्याचे व्याज धरून पस्तीससे रुपयाचे खत विष्णुरामास द्यावे लागले व पाटिलकीही सरकारांत गुंतली गुमस्ता सरकारचा बसला तेव्हां गांवकरी यानी तुम्हाकडे पैगम लाविला कीं, सरकारांत आर्ज करून गुमास्ता उठवावा आणि पाटीलकी तुम्हांस देतो पहिले खरीदखत माहादाजी आबाजी पुरंदरे यास दिल्हे आहे त्याप्रमाणें चौथाई मोकदमी व वडीलपण देखील मजरे कंचनपूर तुम्ही घेऊन पाच हाजार रु॥ द्यावे त्यापौ॥ तुम्ही विष्णुराम याजवल माहादाजी आबाजी पुरंदरे याच्या नावचे खरीदखत चौथाई मोकदमींचे आम्ही करून दिल्हे आहे त्या खरीदखतापौ॥ येकूणतीससेचालीस रुपयाची गावानी साउकाराची कर्जे घेतली ते खत सोडविली आहे ते रु॥ देऊन साऊकाराची खतें येकूणतीससे चालीसाची सोडविली ते व खरीदखत ऐसे सोडऊन घ्यावे वरकड बाकी रु॥ वीससेसाठ आम्हास द्यावे म्हणोन गावकरी यानी पेगम केला त्यावरून

तुम्ही मान्य केलें आणि सरकारांत आर्ज करून पाटिलकीचा गुमास्ता उठविला तुम्हास गावकरी यानी खरेदखत करून दिल्हे ते समयी पाचसेसाठ रुो व्याजाचे घालून विष्णुरामास पस्तीसे रुपयाचे खत करून दिल्हे हें वर्तमान गावकरी यानी तुम्हास सांगितलें नाहीं पुढें विष्णुरामपंत वारला त्याचा पुत्र बाजीराव हिंदुस्तानांत गेला तो दोन तीन वर्षं तिकडेच राहिला त्यावर तो आला तों तुम्ही श्रीमंतांवर रुसवा करून कारभारांत मन न घाला त्यावर तो चिरंजीव राजश्री मानसिंगराव खेत्री आमचे पुत्र याजकडे आला त्याजकडे मौजे मजकूरची कमाविस होती व तुमचा व चिरंजीवाच स्नेह जाणून आला खरीदखत पुरंदरे याचे नावचे व येकूणतीससे चालीस रुोचे सावकाराची खते सोडविली ती व पस्तीससे रुपयाचा रोखा आणोन दाखविला तुमचे पाटीलकीचे कागद सोडवावे हे चिरंजीवास आगत्य यास्तव जातखत पस्तीससे रुपयाचे त्यास देवून सारे कागद त्याजपासून घेतले ऐसियास पाटिलकी तुमची आणि आपले जातखत गुतलें यास्तव पस्तीसे रुोचे गावकरी याचे खत घेत्ले त्या उपरी पस्तीससे रुपयापौ आकरासे रुो गावच्या यैवजी सरकारचे त्यास दिल्हे बाकी चोवीसे राहिले त्याची मुदत केली इतका कारभार होतच आहे तो श्रीमंत राजश्री सदासिव चिमणाजी ——— भाऊसाहेब निजाम अलीवर मोहिमेस निघाले त्याजबराबर चिरंजीव गेला बराबर पोथींत कागद तैसेच गेले तिकडे निजाम आलीची मोहिम फते जाली त्यावर हिंदुस्तानात आबद आली आला ते तसेच परभारे हिंदुस्तानांत श्रीमंत राजश्री—भाऊसाहेब गेले त्याजबराबर चिरंजीव गेला कागद त्या समागमें गेले तिकडे गेलीयावर लढाई बिघडली चिरंजीव आला नाहीं कागद त्या समागमें चिरंजीवाचे जातखत पस्तीससे रुपयाचे गुंतले बाबुराव विष्णुचे मानस आम्हास रुपयाकरितां उपसर्ग करू लागले पुढें समजाविसी तुमची श्रीमंतानी केली यावर तुम्ही श्रीच्या दर्शनास मौजे मजकुरास आला तुम्हास वर्तमान सांगितले तुम्ही म्हनाला कीं, रुपये देऊ परंतु कागदपत्र बाबुराव विष्णुजवळील खरीदखत व पस्तीसे रुपयाचा रोखा व साउकाराचीं खते सोडविली ती गेली म्हणता पस्तीसे रुपयाचा नवा रोखा गावकरी यापासून जातखत गुतले म्हणोन घेतला ते आवघे कागद नस्तां रुपये कसे द्यावे त्यास तुमची निशा गावकरी यानी तुमच्या तीन तक्षीमाच्या भावानी केली कीं, ते कागदपत्रास विसंबत नव्हते पुणीयाच्या मुकामी कारभार जाला त्यावर परभारे स्वारीस गेले घरास आले नाहींत आम्हास ठाउकी आहे येविसयी दिकत न धरावी म्हणोन निशा केली यावर तुम्ही रुपये देतो म्हणाला त्यावर माहादाजी पाा खिरडीकर याजवळ बाबुराव विष्णु यानें चिरंजीवाचे पस्तीसे रुपयाचे खत ठेविले होते त्यास आम्ही कागद पाठवून खतखुधा आणविला आणि त्यानी खत पस्तीसे रुपयाचे आणले ते तुमच्या स्वाधीन करून त्याची बाकी खतापौ चोविसे रुो राहिले होते ते त्यास देवील तुम्ही देऊन त्याची पावती आलहिदा त्याजपासून

घेतली आहे व आकरासे रुो आम्ही सरकारच्या यैवजी दिल्हे होते ते आम्ही तुम्हापासून घेतले येकूण पस्तीससे रुो सदरहूप्रो तुम्ही देवून चिरंजीवानें तुमचे पाटिलकीकरितां खत बाबुराव विष्णूस दिल्हे होते ते तुम्ही सोडऊन घेतले पुर्ढे- माघे पुरंदरीयाचे नावचे खरीदखत पस्तीसे रुपयाचे गावकरी याचा रोखा चिरंजी- वानें घेतला होता तो व बाबुराव याज (व)ळील पस्तीसे रुपयाचा रोखा चिरंजीवाने आपले जातखत देऊन सोडविले होता तो व एकूनतीससे चालीस रुपयाची साउकाराची खते सोडविली होती ती निघाली तरी रद असेत आपनाजवळ सदरहू कागदांतील कागदपत्र आसोन नाही म्हणत आसलो तरी श्री—सफत असे सन ११७० हे लेहून दिल्हे सही सनोकराये वलद मानसिगराये सदरहू लिहिल्या प्रमाणे सही

पत्राप्रो साक्ष रामचंद्र धोंडदेव दिा पागा मानसिंग निा (कटार)

साक्ष

धोंडी वलद कासी पाा धनगे मौजे मजकूर १
धोंडी वलद झोट पाा कोळी व धोंडी वलद धर्माजी पाा लोढे मौजे माार१
शाबजी वलद दुलबाजी पाा रगताटे मौजे मजकूर १
सटवाजी वलद जीज पाा रगताटे मौजे मजकूर १
संभु वलद कस पाा उगले मौजे माार १
गणेश रकोजी कुलकर्णी मौजे माार १
भवानी विश्वनाथ कुलकर्णी
आसीमदार

१ सिवजी वलद कोडजी उगले
१ त्रिबकजी वलद रेखोजी कोटबकर
१ चिमाजी वलद बहिरजी टेका
१ दाजी वलद बाजी रगताटे
१ भिकाजी सेलका वलद सटवाजी सेलका
१ सुभानजी वलद बालोजी रगताटे

कचोजी वलद तान्हाजी पाा कोळी मजरे कचनपूर १
बहिरजी वलद येस पाा रगताटे मजरे कचनपूर १
आभानजी वलद शाबजी पाा मजरे कचनपूर १
खेवजी वलद म्हसाजी पाा उगले मजरे कचनपूर १
रामजी वलद दयाजी लोहालाना चौगुला १
निा नागर (नागराची आकृती)

कारु

सकंभट वलद केशोभट मूळे
सदाशीव वलद बचंभट हा ! संखभट
सुभान वलद मलिकजी मुला
१ पुजाजी वलद त्रिबकजी व सजणाजी वलद सोनजी सुतार
१ नागोजी वलद जयेतु लोव्हार

१ येसाजी वलद सटवाजी जावक
१ नारायण वलद चांदु कापा
१ मल्हारजी वलद आंताजी उगला
१ दारकू वलद संभु तारा
१ भवानी वलद यासी आवटी माहादजी पा तनपुरे मौजे खिरडी गणेश पा पाटवदे
(निशाणी नांगर)
बिा हारबाजी आबाजी कुळकर्णी कसबे संवछर गुा मौजे मार

१ नहली वलद जाखू चाभार व केरु वलद खंडू चांभार
१ ताहुजी वलद आंदु नाहावी व माहादू वलद मकुंद नाहावी
१ राणु वलद हरकजी कुभार व बावाजी वलद सटवाजी कुंभार
१ मुका वलद येसु परीट व चेनु वलद भिमाजी परीट
१ तुका वलद येमा माहार व पुंजा वलद मुगा माहार व सिवा वलद सटवा माहार व किंवा वलद देऊ माहार

बिा मल्हार त्रिंबक कुलकर्णी मौजे मार
तेरीख छ २६ माहे सवाल सन हाजार ११७०

८९

गोविंद हरी जोशी यांचा वाडा व वंश

श्री { श. १७०५ ज्येष्ठ शु. १३ शुक्र. इ. १७८३ जून १३

खरेदीखत शके १७०५ शोभननाम संवछरे ज्येष्ठ शुा १३ त्रयोदसी ते दिवसी खरेदीकर्दे राजश्री गोविद हरि जोशी यासी फरोख्तकर्दे बालाजी काकाजी व गोपाल काकाजी भणगे हाली वस्ती कसबे पुणे कारणे खरेदीखत लेहून दिल्हे ऐसी जे आपले घर कसबे मजकुरी काले वावरात राजश्री सचीवपंत याचे पश्चमेस होते ते आमचे तीर्थरूप काकाजी भणगे याणी तुम्हापासी गाहाण घर जागा इमला व विहीर-सुधा ठेऊन तुम्हापासोन रुा घेतले होते त्यास हाली आपले तीर्थरूप निवर्तले याजमुले लोकाचे कर्जवाम देणे सबब सदरहू जागा इमला विहीर सुधा तुम्हास आपले खुश-रजावंतीनें खरेदी दिल्हे आणि किंमत रुा १५०० पंधरासे घेतले असत जाग्याचे लांबी रुंदीची हद्देची चतुःसीमा कलमे बितपसील

पूर्वेकडील जंगनाथ नाईक दलाल याचे घराची चादई समाईक [1]असे कलम १

पश्चमेकडे गोपाल गणेश प्राणी याचे घराची पूर्वेकडील चादई आहे ती समाईक असे कलम १

उतरेकडे सोप्याची चादई आहे त्याचे

---

१ हा शब्द ओळींत कांहीं चुकून लिहिला गेलेल्या शब्दांत लिहिला पण तो अस्पष्टच राहिला; म्हणून स्वतंत्र ओळींत पुनः लिहिला आहे व त्यापुढें कलमाचा आंकडा घातला आहे.

उतरेस फौजदार निा सरकार याची जागा लगत आहे कलम १

उतरेकडे सोप्याची चादई आहे त्याचे उतरेस फौजदार निा सरकार याची जागा लगत आहे कलम १

पाणी उतरेकडील जाग्यात पडते

तुम्हास जागा दिल्ही त्याची लाबी-रुंदी पंधरा तसूचे हाते खेरीज चादया रुंदी पूर्वपश्चम हात खेरीज भिंती करून हात सुमार २१

दक्षणउतर हात खेरीज भिंती हात सुमार ५० येणेप्रो रुंदी येकवीस हात व लाबी पनास असे कलम १

~- च्यार कलमे लेहून देऊन जागा इमला विहिरीसुध्धां तुम्हास दिल्ही असे आतःस्पर आपणास सदरहू घराविसी समंध राहिला नाही आपले वंसीचे आथवा इतर हरकोणी या जाग्यासी व इमल्यासी हारकत करील त्याचा जाब आपण करूं हा+ कागद लिहून दिला सही बालाजी काकाजी व गोपाल काकाजी भणंगे हे लिहिले सही

साक्ष

१ *पत्राप्रो साक्ष दामोदर धोडदेव प्राणी

‡ पत्रप्रो साक्ष सदासीव सदानंद भागानगरकर

श्री

{ श. १७१२ मार्ग. शु. ३ बुध
इ. १७९० डिसें. ८ }

कबाले पत्र कोतवाली शहर पुणें विा घासीराम सामलदास+ रा गोविंद हरी जोसी वाा पेठ शुक्रवार शहर मजकूर सुाा इहिदे तिसैन मयां व अलफ सन १२०० शके १७१२ साधारण नाम संवत्सरें दिल्हें कबाले पत्र यैसे जें बालाजी काकाजी व गोपाल काकाजी भणगे वाा पेठ मजकूर याची जागा पेठ मजकुरीं सोपा कवलार दीड मजला खण सुमार ६ पीछवाड्यास उतरेस होते ते व जाग्यांत विहिर आहे ती जागा आगवाड्या पीछवाड्यासुधां इमल्यासमेत तुम्हास विकत दिल्ही त्याची किमत रुा १५०० पंधरासे त्याणी तुम्हापासून घेऊन जागा स्वसंतोषे देऊन खरेदीपत्र करून दिल्हे ते तुम्ही चौत्रां आणून दाखविले त्याजवरून चौत्रांहून गणेश रंगनाथ कारकून व गोधु बिन लक्ष्मण गवड्या चाकर निा सरकार यास पाठऊन हाली जाग्यात नवी इमारत पुढील तोंडी दक्षणेस रस्त्याचे हद्देस सोपा कवलार दीड मजला खण सुमार ५ पांच व उतर आंगे सोपा कवलार येक मजला खण सुमार ६ येणेप्रो बाधिले त्या अन्वये जाग्याची मोजणी करून कलमे करार करून दिल्ही बिा

+ * ‡ तिन्ही अक्षरें भिन्न. कागदास एक जोड आहे. कागदावर मुद्रा इत्यादि नाहीं व कारण नाहीं. कागद अस्सल आणि विश्वसनीय आहे.

लांबी दक्षण उतर आगवाड्यास दक्षणेस रस्त्याचे हद्देस सोप्याचे भिंतीचे आसारसुधा पछिवाड्यास उतरेस हद्देचे सोप्याचे भिंतिचे आसार सुधां गज सुमार ३४।३ यासी चतुःसीमा शेजार

१ पूर्वेस सदासीव सदानंद भागानगरकर याचे घर कवलार

१ पश्चमेस दामोदर धोंडदेव प्राणी याचे घर कवलार

१ दक्षणेस मधीं रस्ता पूर्वपश्चम जात असे रुंद दक्षण उतर गज सुमार ८॥ पलिकडे रामाजी विठल गडबोले+ या थट्टीवाल्याचा शोध करणें आहे. याचें घर कवलार

१ उतरेस पीलखाना सरकारचा असे

४

रुंदी पूर्वपश्चम गज सुमार

१५॥३ यैन गर्भी गज

.।१ चांदई पूर्वेकडील अैन रुंद गज .॥ पौ निमे सदासीव सदानंद भागानगरकर याची गज .।१ बाकी तुमचे घराखाली गज

.॥. चांदई पश्चमेकडील यैन रुंद गज १ पो निमे दामोदर धोंडदेव प्राणी याची गज .॥. बाकी तुमचे घराखाली गज सुमार

१५॥।४

घरास शेतखाना आगवाड्यास दक्षणेस रस्त्याचे हद्देस सोप्याचे भिंतसि पूर्व आंगे सुमार २ दोन आहेत खिडक्या रस्त्याकडे दक्षणामुख असेत कलम १

पछिवाड्यास जाग्यात मधीं विहीर असे कलम १

उतरेकडील सोप्याचे पाणी पावसाचे पलिकडे पीलखान्याचे जाग्यांत पडत असे कलम १

घराचें पाणी मोरी बांधोन सिरस्तेप्रमाणें रस्त्याचे मोरीस मेळवावे कलम १

घराचा आगवाडा दक्षणामुख असे कलम १

येकूण लांबी सवा चवतीस तीन तसुं रुंदी पावणे सोळा गज च्यार तसुं व कलमें नऊ येणेप्रमाणे जागा तुम्हाकडे करार करून देऊन किमतीच्या रुपयावर सरकार सिरस्ता दर सदे रुो १० प्रो रुपये १५० दीडसे होतात त्या × सरकारची सनद छ ३ सफर सन मारची सादर जाली तेथे लिहिले की राजश्री गोविंद हरी जोसी याणी बाळाजी काकाजी व गोपाल काकाजी भणगे याचे घर काले वावरात शुक्रवार पेठेंत होते ते खरेदी किमत रुा १५०० पंधराशास केले आहे त्याचा कबला सिरस्तेप्रो होईल त्यापौ निमे मारानिलेचे नावे माफ खर्च लिहून निमे सरकारात

+ येथें. (यांचें आडनांव थट्टीवाले असेंहि आहे.) १ '~ श्री ०२ पंत प्रधान चर ३ णितत्पर घाशीराम ४ सावलदास कोत ५ वाल शहर पु ६ णे निरंतर' असा ६ ओळींचा वाटोळा दोन वळयी शिक्का आहे.

घेऊन खरेदी खताप्रमाणे कबाल पत्र करून देणे त्याजवरून दीडसे रुपयांपैकीं निमे सरकारांत घेऊन बाकी निमे माफखर्च लिहून हे कबालेपत्र तुम्हास भोगवटियास करून दिल्हे असे तर सदरहू जाग्यांत इमारत बांधून तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सुखरूप नांदणे जाणीजे छ १ राखर [1]मोर्तब सुद[2] (मोर्तब सुद) (वर्तुळी आकारांत)

बार

श्री { श. १७१३ भाद्र. व. ७ सोम.
इ. १७९१ सप्टं. १९

खरीदीपत्र चौत्रा पेठ शुक्रवार शेहेर पुणे सुा इसने तिसैन मया व अलफ शके १७१३ विरोधीकुतनाम संवत्सरे भाद्रपद वद्य ७ ते दिवसी राजश्री गोविंद हारी जोसी तुम्ही चौत्रे मजकुरी येऊन विदित केले की बालाजी काकाजी व गोपाल काकाजी भणगे याचे घर सोपा कौलारी दीड मजला खण ६ पीछ वाड्यास उतरेस होता व जाग्यात मधी विहिर होती ती जागा आगवाडे पीछवाडे सुधां इमल्यासमेत किमत रुा १५०० पधराशे आम्ही भणगे मजकूर यास आम्ही देऊन विकत घेतली आहे त्याचे खरीदीपत्र आम्हास करून द्यावे त्याजवरून भणगे मजकूर याणी तुम्हास आडोसीपडोसी याचे साक्षीनसी खरीदीखत करून दिल्हे आहे ते तुम्ही चौत्रा आणून दाखविले त्याजवरून चौत्राहून चौकसी मनास आणोन जाग्याची मोजणी व कलमे करार करून दिल्ही गज मोजणी गज ——— सुमार

(लांबी रुंदी चतुःसीमा व कलमें वरील दोन पत्रांत आलेप्रमाणें)

जागा भणगे मार याणी तुम्हास दिल्ही त्याप्रा जागा मोजून तुमचे दुमाला करून जाग्याचे किमतीवर सरकार सिरस्ता दरसदे रुा ५ प्रोक्त रुा ७५ पाउणसे येणे त्यास तुम्ही सनद छ ३ सफर सन इहिदे तिसैनची की गोविंद हारी जोसी याणी कालेवावर पेठ शुक्रवार येथे... (भणगे) याचे घर होते ते खरीदी किमत रुा पंधराशास केले आहे त्याचे शेल्याचा आकार शिरस्तेप्रा होईल त्यापो निमे मार-निलेचे नावे माफ खर्च लेहून निमे सरकारांत घेऊन खरीदीपत्राप्रो पेठेचे पत्र करून देणे याजवरून निमे रुा साडेसदतीस रुा तुम्हास माफ करून निमे घेऊन चौत्रा जमा करून हे पत्र तुम्हास भोगवटियास करून दिल्हे तरी सुखरूप नांदणे छ ५ मोहरम

मोर्तब

सुद

---

१ अक्षर वेगळें. २ कागदास एक जोड व जोडावर दोन मोर्तब उठविले असत. ३ मुद्रा व समाप्ती मुद्रा यांवर शिखरासारखी एक लहान कमान दाखविली आहे.

अक्षर भिन्न व घोसीरामाच्या मोर्तबाहून मोर्तब वेगळा कागदास एक जोड व जोडावर तीन मोर्तब आहेत.

(कागदाच्या उजव्या बाजूस थोडा समास सोडला असून त्यांत प्रारंभींच आडव्या ओळींत) बिा जनार्दन धोंडदेव कारकून निा मोरो मल्हार तुटकणे कुलकर्णी पेठ मजकूर असा भिन्नाक्षरांत मजकूर म्हणजे सही आहे.]

सुमारें तीनशें वर्षांपूर्वी रत्नागिरी जिल्ह्यांतील वरवडें नांवाच्या गांवीं कान जोशी व केस जोशी या नांवाचे दोघे बंधु राहात असत. ते शांडिल्य गोत्री ऋग्वेदी चित्पावन ब्राह्मण. त्यांच्या घराण्याचें कुलदैवत केळुसन्याचा लक्ष्मीकेशव हा आहे. ते दोघे बंधु मोठे धुरंधर विद्वान् ज्योतिषी होते. फलज्योतिष वर्तवण्यांत ते मोठे प्रवीण होते. त्यांचा लौकिक ऐकून जंजिऱ्याच्या शिद्दीयुसुफ यानें त्यांना आदरपूर्वक आपल्या राजधानींत बोलावून नेलें. त्यावेळीं शिद्दीवर कांहीं राजकीय संकट उद्भवलें होतें. त्या बाबतींत त्यानें वरील दोघां ज्योतिषी बंधूंस प्रश्न विचारला. त्याचें त्यांनीं जें उत्तर दिलें तें युसुफला त्यांनीं सांगितलेल्या मुदतींत पटलें आणि मुसलमान संकटमुक्तहि झाला. त्यामुळें त्यानें ह्या दोघां ज्योतिषी बंधूंवर मर्जी सुप्रसन्न होऊन त्यांना त्यांच्या विद्वत्तेबद्दल पारितोषिक देण्याचें योजिलें आणि कान जोशी यांना पोमेंडी गांवची वार्षिक बाराशें रुपये उत्पन्नाची खोती इनामी जमीन देऊन केस जोशी यांना पालशेत येथील तेवढ्याच उत्पन्नाची खोती दिली व तो उपकारमुक्त झाला. कान जोशी हा कृष्ण जोशी याचा अपभ्रंश असून, केस जोशी हा केशव याचा अपभ्रंश आहे.

याप्रमाणें दोघां बंधूंना खोती इनामें मिळाल्यानंतर ते वरवड्याहून निघून आपापल्या इनामी खोती जमीनींकडे गेले व कारभार करूं लागले. त्याचवेळेपासून त्या दोघां बंधूंचीं दोन स्वतंत्र घराणीं कोकणांत निर्माण होऊन परस्परांचा संबंध सर्वस्वी तुटला.

कान जोशी हे आमच्या गोविंद हरीचे पूर्वज होत. गोविंद हरि हे कान जोशां-पासून नववे पुरुष असून, त्यांचाच इतिहास यापुढें सांगावयाचा आहे.

कान जोशांपासून गोविंदपंतांपर्यंतच्या नऊ पिढ्यांत कर्तबगार पुरुष कोणीच निघाला नाहीं व दिवसेंदिवस कुटुंबीयांची वाढ मात्र होत होती. त्यामुळें वार्षिक उत्पन्न पुरेनासें होऊन आपसांत धुसफुस व भाऊबंदकी यांना ऊत आला. सर्व कुटुबीयांना दारिद्र्य ग्रासूं लागलें.

गोविंदपंतांचे वडील हरिपंत वारले तेव्हां त्यांना–बाळाजी, धोंडदेव, गोविंद आणि रघुनाथ असे चार मुलगे होते. सर्व कुटुंबाची व्यवस्था थोरलेपणामुळें बाळाजी बघत असत. त्यांचे धाकटे बंधु धोंडदेव हे, त्यांना दाजी व बापु या नांवांचे दोन

मुलगे झाल्यावर निवर्तले. त्यामुळें त्या दोन अर्भकांचा विशेष भार बाळाजीपंतांवरच पडला. एकंदर गृहस्थिति पाहून गोविंदपंतांचें मन विटलें. त्यांना आपला स्वतंत्र पंथ निर्माण करण्याची इच्छा झाली व त्याप्रमाणें ते त्या उद्योगाला लागले.

गोविंदपंत हे जात्या मोठे बुद्धिमान् आणि कर्तृत्वशील असून मेहनती होते. त्यांनीं प्रथम पुण्यास जाऊन आपल्या दैवाची परीक्षा पाहण्याचें योजिलें. परंतु पानिपतची लढाई जाऊन पुण्याच्या पेशवाईवर त्यावेळीं जे थोरले माधवराव विराजमान झाले होते त्यांचे आणि त्यांचे चुलते रघुनाथराव यांच्यांत बेबनाव झाल्यामुळें अशांतता उत्पन्न झाली होती. अशा वातावरणांत आपण जाऊन तेथें आपली डाळ शिजेल असें त्यांना वाटलें नाहीं. इतक्यांत त्यानीं, पानिपताहून जखमी होऊन आलेल्या महादजी शिंद्यांना शिंदेशाहीचीं वस्त्रें मिळून ते उज्जयनीस गेले असल्याचें वृत्त समजलें तेव्हां त्यांच्याच आश्रयाला जाऊन मुलुखगिरी करण्याचा त्यांनीं आपला निश्चय कायम केला.

वर सांगितल्याप्रमाणें गोविंदपंतांनीं आपला निश्चय कायम केल्यावर, थोरले बंधु बाळाजीपंत यांस त्यांनीं तो निवेदन केला व त्यांची आज्ञा घेऊन ते धोंडोपंतांचा मुलगा दाजी व आपली पत्नी यांसह पोमेंडी सोडून बाहेर पडले. त्यावेळीं त्यांना स्वतःला मूलबाळ झालेलें नव्हतें व पुतण्या दाजी ह्याच्यावर त्यांचें प्रेम होतें. म्हणून त्याला त्यांनीं बरोबर घेतला.

महादजी शिंदे यांना आपल्या संस्थानाची बिघडलेली घडी पुन्हां व्यवस्थितपणें बसवायची असल्यानें आपल्या अधिकाराखालील प्रदेशांत आपले शत्रुमित्र कोण आहेत या गोष्टींची बित्तंबातमी ठेवणें प्राप्त झालें, आणि त्यालाच अनुसरून त्यांनीं अनेक गुप्त हेरांची योजनाही केली होती. आपल्या राज्यांत नवा कोण कोठून कां आला आणि राज्यांतून बाहेर कोण कोठें कां गेला, या गोष्टींच्या बातम्या त्यांना नित्य हेरांकडून समजत असत.

गोविंदपंत जोशी उज्जयनीस जाऊन पोंचल्यावर त्यांची वर्दी अनायासेंच हेरांकडून महादजींना समजली व त्यामुळें त्यांची महादजींशीं भेट होण्यास फारसा विलंब लागला नाहीं. गोविंदपंतांना शिंद्यांकडून बोलावणें आलें. ते त्यांच्या भेटीस गेले. आपला उज्जयनीस येण्याचा उद्देश यात्रेचा नसून पोटपाण्याऱ्या व्यवस्थेचा असल्याचें त्यांनीं त्यांना सांगितलें. तरणीताठीं, हुषार, बुद्धिमान व चलाख माणसें महादजींना हवींच होतीं. पूर्वीच्या कारभारांतील लाचलुचपतींनीं मंडित झालेल्या वर्तनाचीं माणसें त्यांना युक्तिप्रयुक्तीनें दूर करायचीं असल्यानें, आश्रयार्थ नवीन आलेल्या तरण्या तरतरीत माणसांना ते आश्रय देऊं लागले होते. महादजींना माणसाची पारख फारच चांगली व तत्काळ करतां येत असे. त्याच त्यांच्या स्वभावाला अनुसरून

त्यांनीं गोविंदपंतांच्या स्वभावाची तत्काळ पारख केली व त्यांना आपल्या फडणिशी खात्यांत एक आसामी देऊन रुजू करून घेतलें. यदृच्छेनें अनुकूल काल आला म्हणजे अशीच अनायासें संधि उत्पन्न होत असते. गोविंदपंत दुसऱ्याच दिवसापासून आपल्या नेमणुकीवर रुजू झाले.

उत्तरेकडील मराठ्यांच्या मुलखांत गोहदच्या राजानें उपद्रव देण्याचें काम सुरू केल्यानें, उज्जयनीहून महादजी शिंदे यांना कांहीं काल आपला मुक्काम हालवून ग्वाल्हेर मुक्कामीं जावें लागलें. त्यामुळें त्यांच्या लवाजम्यासह त्यांना आपल्या राजकीय कचेऱ्याहि तिकडे घेऊन जाणें भाग पडलें. ग्वाल्हेरीस जाऊन वास्तव्य केल्यावर गोहदच्या राज्याचा बंदोबस्त करण्याचें काम महादजींनीं हातीं घेतलें.

मराठेशाहींत घोड्यावर उत्तम बसतां येणें आणि तलवार चालवणें या दोन गोष्टी मुख्यत्वें सर्व नोकरचाकरांना अवगत असणें आवश्यक असे. ही प्रथा थोरल्या शिवाजी महाराजांपासून चालत आलेली होती. महादजी शिंदे यांनीं तोच प्रघात आपल्या कार-कीर्दींत सुरू ठेवला होता. ह्याच दंडकाला अनुसरून गोविंदपंतांनाहि दोन्ही कला अव-गत असणें आवश्यक होतें. गोविंदपंत ह्या दोन्ही कलांत तरबेज होते. ते ग्वाल्हेरीस गेल्यावर त्यांची हुषारी व काम करण्याची शिस्त पाहून महादजींनीं त्यांना आपली फडणिशी दिली. प्रसंगाप्रसंगानें गोविंदपंतांना गोहदच्या ठाण्यावर करायच्या स्वारीबरोबर हातीं तलवार धरून जाणें प्राप्त झालें. त्यावेळीं बंदुकवाले दहा आरब त्यांच्या दिमतीस देण्यांत आले. त्या पायदळ आरबांसह गोविंदपंत घोड्यावर बसून महादजींच्या सेनेबरोबर गोहदच्या राण्यावर चालून गेले. त्या झुंजांत त्यांनीं जें कौशल्य दाखविलें त्याबद्दल महादजी त्यांच्यावर प्रसन्न झाले. राण्याचा बंदोबस्त करून महादजी ग्वाल्हेरीस परत आल्यावर त्यांनीं गोविंदपंतांचा दर्जा वाढविला त्यांच्याकडे फडणिशी होतीच त्याशिवाय त्यांच्याकडे तिच्या जोडीस कोतवालीचें काम देण्यांत येऊन दहांच्या ऐवजीं पंचवीस आरबांचा बेहेडा त्यांच्या दिमतीस देण्यांत आला. अशा या जोड नौकरीबद्दल गोविंद-पंतांना शिंद्यांकडून आठ हजार चारशें चाळीस रुपयांचें वर्षासन सुरू झालें. गोविंद-पंतांचा ग्वाल्हेरच्या शिंदेशाहींत उत्तरोत्तर उत्कर्षच होत होता. त्यांची भरभराट होत चालली तशी त्यांनीं ग्वाल्हेरीस स्वतः राहण्याकरतां स्वतःच्या मालकीचें एक प्रशस्त असें दुमजली घर बांधिलें आणि आपल्या त्या घराभोंवतीं आपल्या आश्रितांसाठीं स्थायिक लष्करीवजा पडव्या उभारल्या. तें ठिकाण पुढें फडनविसांचा गोट या नांवानें प्रसिद्ध झालें. तें ठिकाण अद्यापी ग्वाल्हेरीस त्याच नांवानें प्रसिद्ध आहे.

गोविंदपंतांना ग्वाल्हेरीस दोन मुलगे झाले. त्यांतील थोरल्याचें नांव मोरोबादादा आणि धाकट्याचें नांव भिकाजीपंतबाबा. याप्रमाणें गोविंदपंतांचा संसार रंगांत येऊं लागला. तत्कालीन जनरूढीप्रमाणें त्यांनीं आपल्या दोन्ही मुलांचीं लग्नें अल्पवयां-तच केली. पुतण्या दाजीबा याचें लग्न करून दिलें. याप्रमाणें गोविंदपंतांचे दिवस

सुखाचे जात असतां सुमारें वीस वर्षांनीं त्यांच्या सुखांत न्यूनता येण्यास प्रारंभ झाला. त्यांचें कुटुंब सौ. राधाबाई नवज्वरानें निवर्तल्या. गोविंदपंतांना हा धक्का फारच जाणवला. त्यांचें मन उदास झालें. त्यांना वैराग्य उत्पन्न होऊं लागलें. इतउत्तर सेवाधर्माला रामराम ठोकून परत कोंकणांत घरीं जावें असें त्यांचें मन त्यांना सांगूं लागलें. त्यावेळीं त्यांनीं आपलेजवळ संपत्तीहि बरीच जमविली होती. शेवटीं त्यांनीं कोंकणांत जाण्याचा आपला निश्चय कायम केला.

गोविंदपंतांचा पुतण्या दाजीबा हा खुशालचेंडू बनला असल्यानें तो त्यांच्या मागें त्यांची फडणिशी संभाळण्यास लायक नव्हता, म्हणून त्यांनीं आपला धाकटा मुलगा भिकाजीपंत बाबा यास शिंदे दरबारांतून आपली असामी देवविली. त्यांच्या जागीं तो रुजू झाल्यावर त्याच्यापाशीं दहा हजारापर्यंतचा ऐवज ठेवून कुंटे ह्या आडनांवाच्या एका गृहस्थास कारकून म्हणून मदतीस दिलें (परिशिष्ट पृ. १११ पहा).

त्या काळीं दूरचा प्रवास त्वरित व्हावा म्हणून उंटाची योजना करीत असत. गोविंदपंतांनीं आपल्या प्रवासाकरितां एक दहा उंटांचा काफिला भाड्यानें ठरविला व ते, आपला मुलगा मोरोबा व त्याची पत्नी सौ. यमुनाबाई या जोडप्यासह कोंकणांत जायला निघाले.

कोंकणांत घरीं जाऊन पोंचल्यावर आपल्या जिवंत असलेल्या थोरल्या व धाकट्या अशा दोघां भावांस प्रत्येकीं, दागदागिने व रोकड असा दहा दहा हजारांचा ऐवज दिला व मेलेल्या धोंडोपंतांच्या दोघां–दाजी व बापू–या पुतण्यांस प्रत्येकीं पांच पांच हजारांचा ऐवज दिला. ग्रामदेवता श्रीरामेश्वर याचें देवालय बांधविलें आणि सातान्यास जाऊन राहण्याचें ठरविलें. परंतु थोरले बंधु बाळाजीपंत यांचा फारच आग्रह पडला म्हणून कोंकणांतीलच एका सुशील कुटुंबांतील बया नांवाच्या मुलीशीं आपला विवाह करून घेतला.

विवाहानंतर गोविंदपंत हे आपली नूतन पत्नी, मुलगा आणि सून यांच्यासह कोंकणांतून निघाले व मढें घाटांतून सातान्याकडे चालले. घाटांत त्यांचे फार हाल झाले. असेच इतर प्रवाशांचेहि हाल होत असतील असें मनांत आणून, घाटाच्या पायथ्याशीं असलेल्या माढें नांवाच्या गांवीं आल्यावर त्यांनीं तेथें दहा हजारांची शेती खरेदी करून पांच पांथस्थ ब्राह्मणांच्या अन्नछत्राची योजना केली, व त्याची व्यवस्था तेथीलच एका गोडशे नांवाच्या सच्छील ब्राह्मणाकडे सोंपविली. तें अन्नछत्र पेशवाईच्या अखेरपर्यंत चांगलें चाललें होतें. पुढें गोडशे घराण्यांतील मंडळी चंगीभंगी निघाल्यानें त्या घराण्याबरोबरच त्या अन्नछत्राचेंहि दिवाळें वाजलें.

गोविंदपंत तेथून सहकुटुंब सातान्यास येऊन कांहीं दिवस राहिले व त्या मुक्कामावरून त्यांनीं आपल्याबरोबर ग्वाल्हेरीहून आणिलेल्या निम्या उंटांना रजा दिली

आणि बरोबर आणिलेल्या पांच बंदुकबंद आरबांपैकीं तिघांना परत धाडून दोन आपल्याबरोबर पुण्यास नेण्यास ठेवून घेतले.

पुण्यास पेशव्यांचे खासगीवाले शिवराम गोविंद यांचा व गोविंदपंतांचा पत्रोपत्रींचा पूर्वऋणानुबंध असल्यानें पुण्यास गेल्यावर ते त्यांच्याकडेच प्रथम उतरले. शनिवारवाड्याच्या तटापलीकडे दक्षिणेस जो सध्यां बिनीवाले यांचा वाडा आहे त्या जागेवर त्यावेळीं **खाजगीवाले यांचा वाडा** होता. तो दुसरे बाजीराव यांच्या कारकीर्दींत जळाला.

त्यावेळीं पुण्यास सवाई माधवरावांची कारकीर्द सुरू होती. आणि सर्वत्र उत्तम प्रकारची आबादानी असल्यानें पुण्यासच स्थाईक होण्याचा गोविंदपंतांनीं बेत केला. खासगीवाले यांचेमार्फत काळ्या वावरांतील थट्टीवाले यांच्या शुक्रवार पेठेंतील सचीवपंत यांच्या वाड्याच्या पिछाडीजवळच्या वाड्यासमोर असलेली **भणगे यांची** बखळ खरीद केली व तेथें आपल्यास राहण्यास वाडा बांधण्याचें काम सुरू केलें. या बखळीच्या उत्तरेकडील भिंतीला लागूनच **सरकारी पीलखाना** होता. त्याला लागून प्रथम गोविंदपंतांनीं आपणांस राहण्यास एक दुघई दुमजली इमारत बांधली व तिच्यांत ते सहकुटुंब जाऊन राहिले. नंतर त्या इमारतीच्या पुढें दक्षिणेच्या बाजूस मध्यें विहीर सोडून त्यांनीं एक तिघई तिमजली इमारत बांधण्यास सुरुवात केली. ह्या इमारतीचा पहिला मजला उत्तम बांधून तयार झाल्यावर त्यावर दोन मजल्यांची पक्की उभारणी चालू असतां गोविंदपंत विषमज्वरानें आजारी झाले व त्यांतच त्यांचा अंत झाला. पुढें ही इमारत त्यांचे चिरंजीव मोरोपंत यांनीं कशी तरी पुरी बांधवून काढली.

गोविंदपंतांच्या पश्चात् त्यांची तरुण विधवा पत्नी बयाबाई व तिचे सापत्न चिरंजीव मोरोबा यांचें पटेनासें झालें. त्यामुळें दोन चुली मांडल्या गेल्या. याप्रमाणें अठरा वर्षांचा काळ लोटला. मोरोपंत सावसावकारी करून आणि पेशव्यांच्या फडांत कांहीं दिवस नौकरी करून कालक्रमणा करीत होते. अशा वेळीं सवाई माधवरावांचा अंत होऊन त्यांच्या जागीं दुसरे बाजीराव यांची कारकीर्द सुरू झाली होती. त्यांनीं विठूजी होळकराला राजकीय गुन्ह्यामुळें हत्तीच्या पायाशीं बांधून ठार मारविलें. ही गोष्ट त्याचा कनिष्ठ भाऊ यशवंतराव होळकर यास इंदुरास समजतांच तो तेथून सूड घेण्याकरितां ससैन्य निघाला. होळकर चालून येतो असें ऐकतांच बाजीराव घाबरले व महाडाकडे पळून गेले. त्यामुळें पुणें शहर निर्नायकी झालें. पुण्यांतील वस्ती हवालदील झाली. जो तो आपल्या बचावाचा रस्ता पाहूं लागला.

त्यावेळीं गोविंदपंतांची विधवा पत्नी कोंकणांत निघून गेली व मोरोपंतांनीं आपलें कुटुंब माढें येथील अन्नछत्राचे आश्रयाला नेऊन पोंचविलें. त्यावेळीं मोरोपंतांना गोविंद व आवडाबाई नांवाचीं दोन अपत्यें झालेलीं होतीं. हीं दोन मुलें व पत्नी

सौ. यमुनाबाई यांना माढ्यास ठेवून मोरोपंत पुण्यास परत घरीं आले. ते गहाण-पाणादि सावकारी करीत असल्यानें त्यांचेपाशीं लोकांच्या अनेक वस्तु होत्या. त्या ज्यांना त्यांना परत पोंचविण्याच्या भानगडींत ते असतांच होळकर पुण्यावर आला व गांवांत लूटफाट सुरू झाली. मोरोपंत घाबरले व आपल्या एका मित्राकडे जाऊन राहिले. थोड्याच दिवसांत होळकराच्या लोकांनीं त्यांना धरून नेलें. ते त्यांचेपाशीं खंड मागूं लागले. त्यावेळची ती भयंकर हकीकत त्यानीं स्वहस्तें लिहून ठेविली आहे. तिचा त्रोटक उतारा पुढील प्रमाणें:—

'.... सन सलास मैयातैनांत होळकराचा दंगा पुण्यांत जाहला. शहरांतून बाहेर जाणें होईना. तेव्हां घरींच होतों. कांहीं दिवस एका गृहस्थाचे घरीं छपून राहण्यास गेलों. परंतु तेथें आमचा शोध करीत होळकराचे लोक आले. त्यांनीं आम्हांला धरून नेलें, आणि पटवर्धन (!) यांचे वाड्यांत पाहाऱ्यांत ठेवले. हाल करूं लागले. पुढें चाप टाकले. त्यांनीं आम्हांपासून कमरखुलाईकरतां शंभर रुपये घेतले. तेथून हरिपंत भावे यांनीं आम्हांस लष्करांत नेऊन सुरजमल सावकार याचे मोहोल्यांत ठेविलें. तेथें अंगठे धरायला लावून पाठीवर धोंडे ठेवले. गळ्यांत बंदुका अडकवून राखेचा तोबरा दिला. पुढें तापले तवे टाकले. फार हाल केले. सहा उपोषणें घातलीं. प्राण जातो असें झालें. ते समयीं भावे यांचा कारकून येऊन सांगूं लागला कीं, पंधरा हजारांपर्यंत खंड देऊन सुटून जावें. आम्ही कबूल झालों, पण रक्कम कोणी देईना. घर लूटलें गेलें होतें. घरांत कांहींच ऐवज राहिला नव्हता. ते समयीं पुण्याबाहेरील मैदानांत नेऊन तापलेले तवे पुढे टाकले. जीव जातो. आतां प्राण वांचत नाहीं. असा प्रसंग आमच्यावर आला. तेव्हां कांहीं चीजवस्त छपवून ठेवली होती ती व रोख बारा हजार रुपये देऊन शहरांत परत आलों. ' इत्यादि.

या पुढील मोरोपंतांचें आयुष्य मोठ्या कष्टाचें गेलें. त्यांना त्यानंतर आणखी एक पुत्र झाला. त्याचें नांव त्यांनीं धोंडदेव असें ठेवलें. कन्या आवडाबाई हिला साताऱ्च्या फाटक आडनांवाच्या घराण्यांत लग्न लावून दिली. श्रीमंती व दारिद्र्य ह्या दोन्ही अवस्था मोरोपंत यांनीं आपल्या आयुष्यांत भोगल्या. होळकराच्या दंग्याच्या वेळीं त्यांनीं आपलें कुटुंब माढ्यास नेऊन ठेविलें होतें त्यांच्याजवळ जो वीस पंचवीस हजारांचा ऐवज होता त्यावर त्यांनीं, गहाणदारांचें कांहीं देणें देऊन आपलें आयुष्य कंठलें. अशा स्थितींतही त्यांनीं कोणाचें देणें केलें नाहीं, घराचें रक्षण केलें आणि अब्रूंत दिवस काढले. थोरला मुलगा गोविंदा याचें शिक्षण व लग्न करून त्याला शेषापा नाईक पाच्छापूरकर यांच्या पेढीवर दीडशें रुपये सालीना वेतनावर गुंतविलें. धाकटा मुलगा धोंडोपंत लहान असतांच पांचव्या वर्षी त्याची त्यांनीं मुंज केली व नंतर ते थोड्यांच दिवसांत स्वर्गवासी झाले. तेव्हां कुटुंबाचा सर्व भार त्यांचा थोरला मुलगा गोविंदपंत काका यांच्यावर पडला. पेशवाई नष्ट झाली त्या सालीं ते एकोणीस

वर्षांचे होते. त्यांनींच आपल्या धाकट्या भावांचें सर्व प्रकारें संगोपन केलें. धोंडोपंतांचें शिक्षण गोविंदकाकांनीं केलें. त्यांनीं पुढें रेव्हेन्यु खात्यांत परीक्षा देऊन नोकरी धरली. ते पुढें फडनवीस होऊन मामलेदार झाले व थोड्याच अवधींत त्यांनीं सासवड येथें कैलासवास केला. ते अत्यंत शिवभक्त होते. ते रोज दोन वेळ सांजसकाळ सांबाची पूजा करीत असत. त्यांच्या पूजेचा सिंहांबरी चंद्रमौळी बाण होता. तो अद्यापि त्या घराण्यांत रोज पूजिला जात आहे. धोंडोपंतांना नारायणराव आणि गोदावरी अशीं दोन अपत्यें होतीं. नारायणराव हे प्रसिद्ध वैयाकरणी होऊन गेले. ते ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्राध्यापक होते. त्यांनीं पेन्शन घेऊन स्वर्गवास केला तेव्हां त्यांचे-रामचंद्र बाबा व लक्ष्मण तात्या असे दोघे पुत्र कर्ते झालेले होते. त्यांना-कृष्णा, वाराणशी व गंगा अशा तीन कन्या होत्या. त्यांचीं लग्नें होऊन त्या आपापल्या सासरीं स्वर्गवासी झाल्या. रामचंद्रबाबा हे ड्रॉइंग मास्टर होते. ते पेन्शन घेऊन वारले. त्यांना संतती नव्हती. लक्ष्मण तात्या हे ह्यात असून वृद्धावस्थेंत आहेत. त्यांनीं आजपर्यंत अनेक विषयांवर शेंसवाशें लिहिलेलीं पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत. अलीकडे त्यांनीं अथर्ववेदाचें सान्वय मराठींत साग्र भाषांतर केलें असून तें पंडित सातवळेकर यांनीं छापण्यास घेतलें आहे. लक्ष्मण तात्या यांनीं 'सुश्लोक ऋग्वेद' नांवाच्या ग्रंथाची रचना सध्यां चालविली असून त्याच्या आठ हजार ऋचांवर तितकेच श्लोक रचिले आहेत व बाकीच्या दोन हजार ऋचांवर श्लोक रचण्याचें काम सुरू आहे. तेंहि सातवळेकरच छापणार आहेत.

लक्ष्मण ऊर्फ तात्या यांस एकच पुत्र गजानन या नांवाचा असून तो नाना ऊर्फ राजाभाऊ या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यांचें शिक्षण बी. ए. पर्यंत झालेलें असून ते सध्यां भावेस्कूलमध्यें लाइफ मेंबर आहेत. त्यांनाहि कविता करण्याचा नाद आहे. त्यांचा गोविंदा या नांवाचा एक अल्पवयी पुत्र असून त्यांना-सुधा, नलिनी व मालती अशा तीन कन्या आहेत.

याप्रमाणें गोविंद हरी जोशी यांचा हा सातव्या पिढीपर्यंतचा इतिहास आहे. हें घराणें पुण्यांत दीडशें वर्षांहून अधिक वर्षांच्या वस्तीचें आहे. गोविंद हरींचें ग्वाल्हेरचें घराणें नष्ट झालें असून त्या घराण्यांतील फडनविशी सध्यां त्यांच्या मूळच्या कुंटे या नांवाच्या कारकुनाच्या घराण्यांत गेली आहे. गोविंद हरी यांच्या पुण्यांतील वाड्याचा घ. नं. ५४ शुक्रवार पेठ असा आहे. ह्या वाड्याचीं मूळचीं पेशवेकालीन खरेदी पत्रें ह्याच लेखाचे प्रारंभीं छापिलीं आहेत.

गोविंद हरीच्या वंशाचें

परिशिष्ट १

गोविंद हरि जोशी यांनीं आपला धाकटा मुलगा भिकाजीपंत यांची आपल्या जागीं शिंदे दरबाराकडून नेमणूक करून घेतल्यावर गोविंदपंत पुण्याकडे आले व सन १७८३ मध्यें परलोकवासी झाले. तेव्हां भिकाजीपंत ग्वाल्हेरीसच होते. तेथेंच पुढें निरपत्य वारले. त्यांच्या पत्नीनें मूळ घराण्यांतून दत्तक घेण्याचा प्रयत्न केला, पण तो फसल्यानें, भिकाजीपंतांची असामी त्यांचे कारकून कुंटे नांवाचे गृहस्थ होते ते करूं लागले. सध्यां ग्वाल्हेरीस त्याच कुटुंबाकडे फडणिशीची जागा व फडणिसांचा गोट या दोहोंची मालकी आहे.

परिशिष्ट २

गोविंद हरि ग्वाल्हेरीहून कोंकणांत गेले व तेथून मढें घाटानें पुण्यास येतांना वाटेंतील मढें गांवीं पांच ब्राह्मणांचें अन्नछत्र ठेविलें होतें, तें सुमारें सन १८४१ पर्यंत चालू होतें. पुण्यांतील गोविंदपंतांच्या वंशजांनीं त्याच्या बाबतींत कांहींच पूसतपास करण्याची वहिवाट न ठेवल्यानें, गोविंदपंतांनी ज्या गृहस्थांची अन्नछत्रावर नेमणूक केली होती त्याचे वंशज त्याच्या मागें मालक बनले व पुढें ते कर्जबाजारी झाले. त्यांनीं अन्नछत्राची इस्टेट स्वतःच्या मालकीची म्हणून विकून टाकली व घराणें तेथून परागंदा कोठें झालें त्याचा तपास नाहीं. अन्नदान सन १७८० पासून सन १८४१ पर्यंत म्हणजे सुमारें साठ एकसष्ट वर्षें सुरू होतें.

९०

मल्हारबावा श्रौती शामेगंडी

पेशवाईंतील एक शास्त्री

तीन पत्रें–१ नारायण पेठेंतील त्यांच्या घराचें खरेदीपत्र (फाटकें)

२ श्रौतीबावास दत्तविधानाविषयीं शास्त्रार्थ सांगण्यासंबंधींचें (बालबोध) व

३ मल्हारी श्रौतीस कानडे दीक्षिताचे पैशासंबंधीं पत्र (बालबोध).

श्री { श. १७१९ / इं. १७९७

खरेदी पत्र शके १७२९ प्रभवनामसंवछरे वैशाख शुध्ध १२ द्वादसी ते दिवसी वेदशास्त्रसंपन्न राजश्री मल्हार श्रौती उपनाम शामेगंडी यासी दुर्गाबाई कोम गुंडो नीलकंठ आठवले कारणे खरेदी पत्र लिहून दिल्हे ऐ(सी)जे तुमचे घरासेजारीं उतरेस ×× णे पेठ नारायण येथे आप ××× ई तों इमल्यासुध्धा ××× वंदीने तुम्हास × नंदी उतर दक्ष(ण) ××× मार २७ सतावीस ××म हात सुमार ६० ×× ची चतु ×× पश्चमेस नारो शंकर यांचा वाडा व पश्च × ची भिंत नारो शंकर यांसी— ×× दक्षणेस तुमचा नांदता वाडा ×× सीमापूर्वक × वास देऊन या × येकूण आठशे ×× तून घेऊन सदर ×× विहिरीसुध्धा × दिल्ही आसे तुम्ही × वंशपरंपरेने सु ×× आम्हास जाग्याविसी × आर्थी समध नाही ×× भाऊबंद कोणी जाग्याचा वारसा करू लागल्यास आथवा सावकार वगैरे कोणी तंटा केल्यास त्याचा जाबसाल आम्ही करू हे खरेदी पत्र लिहून दिल्हे सही हस्ताक्षर गुंडो चिमणाजी वैद्य

साक्ष

पत्राप्रमाणे गुंडो चिमणाजी वैद्य गोपालराव त्र्यंबक राजेबहादर

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री श्रोती बावा यांसि

विद्यार्थी विरेश्वरभट शाळेग्राम व पाढ्रंगभट पुरंधरे व विनायकभट पुरंधरे साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना तागाईत फा[1] भाद्रपद वद्य पंचमी पावेतों अपले अशिर्वादे करून समस्त सुखरूप आहों विशेष श्री बाबामहाराज देव संस्छानी याच्या माहालय करावयाच्या त्यास त्याचि प्रथम स्त्री निरुबाई व सगुणाबाई या उभयतां मृत जाल्यानंतर[2] पुढे विवाह दोन केले तेव्हां महाराजाचे मृत समई दत्तविधान जाहले ते समई उभयतां स्त्रिया दोनधि[3] संनिध होत्या त्यास मातृस्छानापंन प्रथम ज्येष्ठ मृत पावली ती प्रधान किंवा सांप्रतकाळीं ज्येष्ठ आहे ती प्रधान याचा संशय पडला म्हणून मुजरत पत्र लेखन केले आहे याचा शास्त्रार्थ मनास आणून सविस्तर निर्णय यथास्छीत करू पत्री लिहावा अनमान करू नये पक्ष अष्टमीस करावयाचा आहे हे विज्ञापना

---

१ आधीं 'का' किंवा 'फा' लिहून तो रद्द करण्याकरितां ह्या अक्षराला रेघ काढली नाहीं. २ 'नंरत' असें पडलें आहे. ३ 'नधि' ऱ्ही करतां काढलें आहे.

श्री

तीर्थस्वरूप मल्हारि श्रौती याप्रति कृष्ण दीक्षित कानडे कृतानेक साष्टांग नमस्कार उपरी अपण चादवड तेरा शत रुपये पाठविले ते हुंडावण खर्च जाउन सहस्र रुपये काशी सिक्के राजेश्री दंडनाथ दवे यांचे दुकानातुन अधिक श्रावण वद्य १० भरून पावलो या रुपायाच्या पावत्या दोन पाठविल्या त्या तेरा शताच्याच आहे आपली आज्ञा तशी होती मंणून हे कळावे किमधिकं

९१

श्री. कावेरीबाईसाहेब पेशवे यांच्या मिळकती

(श्री. थत्ते यांजकडे पुण्यांतील आलेल्या)

श्रीमंत रघुनाथराव दादासो यांचे चौथे पुत्र चिमाजीआप्पा यांचा जन्म ३०-८-१७८४ रोजीं झाला. त्यांनीं २५-५ ते २७-१०-१७९६ पर्यंत पेशवाई केली. ते ९-६-१८३० रोजीं काशीस मृत्यु पावले. त्यांची कन्या द्वारकाबाई. हिचे वंशज श्रीमंत लक्ष्मणराव चिमणाजी थत्ते. यांनीं दिलेली कांहीं माहिती सह्याद्रि मासिकाच्या नोव्हेंबर १९४२ च्या अंकांत प्रसिद्ध झाली असून कांहीं संशोधक मासिकाच्या ११ व्या वर्षाच्या ४ थ्या अंकांत आहे. श्री. लक्ष्मणरावांस श्रीमंत सईबाई (श्रीमंत दुसरे बाजीरावसाहेब यांच्या दहाव्या पत्नी) यांनीं नेपाळांत दत्तक घेतलें होतें. तेव्हां त्यांस श्रीं. थत्ते-पेशवे असें संबोधतां येईल.

श्रीमंत आप्पासाहेब यांची स्त्री कावेरीबाई ताईसाहेब या चित्रकूटास रहात होत्या. त्यांस तेथें वैशाख वा। १० शक १७५८ दुर्मुखनाम संवत्सरे मंगळवार म्हणजे तारीख १० मे* १८३६ इसवी रोजीं देवाज्ञा झाली. त्यांच्या डागडागिन्यांची मोजदाद होऊन ते जप्त करण्यांत आले. त्यांच्या कांहीं इस्टेटीची दुरुस्ती इंग्रज सरकारांनीं करून त्या उपयोगांत आणल्यामुळें परत करतां येत नाहींत, असें श्री. थत्ते यांच्या कारभाऱ्यांस कळविण्यांत आलें. काळे वावरांतील जागा (चिमण्या गणपतीजवळील भटांच्या तालमीजवळील) मुदतींत फिर्याद न आणिल्यामुळें गेली. दादासाा चिटणीस यांनीं एजंट (फॉर दि सरदार्स ऑफ दि डेक्कन) कडे याद गुदरल्यावरून नाझर यांनीं बंदोबस्त करावा म्हणून ३१-५-१८३६ रोजीं त्यांस हुकूम झाला. त्या बाबतींतील उतारा पुणें एलिएनेशन दप्तरांतून २१-८-१८९३ रोजींच्या अर्जावरून तारीख ५-१०-१८९३ रोजीं रघुनाथ चिमणाजी थत्ते-श्री. लक्ष्मणरावांचे वडील

---

* मोडकांच्या जंत्रीप्रमाणें

बंधु–यांस देण्यांत आला. तो, पुण्यांतील चिमणाजीआप्पा रघुनाथराव पेशवे यांच्या पत्नी श्रीमती कावेरिबाईसाहेब पेशवे यांच्या मिळकतीची माहिती महाराष्ट्रीयांस कळण्यास अत्यंत उपयोगी असल्यामुळें, खालीं देतों.

उतारा.

श्री

Inam A Commission (गोल सिक्का)

यादी मोजदाद श्रीमंत कैलासवासी आपासाहेब पेशवे याची स्त्री श्रीमंत मातोश्री कावेरीबाई ताईसाहेब चित्रकोटास होती त्यास वैशाख वाा १० शके १७५८ दुर्मुखनाम संवसरे मगळवारी देवआज्ञा जाहाली त्याची चीजवस्त येथे पुणे मुकामी त्याचे कारभारी केसो गोविंद जोशी याजपासी होती त्याचे बंदोबस्ताविसी श्रीमंत–बापुसाहेब याचे कारभारी राजश्री दादा चिटणीस याणी सरकारात येजटसाहेब बहादुर यास याद गुजराविल्यावरून त्याचा हुकूम ताा ३१ मे सन १८३६ इसवी रोजी नाजर याणी बंदोबस्त करावा म्हणोन जांहाला त्याजवरून जोसी याजकडे चौकसी कर्ण्याकरिता आले ते असामी–बिाा

(यांतील उतारा)

पेठ निहाये घरे व जागा खुल्या वगैरे पागा मिळोन किमत व तपसील–

१०० पेठ कजबा येथें **आबरखाना** आहे त्यात श्रीमंत आपा साहेब याचे +कुणबिणीकडे जागा खण ३०॥ आहे त्यापौ काही कुणबिणी हाली आहेत व काही भाडेकरी राहात आहेत त्यास भाडे काही नाही डागडुजी करून राहावे असा करार आहे म्हणतात त्यास त्याची येकदर किाा रुपये

३०० पेठ शनवार येथे **गौखाना*** खण येकदर ६१ आहेत *मंधे (मधें) मोठी बखळ खुली जागा आहे त्याची किाा रुपये

२०० पेठ बुधवार येथे बुधवारचे वाड्यासेजारी दक्षणचे बाजूस बोळात मुळे याचे घराजवळ सरकारचे कुणबिणीकडे ठिकाणे ९ आहेत मिळोन येकदर खण २१ आहेत येक मजला त्याप्रौ तिघी मालकिणी आहेत बाकीचे सर्व भाडेकरी आहेत त्याची ऐकदर किाा

५० पेठ सदासिव हुजूर पागेत कुणबिणीकडे ठिकाणे ३ मिळोन येकदर खण १० पौ येक ठिकाण खण २ अगदी पडले आहेत त्या ठिकाणी कोण राहात

+ पुढें इ. स. १८३८–३९ वरील माहिती पुणें नगर सं. वृ. खं. १ पृ. १० वर आहे. पण तींत खण नाहींत.

* सि. स. नं. ८१ ते ८५

नाही येका ठिकाणात मालक राहात आहे येकात भाडेकरी डागडुजी करून राहावे याप्रो वेवस्था आहे येकदर किा रुपये

५०० पेठ कसबा येथे हरी **इछाराम ढेरे याचे घर** आहे त्यात हाली जामदारखान्याचे सामान आहे ते घर दरोबस्त अगवाड्यापिछवाड्यासुधा येकदर किा रुपये

२०० पेठ शनवार+ येथे कर्वे याचा वाडा आहे त्या घरापौ उतरेचे बाजूचा सोपा खण ६ पौ येक चाफेखण पश्चमेचे बाजूकडील तीन मजला संगीन सोपा येकदर आहे त्याची किा रुपये

२०० पेठ कसबा येथे अनदराव वैद्य याचे घर आहे त्या घरापौ दोन सोपे पश्चमेचे बाजूकडील उतर अगचे साहा साहा (sic) खणी दुमजला त्यात हाली भाडेकरी राहात आहे त्याची येकदर किा रुपये

५०० पेठ नारायेण येथ निळो जनार्दन फडके याचे घर दरोबस्त अगवाड्यापिछ-वाड्यासुधा दाखविले त्यात सरकार आपासाहेबाची वहिवाट आहे त्यात मोरो माहादेव जोसी डागडुजी करून राहात आहे म्हणोन म्हणतात त्याची किा रुपये २

० किता ——————————

० किता ——————————

सदरहुप्रो घर व जिनगी जोसी याणी रुजू करून दिल्ही त्याची अजमासे किंमत हलीचे मानाने सदरी लिहिली आहे येणेप्रो मोजदाद करून जप्ती केली असे ताा १ जून सन १८३६ इाा

१ निळकंठराव विष्णु नाजर

१ दाजी विठल हेड कारकून निाा नाजर आपासाहेबाचे मोजदादीचे यादीवर सही

रुजु पहाणार विनायक विष्णु कारकुन ताा ७।१०।९३

सदरहु उतारा मिळावा म्हणोन रघुनाथ चिमणाजी थत्ते राार पुणे याणी तारीख २१ माहे आगष्ट सन १८९३ इसवीची अर्जी दिल्यावरून हा खरा उतारा देण्यांत आला आहे. व त्याजबद्दल सरकारचा ठराव नंबर ७३६८ तारीख ६ माहे दिसेंबर सन १८८१ यांत मंजूर झाले रुळी अन्वयें व ठराव नंबर ३६५६ तारीख

+ आतां बुधवारांत येतो किंवा काय ?

२६ माहे एप्रिल सन १८९२ अन्वयें रोख फी येक रुपया आठ आणे १८८ घेऊन नोंदणीबुकांत नंबर ४६८ यास जमा केले आहेत व सदरहु उताऱ्याचीं पानें येकतागाईत दोन पावेतो असून प्रत्येक पानावर इनाम कमिशन–ए–ह्या अक्षराचा गोल सिक्का केला आहे तारीख ५ माहे दिसेंबर सन १८९३ इसवी.

(सही) विष्णु पांडुरंग हेडकारकून

Sd—G. G. Vad

Sd—J. F. Fleet

एलिनेशन असिस्टंट कमिशनर कमिशनर

मध्यभाग

वरील मिळकती वारसा हक्कानें श्री. थत्ते यांस मिळाल्या; कारण लक्ष्मणरावांची आजी द्वारकाबाई या श्रीमंत आप्पासाहेबांच्या कन्या होत्या. तथापि या वारशाप्रमाणें श्री. थत्ते यांस प्रत्यक्ष मिळाल्या नाहींत. ते श्रीक्षेत्र काशी येथें असून वहिवाटदार श्री. सदाशिव नारायण थत्ते शास्त्री यांनीं मुदतींत चतुःसीमा दिल्या नाहींत. फक्त गोखान्याचा प्रत्यक्ष कबजा मिळाला. पुढें हा विकण्यांत आला. वरील इतर घरांच्या व जागेच्या चतुःसीमा मुळांतच दिल्या नसल्यामुळें त्या शेजारच्या मिळकतींच्या चतुःसीमेवरून ठरविल्यावांचून उपाय नाहीं.

श्रीमंत आप्पासाहेबांची स्त्री कावेरीबाई ताईसाहेब यांचें नांव आजपर्यंत उपलब्ध झालें नव्हतें. "आपासाहेब पेशवे मयत वारस नातू चिमणाजी गणेश थत्ते यांचे नांवावर नोंदलेले घ. १०२, १०७, ११०, ११५, ११८ कसबा आहेत.[1] नं. ८५ व नं. १२८[2] हे नारायणशास्त्री बिन नीलकंठशास्त्री यांच्या नांवावर आहेत.

१२

पुण्याच्या कुळकर्ण्यांचा कुळकट

हा कागद मंडळसंग्रहामधील होनप देशपांडे यांच्या दप्तरांतील आहे. पुण्याच्या कसबा पेठेचे कुलकर्णी राजरुपी हे आपण जाणतो. आतां या कुळकटावरून राजरुपी-

१ पुणें नगर संशोधनवृत्त पृ. ४३. २ कित्ता ४४.

पूर्वीचे कुलकर्णी ' भाराईत ' होते असें दिसते. या कुलकर्ण्याचे नकल झाल्यामुळें त्यानें आपले मरणसमयीं आपल्या वतनांपैकीं पाटलाचें कुलकर्ण म्हणजे मुंजेरीचें कुलकर्णीपण–आपला जावई राजरुषी यास व मोहतर्फाचें कुळकर्ण–महाजनकी दुसरा जावई ठकार यास दिली. हा प्रकार मुरार जगदेवाच्या राजिकापूर्वीचा असावा.

श्री

यादी कूलकट कुलकर्णी कों पुणे याची भारामल कुलकर्णी व जोसी काा मारचा होता त्याचे नकल जाले त्यास लेकी दोघीजणी होते त्यापैकी येक लेक राजरीस याचे घरी दिल्ही दुसरी ठकार यास दिल्हे तेसमई मरणआवस्ता जाली तेव्हा राजरीस यास बोलाऊन पाटिलाचे कुलकर्णीपण दिल्हे दुसरे लेकी ठकार यास मोहोतर्फाचे (अपूर्ण)

(पाठीवर मजकूर)

(ताा मोकदम मौजे मलटण ताा पाटस यासी लक्ष्मण नरसिंगराव सितोळे देशमूख प्राा पुणे सुाा* १२०९ कारणे जे तुम्हाकडे बाकीचा व सालमजकूरचा यैवज येणे त्यापैकी रुपये १५० दीडसे रुो रामकृष्ण नाईक रोघे यासी देऊन पावलीयाची पावती घ्यावी याचा बोभाट फिरून येऊ देऊ नये)

९३

मुंजेरी–पाटीलकुलकर्ण्यांमधील करार

श्री { श. १७१३ माघ शु. ३ / इ. १७९२ जाने. २६ }

यादी ठराव पाटील व कुलकर्णी निाा मुजेरी काा पुणे या उभयेतांचा पेशजी गावचे जामिनीचे लावणी उगवणी करिता व गाव समधे सेते विकतात वगैरे कागदपत्र येकमेकाचे पेश गैबत होतात व साक्षी घालितात येविसी हिशोबाचे लढे पडल याजबाबद उभयेता राजश्री सदासिव खडेराव देशपाडे प्रां मार व गणेश शंकर सरनाईक याजकडे सरकारातून मनास आणून विल्हेस लावणे म्हणोन आज्ञा जाली त्याजवरून उभयेताची समजूत करून ठराव केला सुाा इसने तिसैन मया व आलफ सन १२०१ कलम ———— बिाा

---

* श. १७२१.

*बिा रघुनाथ रामचंद्र देशपाडे प्रांत मजकूर

पेशजी कुलकर्णी यानी कारभार केला त्यांची बाकी सालगुदस्त परयेत रुाो येकसे बारा पत्रकात लेहून दिल्ही आहे ती कुलकर्णी यानी वसूल करून सरकारचे व मोकासीयाचे देणे राहिले आसेल ते व गावखर्च वगैरे मुजेरी समंधी देणे राहिले आसेल ते वारावे तेविसी पाटील यानी बोलू नये गुता नाही याप्रो करार— कलम १

गावसमंधी वातनी कागदपत्र व खरीदी पत्रे व गाहाण पत्रे व कौलपत्रे लिहिणे ती पाटलाचे विद्यमाना सिवाये कुलकर्णी यानी करू नयेत व पाटील यानी गावसंमधी कारभार करणे तो कुलकर्णी या सिवाये करू नये याप्रो करार कलम १

सन १२०१ येकापासून गाव समंधी कुलारग जमा होईल ते पाटील याचे इतल्या सिवाये कुलकर्णी यानी घेऊ न[1] नये वसूल भरणे व खर्च करणे तो पाटील-कुलकर्णी यानी येक विचारे करावा कोणी कोणासी प्रतरणा काडीमात्र करू नये सरकार देणे व गावखर्च वसुलात वजा होऊन बाकी गुजावीश राहील ते पाटील कुलकर्णी यानी यथाविभागे वाटून घ्यावी याप्रो करार— कलम १

बापु कुलकर्णी यानी साल मार माहादजी पाटील यास तीनसे रुाो द्यावे त्याची हासेबदी बाा चिठ्या

१०० माघ मासचे पटीत घ्यावे रुा शंभर सन १२०१
१०० चैत्र मासचे पटीत घ्यावे रुाो शंभर सन १२०१
१०० सन १२०२ हे मधी मार्गसीष मासी घ्यावे शभर
३००

सदरहू तीनसे रुाो कराराप्रो घ्यावे याच्या चिठ्या पाटलाचे नावे कुलकर्णी यानी लेहून द्याव्या येसा करार कलम १

याप्रो उभयेताचा ठराव करून समजूत येकमेकाचे विचारे जाली आसे या उपरी पाटील कुलकर्णी यानी येकमेकासी बेकिलाफपणे वर्तणुक करीत जावी कोणासी कोणी आतर करील त्यास श्री कुलस्वामीची शफत व बेतालीस पूर्वजाची शफत आसे तेरीख छ १ माहे जाार

सदरहू यादी व कलमाप्रमाणे मान्य माहदजी पाा झावरे निाा मुजेरी काा माार लिहिल्याप्रो वर्तणुक करू यासी

सदरहू यादी व कलमाप्रो मान्य बापूजी मल्हार कुलकर्णी निाा मुजरी काा मजकुरी लिहिल्या प्रमाणे वर्तणूक करू

१ न अधिक पडला आहे.

आतर करणार नाही करारास आंतर करू यासी आंतर करणार नाही शफत आसे तरी आपल्यास सफत आसे हे लिा सही मती मजकूर

छ मार

बापूजी खंडेराव देशपाडे प्रा मार*

९४

एक शिवकालीन महजर

श्री { श. १६१४ आषाढ व.२ / इ. १६९२ जून २० }

महजर अज करार बतारीख छ १४ शहर सौवाल सुा सन हजार ११०२ सन ३६ जिळूसवाला बिहुजूर शरयतपन्हा काजी महमद काजी काा पुणे व शायादत व रफायत मवालीपन्हा सैद महमजाफर नायेब खान वालाशान ज्याहाबाजखान फैजदार पाा पुणें व हुकमतपन्हा हदुखान नायब सेख अहम[द] करवडी[1] व तहवर द++ गाहा] बालाजी बाजी जागीरदार व मालोजी नरसिगराऊ व गोविंदराऊ सितोले देसमुख व होनप देसपांडीये पाा माा व हाली व मवाली काा माा या हुजूर मा त का ली दरवडा[2] येऊन फिरयादी केली की अपली मिरासी व ड लू डा काला मला रुके ८६ आहे हे कान माली जबरदस्तीने खातो तरी साहेबी इनसाफ केला पाहिजे म्हणऊन फिरयादी केली यावरी कान माली यास रा य ती स बोलावून (अपूर्ण)

९५

सरकारी जुव्याचा कौल

श्री { श. १६९६ चैत्र शु.१५ / इ. १७७४ मार्च २० }

[पूर्वी कोतवाल कांहीं ठराविक कर घेऊन जुवा खेळण्यास परवानगी देत, असें पुढील पत्रावरून दिसतें.]

श्री

नकल

चिठी कोतवाल चौत्रा शहर कसबे पुणें तां संभु भोई वा पेठ बुधवार सु(हु)र सन आर्बा सबैन मया आलफ तू चौत्रा येऊन आर्ज केलास की जुव्याचा कौल दिलियास मी सरकारचा दररोज देत जाईन म्हणोन त्याजवरून तुजकडे सरकारचा

---

* ही आडवी ओळ आहे.

१ जकात अधिकारी. २ आडनांव.

दररोज ·।- आणेप्रो...करार करून कौल दिल्हा असे तर जुवा घालावयाची जागा आसेल तेथे फड घालून सरकारचे रोज देऊन खेलत जाणे खोटा खेल खलो न ये व आपले आपल्यात खेलत जाणे जाणिजे छ १४ माहे मोहरम मोर्तब

---

३ पुणें–पेठा—

९६

मुंजेरीस अभयपत्र

{ श. १६६२ ज्येष्ठ वा। ४
{ इ. १७४० जून २

श्री
राज शाहू नरप
ति हर्षनीधान बा
ळाजी बाजीराव
मुख्य प्रधान

० न० (उलटा न) (तिहेरी गोल वेढे)

अभयपत्र समस्त राजकार्यधुरंधर विस्वा × निधि राजमान्य राजश्री बालाजी पंडित प्रधान ता। मोकदम नि।। मुजेरी का। पुणें सु।। इहिदे आर्बैन मया अलफ तुम्हास हुजूर का। माचे मुकामी आणोन सालमजकुरचे खंडणीविसी आज्ञा केली त्यास तुमचे बाबे देशमुख देशपांडे याणी अर्ज केला की सालमजकुरी पाऊस गेला पिके जाहली नाही जीवन माफीक खंडणी केलिया उगवणी करू पेस्तर सालची कीर्दी आबादानी करितील म्हणोन त्याजवरून बराये अर्ज खातिरेस आणून जीवनमाफीक खंडणी कुलबाब कुलकानु काली व पाढरी स्वराज्य व मोगलाई बाबती व सरदेश मुखी व मुकासा व सावोत्रा रुपये १५२६ एक हजार पाचशे सवीस करार केले असेत उगवणी करून पेस्तर सालची कीर्दी आबादानी करणे जाजती आजार लागणार नाही अभय असे जाणिजे छ १८ *रबिलावल +आज्ञा प्रमाण लेखन सीमा (गोल सिका)

---

* अक्षर वेगळें. + अक्षर निराळें.

१७

शुक्रवार पेठेची वसुली

श्री { श. १७१२ कार्तिक वद्य १२
इ. १७९० डिसें. ३ }

याद़ी राघो रामचद्र पेठ शुक्रवार येथील कुलाकडे सालगुद़स्ता सन तिसाची व सन तिसैनची बाकी न देता घर टाकून बाहे(र) गेली आहेत याजकरिता ताकीद होऊन बाकीचा फडशा करून देत येविसी ताकीद —— पत्रे

१ घनशाम तात्या याने सरकारचे घर होते ते जलाले दुसर बाधोन देऊन राहातो म्हणोन करार केला आण हली जेजुरीत राहिला आहे त्याजकडे सन तिसाचे च्यार व सन तिसैनचे रुो ४ येकूण रुो ८ देऊन सरका(र)चे घर जालले आहे ते पेटेचे बादोन द्यावे म्हणोन पत्र

१ वेरापा का(को)टवला पिपरीत जाऊन राहिला आहे त्याजकडे दुसालाची बाकी रुो ८॥ साडे आठ येणे आहेत त्यास पत्र

१ तेल्याकडे नजर करार रुो पधरा सरकारचे तेल विकावे म्हणोन केले आहेत त्यास तेल विकतात परतु नजरेचे रुो द्यावयास धटाई करिता(त) ताकीद पत्र ('व सान्याचे गुद़स्ताचे रुो देणे' हें मध्येंच ओळीवर तेव्हांच निराळ्या लेखणीनें लेखक एकच–लिहिलें आहे.)

पेठेची कुले सद़ासीव पेठेत राहिली आहेत त्यास ताकीद़ करून पेठेस जाये येसे करावयाविसी प्याद़ा द्यावा

१ पेठेस पत्र की सेटेपणाचे हक उत्पन चौधा पटेप्रा देणे व सणाचा सिद़ा वगैरे देत जाणे व जकातीचे धलमोड व धलभरीताचा पै(का) ही देत जाणे बोभाट येऊं न देणे

१ हणमता वाणी करनाटकर याने हली दसऱ्याचे दिवसी पेठेचे घर जालले आण गेला आहे त्याजकडे बाकी रुा १० येणे आहेत याजकरिता पेठेचे घर जालले आहे ते बाधोन द्यावे व सान्याचे बाकीचे रुो दाहा देणे फिरोन बोभाट येऊ न देणे

५ साराचे रुा दाहा तुजकडे येणे राहिले आहेत ते देणे फिरोन भोभाट येऊ न देणे

सदरहू आन्वये पाच ताकीदपत्र देणें छ २५ रोवल सन इहिदे तिसैन

९८

रास्ता पेठेची वसुली

श्री {श. १७५०
इ. १८२९

यादी पेठ सिवपुरी शहर पुणे येथील येकदर घरे वसाहतीपासून आहेत त्याचा तपशील पटी येत्ये ती व माफीची आहेत ती वगैरे सुा तिसा अशरीन मया तेन व अलफ सन १२३८ फसली सन १८२९ ईसवी येकदर घरे सुार ४४५ ताा

५ देवालये १ श्रीगणपती १ श्रीलक्ष्मेश्वर १ श्रीविठोबा १ श्रीव्यंकटेश
१ श्रीमारुती
५

५ मठ बैरागी कबीर गोसावी १ मंठ गोसावी ४ मठ बैरागी

१ तकीया फकीर

१ चावडीची ××

४ (रास्ते) ××××

१ वाडा थोरला राहाता
३ बाग तीन बाजूस
४

३ हौद पाण्याचे देवलापुढे

७ चौक्या सरकारी मालि छपरे आहेत

२३२ वसुली घरे आहेत त्याचा तपसील सन १२३७ फसलीचे जमाबंदी पत्र कांस सरकारांत लिहून दिल्याच आहे—

४८ सन १२३८ फसली ताा सन १२३७ फसली पो वजा वसुली घरापौ पडली ती बाा ताा

९ घरे व छपरे कायम आहेत ती मालमहजर

२ ब्राह्मणास दोन दिल्ही सबब पटी घेऊ नये म्हणोन परवानगी पांडुरंगराव सुभेदार व बाळकोभाऊ
१ रंगाच्या
१ बापूभट ममदापूरकर
२

१ वाणी बापू कोरपे चुकून आख पडला होता ते शो कमी हाली ते घर गोसावी याणे घेतले असे

६ दुसरे याणी घरे घेऊन सालमाारी पटी घेऊन पटी घेऊन जमा बाकीस ल्याहावयाची ती मालक परागंदा कायम घराचे (इत्यादि)

१९

खानेसुमारी (घराची)

पेठ आस्तापूर ऊर्फ मंगळवार

पेशवाई श. १७३९ च्या कार्तिक मार्गशीर्षात गेली व ही खानेसुमारी त्यानंतर पांच सहा महिन्यांनीं झाली म्हणजे ही कंपणी सरकारनें केली. यावरून या पेठेसंबंधी माहिती मिळत आहे ती अशी—

१ या पेठेंत २६१ घरें होतीं व त्यांचे ७०५ खण होते. त्यांची वर्गवारी पाहतां ७४ घरें माडीचीं, ८३ येक मजली, ८५ छपरी, १७ खुली व २ देवळें यापासून ८३४॥− घरपट्टी वसूल करीत असत.

१ **देवालयें**:—१ श्रीबालाजीचे कौलारु व १ श्रीसिद्धेश्वराचे संगी (दगडी).

१ **सरकारी चौकिया** चार होत्याः—१ भिकारदासाचे जाग्यात, १ सिताराम परदेसी याच्या जाग्यात, १ मणिराम छपरबंद याच्या जाग्यात व १ तालिमखान्यानजिकचे जाग्यात.

१ **जातवार घरांची वर्गवारी**:—४२ ब्राह्मण, ४६ कुणबी मराठे, ३६ दालकरी, २७ वाणी, १० परदेशी, १३ किराड, १२ तेली, ६ मुसलमान, ३ गोसावी, २ परभु, ४ जैन, ३ सिपी, ३ कुंभार, १ गोळक, १ सोनार, १ भडभुज्या, १ कटई पुरा छपरे ४०, २ बुधलकर.

१ **कराची माफी**:—देवालये, चौक्या, गोसाव्याचे मठ यांना पूर्ण माफी आहे. तसेंच प्रत्येक जातींतहि माफीचीं घरें दिसतात.

१ या पेठेंत प्रख्यात पुरुषांचे वाडे होते त्यांपैकीं कांहीं—

१ सावकारः—१ माहादेव ना॥ मायेनकर, १ बापूजी ना॥ ताबोली, १ सिताराम नाईक चिकटे, १ सदोबा ना॥ लाभारे, १ त्रिबक नाईक हरभरे, १ सदोबा ना॥ दाडेकर, १ बापूजी ना॥ चिकटे.

१ सरदार व मुत्सद्दीः—१ आत्या गुरूजी, १ बालाजीपंत दामले, १ तुळसीराम पंडित, १ सुभेदार जकाते, १ भिकाजीपंत सुभेदार, १ हाणवतराव दरेकर, १ हाणवतराव सितोले, १ रविराव सिंदे, १ हायबतराव सोरटे, १ गोपाळजी गुड, १ नीलकंठराव रामचंद्र परभू वगैरे.

१ सुळाबदल जागा बखळ याचा अर्थ सूळ देण्याची बखळ कीं ‘ सूळ ’ आडनांवाच्या इसमाची बखळ याचा नीटसा बोध होत नाहीं.

१ या यादींत एकहि अस्पृश्याचें घर नाहीं. आणि आतां ही पेठ पुण्यांतील अस्पृश्यांचे वस्तीचा प्रमुख भाग समजला जातो.

१ ही यादी कै. पांडोबा पटवर्धन यांच्या मंडळ संग्रहांतील आहे.

१००

नानाच्या पेठेची वसाहत

सोबतचें पत्र मंडळसंग्रहांतील **पुणें होनप देशपांडे**-दप्तरांतील आहे त्यावरून पुणें शहरांतील नव्या पेठेसंबंधीं पुढील माहिती ध्यानांत येते.

१ ही पेठ सुा तिसैन मया व अलफ (श. १७११) सालीं बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणवीस यांनीं वसविली.

१ या पेठेची चतुःसीमा ' गणेश पेठेचे पूर्वेस नागझरी पलीकडे भवानी पेठेचे उत्तरेस रास्ते याचे पेठेचे दक्षिणेस वोडा आहे तेथपर्यंत. '

१ पेठेच्या वसाहतीच्या जागेचें क्षेत्र ' दक्षण उत्तर रुंदी गज ४५० साडेच्यारशे व लांबी पूर्वपश्चम नागझरीपासून गज ६००. '

१ या पेठेचे सेटेपण फिरगोजी खांडे यास दिलें.

श्री { श. १७११ ज्येष्ठ व. ७
इ. १७८९ जून १५

नकल

सिका खासा

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ताा फिरगोजी खांडे सुा तिसैन मया व अलफ शहर पुणे येथें नवी पेठ वसवावयाकरितां राजश्री बालाजी जनार्दन फडणिस यास जागा गणेश पेठेचे पूर्वेस नागझरीपलीकडे भवानी पेठेचे उतरेस रास्ते याचे पेठेचे दक्षणेस वोडा आहे तेथपर्यंत दक्षण उतर रुंदी गज ४५० साडेच्यारशे व लांबी पर्वपश्चम नागझरीपासून गज ६०० साहाशे याप्रा जागा पेठ वसाहतीस नेमून दिल्ही आहे तेथील पेठेचे शेटेपण तुजला सांगीतले असे तर तू पेठेची वसाहत करून कुले आणून आमदानी करणें सात साला वाणी उदमी वगैरे यास कौल दिल्हा आहे तो भरलीयावर शेटेपणाचा हक करार करून दिल्हा जाईल त्याप्रमाणे घेत जाणें पेठ

मारचे शेटेपणाचे वतन तूं व तुझें लेकरालेकरी वंशपरंपरेनें अनभऊन सरकार चाकरी करून सुखरूप राहाणे जाणिजे छ २० रमजान* आज्ञाप्रमाण मोर्तब

बार

१०१

गुरुवार पेठ

सोबतचा कागद तुळशीबागवाले दप्तरांतील आहे. यावरून पेशवाईत गुरुवार पेठ केवढी होती याची कल्पना होईल. कागदावर साल नाहीं पण अक्षरावरून तो पेशवाईतील आहे, यांत शंका नाहीं. दुसरी गोष्ट या पेठेंतून घरपट्टीचा वसूल किती होई हेंहि ध्यानांत येई. तो या पेठेच्या विद्यमान वसुलाशी ताडून पहावा.

श्री

पेठ गुरुवार घरे येकदर

३९१	वसुली	२०१२॥।
१३०	माफी	१३०
३९	वोस	
५६०		२१४२॥।

१०२

पीर शेखसल्याचें भिकणें

हें 'भिकणें' मागण्याचा हक्क असे व त्या भिकण्याच्या मिळकतींतून पिराच्या उरुसाचा खर्च केला जाई. हें भिकणें मागणाऱ्यांत झालेल्या वाटणीसंबंधींचा हा पुढील कागद आहे. हा तुळशीबागकरांच्या संग्रहांतील असून कागदाच्या शेवटीं मुंजेरीच्या कुळकर्ण्यांचें नांव आलें आहे. कागद असाः—

श्री { श. १६९५ फाल्गुन वद्य ४ / इ. १७७४ मार्च २ }

दाा बो सेख बदुद्दीन व सेख हजरत सेख चांद सेख शाहाबुद्दीन व सेख आबदुल लतीब पीरजादे पीरसेखमला काा पुणें सुाा आर्बा सबैन मया अलफ कारणे

* ही तारीख पत्रप्रारंभीं आलेल्या मुसलमानी वर्षाच्या आद्यंतीं येते. आरंभीची धरून वर दिली आहे. शेवटची अशी आहे श. १७१२ ज्येष्ठ व. ७ इ. १७९० जून ४

साहेबाची सेवेसी कतबा लेहून दिला येसा जे आम्ही आवघे भाऊ मिलोन पिराचे उरसाची भिकर्णे व हाक जमा केला ते समई सेख मोहिदीन याचा भाऊ सेख मुलारम याजला सामील करून जमाबंदी केली त्यापैकी पिराचे कार्यास जे लागलें ते लाऊन खर्चवेच केला बाकी राहिलें ते भाऊपणीयाचे हिशावरहुकूम वाटून घेतले उरसाचे दिवस जालियावरी पुढें कोठे कोठे मागावयाचें राहिले होते मागावयासी चौघे भाऊ चालिले ते समई मागती सेख मुलाराम याजला बोलाविले त्याजला नफा फावले म्हणून आम्हासच सागितले मग आम्हीच थोडेबहूत मेलवावयाचे ते मेलऊन भाऊपणि याप्रमाणें वांटून घेतले सेख मुलारम याचा वाटा त्याजला दिल्हा आम्हाकडे कांही राहिले नाही त्यास हालीं सेख मोहिदीन साहेबांकडे फिर्याद जाला आहे त्यास आम्हाकडे काही त्याचें राहिले नाही व त्याचा भाऊ मुलारम याणे सर्व काही वाटा राहिला येसे आमचे आंगी लागलें तरी सरकारचे गुन्हेगार हा तेरीख १८ जिल्हेज

(आडवीस ओळी उजवीकडील)

बिा बापूजी मल्हार कुळकर्णी निा मुजरी का मजकूर

ताजा कलम जे दिवसीं सेख मुलारम याजला आम्हा बाराबरी यावयासी न फावले ते समई आम्हीच जमा करून खर्चवेच पिराचा वारून बाकी राहिले त्याचा बाटा सेख मोहिदीन याजला भाऊपणि याप्रो दिल्हा आहे व त्याणेहि घेतला आहे हे त्याचे आगी शाहबूत करून देऊं हे लिहिलें सही

१०३

पर्वतीचा नंदी व विठ्ठलवाडीचा विठोबा

सोबतचा कागद तुळशीबागवाले दप्तरांतील असून त्यावरून उपरनिर्दिष्ट कामें कधीं झालीं व तीं करणारीं पाथरवट कोण होता याचा स्पष्ट खुलासा होत आहे.

श्री { श. १६८५ भाद्र. शु. २ / इ. १७६५ सप्टं. ९ }

यादि निबाजी आबेकर पाथरवट याजकडून पर्वतीचा नंदी व विठलवाडीस विठोबाच्या मुहूर्ती करविल्या या कामाचे यैवजी मोघम छ ३० सफर पोतापो सन आर्बा सितैन तसलमात खर्च पडिले आहेत रुा ७५

यास पाथरवट मजकूर म्हणतो विठलवाडीस विठोबाची मुहूर्ती व रखमाई येशा दोन मुहूर्ती केल्या याचे करार केले ते सदरहू पाऊणसे रुा पावले आहेत.

१०४

' श्री आई आदी पुरुषाचें '

पुण्यांतील स्थान

(पत्रावळींचा हिशेब)

पत्रावलींच्या हिशेबांत बऱ्याच बाबी येऊन गेल्या आहेत. त्यांपैकी 'श्री आईआदि पुरुषा'संबंधीची नोंद विशेष महत्वाची आहे. या नोंदीवरून या सत्पुरुषाचा मठ अगर मंदिर पुणें येथें भवानी पेठेंत होतें असें दिसून येतें. आतां हें ठिकाण विद्यमान आहे कीं, नाहीं याचा शोध केला पाहिजे. त्यानंतरचें काम येथील मठ मुख्य कीं शाखा हें ठरवावयाचें राहील. हा कागद तुळशीबागवाले दफ्तरांतील आहे.

जंत्रीची परीक्षा पहावयास यांतील कुग्रहशांतीचे मितीवार उल्लेख उपयोगी पडतील.

गृहस्थ व भिक्षुक यांचीं नांवें तत्कालीन

श्री { श. १७१८ वैशा. शुा २
इ. स. १७९६ ते ९

हिसेब सरकारचे वाड्यात वगैरे लोकास प्रयोजना बबदल[1] राघोजी गुरव याजकडून साल मारी पत्रावली देविल्या पहिला हिसेब ताा छ १८ जाखरपावेतो जाला त्या अलीकडे बाा चिठ्या सुाा सीत तिसैन मया व अलफ पत्रावली सुमार

सुमार

१४३०० सरकारचे वाड्यात

११८०० नित्य खर्चाबद्धल दररोज १०० प्रमाणे

३००० माहे रजब

२९०० माहे साबान

३००० माहे रमजान

२९०० माहे सवाल

११८००

२५०० किरकोल शांतीचे वगैरे ब्राह्मण भोजनास

५०० छ[2] १ रजब पंचग्रहयोग शांतीचे साहित्यास व ब्राह्मण भोजनास

---

१ एक ब अधिक दिसतो.

२ या वेळेला (श. १७१७ पौष शुा २ ता. १२।१।१७९६) गुरु, शुक्र, बुध, रवि व चंद्र हा योग गणितानें येत आहे.—द. वि. आपटे.

१००० छ ५ रजब गुरु शुक्राचे युध्ध व तारापतन जाला सबब लक्ष बेलसहित ग्रहयज्ञ शांत केली याचे साहित्य व ब्राह्मण भोजनास
५०० छ ३ साबान पंचग्रह योग शांती बाा
५०० छ ११ साबान [3]मधुदर्शनाद्भुत शांती बाा
२५००
१४३००

३८०० भिक्षुक ब्राह्मण व गोसावी व उत्साहास
२५०० **श्री आई आदि पुरुष** वास्तव्य पेठ भवानी पौषी पौर्णिमेचे उत्छहा बाा
५०० बालकृष्णशास्त्री शंभू माहादेव साल गुदस्ताप्रमाणे साल मारच्या छ २० रजब
५०० नारायण जोसी नरसिह जयंती बाा उत्छहा बाा छ १३ सवाल
३०० बालकृष्ण छत्रे छ १९ सवाल
३८००

६६५० ग्रहस्त मडलीकडे
१००० बलवंतराव गोविंद वाकडे दतजयती बाा छ २३ जमादिलोवेल
१५१ सदाशिव सिवराम खडालकर श्री वंकटेशाचे समाराधने बाा छ १ जाखर
१००० त्रिंबकराव नारायण परचुरे बधूंचे लग्नाबाा छ ७ जाखर
५०० सखो केशव कारकून पा दिाा केसो महादेव पुत्राचे लग्नाबाा छ २१ जाखर
४०० कुशाबा सरनाईक पुत्राचे लग्नाबाा छ २६ जाखर
१०० कोंडो बाजी बारकून प्राा पुणे प्रयोजनाबाा छ ५ रजब

३ धूम ?

७०० गोविंद हरी नातू वोट भरणाबा

३०० छ ८ साबान

४०१ छ. ८ रमजान भावजईचे

७००

१००० त्रिबकराव विश्वनाथ निा फरासखाना रामनमीचे उत्छाहाबा छ २४ रमजान

१००० कृष्णाजी भैरव थते रामनवमींचे उत्छाहाबा छ २८ रमजान

२०० बाबा दाभोलकर प्रयोजना बा छ ८ सवाल

१०० किता कोडो बाजी कारकून यास श्राधाचा छ १३ सवाल

६६५०

२५० किरकोल शुद्रास

१५० हैबती जगथाप बायकाचे दिवसास छ १९ रजब

५० महिपतजी नाईक यादव देवकार्याबा छ ४ जमजान

५० पिराजी वाघ मयत जाला त्याचे दिवसास छ१७ सवाल

२५०

२५०००

३००० स्वारीकरितां खर्च मौजे वडगाव सेरी येथील मुा पा

२००० फालगूण वा १०

१००० फालगून वा ४

३०००

२८००

येकून दर हजारी रुो ३॥ प्रा रुो ९८

४——मसलमातीस——रुो

५५ ता १९ जारवर हिसंबी आगाव

१५० छ २९ रजब वरात पेठ गुरुवार व सरकार घराचे भाडदाबा

४५

बाकी देणे ——————————रुो ५३
गागाव—————————— ४७
१००

[1]शंभर रुो देणे

छ १ जिलकाद सीत तिसैन (ही ओळ आडवी आहे)

१०५
पेशवाईंतील नानकपंथी मठ

शिखांचा पुणें येथें एक मठ होता असें सोबतचे यादीवरून सिद्ध होत आहे. हा मठ नानासाहेब पेशव्यांचे कारकीर्दींत स्थापन झाला व तो वोढ्याच्याकाठीं होता असा दिसतें. मठाच्या सेजारीं विहीर असून तेथें झाडे झुडपे महंतानें लाविलेलीं होतीं. ही जागा ओढा भरून तयार केली होती. हा मठ सध्या विद्यमान आहे तो रास्ता पेठेंत आहे.

श्री

त्रिसुद

यादी ब्रह्मकूटस्त उदासी गुरु नानक निर्वर्णी वास्तव्य का। पुणे याणे येऊन विदित केले की सकू मजकुराने आपले सेतपाीं आजमासे बिघे दीड दोनपावेतो माल वाड्याची जागा धार्मार्थ दिल्ही तेथे आपण हजार बारासे रुो खर्च करून विहीर खाणोन वोडा खाणून भरी घालून झाडझुडोरा लाऊन तेथे मठ बाधिला आहे त्यास हली सकू मजकूर याचा लेक त्या जाग्याविसी कजिया करितो तरी त्यास ताकीद करावी म्हणौन त्याजवरून मनास आणिता गोसावी मजकूर पूर्वीपासून कैलासवासी नानासाहेबापासून तेथे आहे आणि याने खर्च करून विहीर खाणून बाधिली आहे आणि वोडा खाणून भरी घालून झाडझडूक लाविला तरी तू यासी कोणी गोष्टीविसी कजिया न करणे सुदामत चालत आल्याप्रो चालू देणे नवीन बोभाट येऊ न देणे म्हणोन सोनजी बिन सकाजी बुरजे याचे नावे आज्ञापत्र १

---

१ हा शेरा निराळे वळणाचा

१०६

मोदीचा गणपति

या गणपतीचा उल्लेख 'वाड रोजनिशी बाजीराव दुसरा' यांत पुढीलप्रमाणें आहे.

" ३ गणपतींचें देऊळ रस्त्यांत नजीक मोदीचें घर.

१ गणपती.

१ महादेव, गणपतीजवळ गाभाऱ्यांत आहे त्यास.

१ तपस्वी ब्राह्मण नेहमीं आहेत त्याचे देवापुढें "

३

हा उल्लेख श. १७३२ फा. व. ३ = १८११ मार्च १३ तील आहे. पृ. २९५. त्यापूर्वी १७७४ मध्यें सवाई माधवरावांच्या वेळीं देवांना ज्या दक्षणा दिल्या त्या यादीत हा गणपति नाहीं, मार्तीचा आहे. (स. मा. रोज. भा. १ पृ. ८०).

इंग्रजी अंमलांत याला दरसाल ३९ ८७ रु. मिळतात.

खुश्रुशेट मोदीशीं या गणपतीचा काय संबंध आहे याविषयीं माहिती मिळवितां असें दिसून आलें कीं, पेशवाईच्या अखेरीस काश्यप गोत्री भट घराणें पुण्यास येऊन स्थायीक झालें. या घराण्यांतील पुरुषानें मोदीच्या बागेशेजारीं शेतांत एका पारावर एक स्वयंभू गणपति पाहून आपलें कुलदैवत सिद्धि-विनायक म्हणून त्याठिकाणीं देऊळ बांधलें. पुढें भटांना ऊर्जितकाळ येऊन ते सावकारी करूं लागले व अद्यापिहि करतात. त्यांनीं या गणपतीची व्यवस्था स्वतंत्र करून ठेविली आहे.

तेव्हां हा गणपति प्रसिद्ध खुश्रुशेट मोदी यानें पुरस्कारिलेला नव्हे. तर मोदीच्या बागेजवळचा म्हणून याचें नांव मोदीचा गणपति असें पडलें असावें.

१०७

केदारेश्वर

शिवचरित्र-साहित्य खंड ८ वा, यांत (ले. १९ पृ. ६४-६८) या देवळा-संबंधीं जे कागद छापले आहेत त्यापेक्षां पुढील कागद आहे. ले. ६० ह्या कागदावरून जो मजकूर निघतो तो तोच असून वेगळा आहे. राज्याभिषेक शके ४९ आषाढ शुा १ रविवार या एकाच दिवशीं दोन सनदा दिल्या आहेत. ही सनद स्वतः घोडेभट-मंडळींना दिली आहे.

श्री { श. १६४४ आषाढ शु. १
इ. १७२२ जून ३ }

नकल सिका

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ४९ शुभकृत नाम संवत्छरे आषाढ शुा १ रविवासरे क्षत्रीयेकुलावतंस राजा शाहु छत्रपती स्वामी याणी

सिकें सिकें वेदमूर्ती रामभट व कृष्णभट बिन कोंडभट व गंगाधरभट व सदासिवभट बीन नागेशभट इन्न यादवभट बिन आनंतभट उपनाम घोडे वा। कसबे पुणें यांस दिल्हे इनामपत्र ऐसी जे तुम्ही

(एक ओळ मजकूर फाटला आहे)

जिरात जमीन कास टके

१०९ ता। हवेली

·।। मौजे मुढवे

·।। मौजे वन्हवडे

०९ का। पुणें

१०९

१६ मौजे माण ता। कर्यांत मावल

१।।३

श्रीकेदारेश्वर देव येथे नदादीपास तेल चौत्रा जकाती का। पुणे दररोज वजन टकचंदी ००१

येकूण जमीन साडेबारा सण्या व तेल वजन टकचंदी (ए)क सेर येणेप्रमाणें आपला इनाम आहे ऐशास आपले आजे व पिते वैकुंठवासी जाहाले याकरिता सदरहू इना × × × × × पणास करार करून आपले नावे पत्रे करून देऊन (अपूर्ण)

१०८

केदारेश्वराचे कांहीं प्राचीन अवशेष

श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार यांनीं श्री केदारेश्वराविषयीं अल्प माहिती भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष २३ अं. २ (शिवचरित्रसाहित्य खंड ८) पृ. ६४ ते ६८ यांवर प्रसिद्ध करून प्रस्तुत देवस्थान ८००।९०० वर्षांचें जुनें असल्याचें ऐकिवांत आहे तर ३५० वर्षांपावेतों मागें या देवाचा दाखला ऐतिहासिक कागदपत्रांत सांपडतो इतकें तें जुनें आहे हें सिद्ध केलें आहे.

आजूबाजूवर नजर टाकतां कसब्याचा गणपति, शितोळ्यांचा वाडा, आंबिल ओढ्याचा पहिला ओघ वगैरेवरून हें देवस्थान प्राचीन असण्याचा संभव उघड दिसतो.

पुण्याचा उल्लेख राष्ट्रकूट घराण्यांतील पहिल्या कृष्णराजाच्या शके *६९० च्या तळेगांवच्या§ ताम्रपटांत "पूनक‡" असा आला असून त्यावेळीं तें विषयाचें म्हणजे जिल्ह्याचें ठिकाण होतें. याच कृष्णराजाच्या बोपखळच्या शक ६८० (इ. स. ७५८) च्या ताम्रपटांत "पुण्य" असें पुणें शब्दाच्या जवळचें रूप आलेलें आहे.†

श्री. कृ. वा. पुरंदरेकृत "किल्ले पुरंदर" या पुस्तकांत 'पुणेश्वर व नारायण' हीं दोन देवस्थानें फकिरांनीं पुरंदरीं नेल्याचा दाखला आहे.[१] हीं दोन देवस्थानें मानिलीं आहेत तेथें "पुणेश्वर, केदारेश्वर व नारायणेश्वर" अशीं तीन असावींत. मुसलमानी अमदानींत यांस उपद्रव पोहोंचल्यामुळें त्यांची स्थापना पुरंदरावर अथवा आसपास करावी लागलीसें दिसतें. शायिस्तेखानाचा वास लाल महालांत म्हणजे शिवाजीचे महालांत असल्यामुळें त्याच्या इतक्या नजीक असलेल्या देवालयास त्याजकडून अथवा त्याच्या सैन्याकडून उपद्रव होणें अस्वाभाविक नव्हतें. आदिलशाहींत कऱ्हाडास वगैरे अशीं उदाहरणें आहेत कीं स्वाऱ्यांच्या वेळेस देवस्थानांचा उच्छेद सेनापतीकडून किंवा सैन्याकडून झाल्यास व हिंदूंनीं तक्रार नेल्यास बादशहा त्यांची पुनरपि स्थापना करवून पूर्वीचीं उत्पन्नें चालूं ठेवीत. तीच परिस्थिति या बाजूस होती असें गृहीत धरल्यास केदारेश्वराचें पुरातन देवालय नष्ट झालें तरी त्यास उत्पन्न चालूं राहील. करामतीनें देवस्थानें उठविल्याचा दाखला असल्यामुळें दैवी आघाताचा प्रश्न पुढें उभा राहात नाहीं. शिवाय दैवी आघात झाले आहेत तेथें पुष्कळ अवशेष सांपडतात. ते येथें नाहींत. तथापि ते कसे नष्ट झाले हा प्रश्न अनिश्चित ठेऊं.

पंजाबांत व संयुक्त प्रांतांत असे कित्येक टिळे (moundes) होते व आहेत कीं त्यांच्याविषयींच्या दंतकथा खुदाई केल्यानंतर अगदीं खऱ्या ठरल्या. अर्थात् शेंकडों वर्षांचा काल गेल्यानंतर त्या विपर्यस्त झालेल्या असतात; तथापि सांगाडा कायम असतो. दंतकथा टाकाऊ समजून संशोधनाचे वेळीं त्यांचा अव्हेर करतां कामां नये.

तेव्हां सुमारें ८००।१००० वर्षांपूर्वीचें पूनक, पुण्य याचे अवशेष कोणत्या बाजूस असावेत याचा स्थूल मानानें विचार केला पाहिजे.

कसबा, मंगळवार, सोमवार, शनिवार या पेठेंत ते असावेत. आतां क्वचित् दिसतात. तेव्हां असलेल्यांची नोंद अवश्य करावयास पाहिजे. तसेंच नवीन इमारती मूळ जागेवर झाल्यामुळें वर वर पहाणारांच्या दृष्टीस कांहीं गोष्टी लक्षांत येणें फार कठीण असतें. उदाहरणार्थ आंबिल ओढ्याचा ओघ. हा आंबील ओढा पूर्वी केदा-

---

* २३ मार्च ७६८ इसवी. § तळेगांव ढमढेरे, पुण्यापासून २० मैल.
‡ Epigraphia Indica p. 278, Vol. XIII No. 25, Stien Konow.
† भा. इ. सं. मं. त्रै. व. ८ पृ. १७३—य. रा. गुप्ते यांची टिप्पणी. १ पृ. १३.

रेश्वराजवळून वहात होता, हें निश्चित. थोरल्या शिवछत्रपतींच्या वेळीं या ओढ्यांत पर्वतीच्या खालच्या बाजूस (ढोरांची वस्ती होती तिच्या जरा वर) आंबील वांटीत, म्हणून यास आंबील ओढा म्हणूं लागले, असें सांगतात. पण त्यापूर्वी हा एक पवित्र ओघ असून तो अमृतेश्वराचे आसपास नदीस मिळे. केदारेश्वराचें देवालय पूर्वी आंबील ओढ्याचे कांठीं होतें अशी दंतकथा आहे. हें अगदीं शक्य आहे. पुढें त्याची स्थापना पुरंदरास होऊन येथेंहि त्यास उत्पन्न चालूं राहणें (कऱ्हाडच्या उत्तरालक्ष्मी प्रमाणें) अशक्य नाहीं.

हल्लींचें केदारेश्वराचें मुख्य देवालय पेशवाईतील म्ह. इ. १७३० मधील. याच्या आग्नेयेस पिंपळाचे झाडाखालीं एक स्वयंभू लिंग आहे. शाळुंका मागाहून बनविलेली आहे. हें मूळ लिंग असणें असंभवनीय नाहीं. पण मूळ स्वयंभू लिंग हल्लीं बाण आहे त्याच्या खालीं असून कांहीं काल त्यांतून पाणी वहात असे, असें पुजारी सांगतात. त्यांचें वय हल्लीं ८७ वर्षांचें आहे, त्यांचे घराणें ५००।६०० वर्षांचें जुनें आहे असें ते म्हणतात. कांहीं झालें तरी आठ पिढ्यांची-ते धरून-माहिती ते देतात. त्यांची वंशावळ अशीः—

अनंत—यादव—नागेश—सदाशिव—मैराळ (यांनीं १५० वर्षांपूर्वी मुंढव्यास विहीर बांधली)—बाजीभट—माणिक—विनायक वय हल्लीं ८७. यांच्या नातवांचें-मुलीच्या मुलाचें-नांव वामन केशव देव आहे.

वे. शा. सं. विनायक भट सांगतात कीं मूळ स्वयंभू पंचमुखी लिंगावर इ. स. १८९६ सालीं बाण कायम बसविण्यांत आला.

गंगाधरभट व धोंडभट यांच्यांत वांटणीपत्र शक १६८२ त पंचाईत होऊन झालें. तींत त्यांचे शेजारी शितोळे देशमुख हे होते.

देवालयासमोरील मोठा नंदी जुनाच आहे. तो इ. स. १४ व्या १५ व्या शतकांतील असूं शकेल. कसब्याच्या गणपतीच्या पश्चिमेस एक व ईशान्येस एक असे दोन खांब याच वेळचे आहेत. केदारेश्वर मंदिरावर वीज पडल्याचा उल्लेख आहे.(प्रा.पोतदार)

केदारेश्वरास हल्लीं पर्वती संस्थानांतून दरसाल फक्त रुपये २४८७ मिळतात.

या देवस्थानाचा हल्लींचा सि. स. नं. ५३ आहे.

१०९

पुण्यांतील केसकर विठोबा

सदाशिव पेठेंत वरील देऊळ ट्रेनिंग कॉलेजनजीक आहे. सुमारें पावणेदोनशें वर्षांपूर्वी पुणें येथें श्री अच्युत महाराज केसकर म्हणून भागवत संप्रदायी सत्पुरुष होऊन गेले. स्वप्नांत श्री ज्ञानेश्वरांचा अनुग्रह त्यांस झाला होता असें म्हणतात. यांचे वंशज शामराज तात्या केसकर हे अच्युत महाराजांचे अनुग्रहीत होते. मुंबईतील दक्षिणी हिंदु समाजांत यांचा उपदेश व उपासनाप्रचार विशेषतः पाठारे प्रभु शेणवी सोमवंशी ज्ञातींत विशेष असे. इ. स. १८५० च्या सुमारास हे पुण्यास समाधिस्थ झाले. त्यांच्या शिष्यसांप्रदायिकांनीं सदाशिव पेठेंत श्री रुक्मिणीपांडुरंगाचें देवालय बांधून त्यांत त्यांची समाधि बांधली. यांचीं पदें व अभंग कविता पुष्कळ होती परंतु ती उपलब्ध नाहीं. यांचीं पदें कै. सुप्रसिद्ध हरिदास विनायक बोवा सातारकरप्रभृति हरदासांचें पठणांत होतीं.

शामराजतात्यांचे पश्चात् त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव रामभाऊ केसकर हे उत्तम हरिदास म्हणून दक्षिणाकमिटीकडून वार्षिक दक्षिणेस पात्र झाले होते.

ख्रिस्ती धर्माकडे झुकलेले मुंबईचे हरि केशवजी पाठारे यांस हिंदुधर्माची महती त्यांचे गुरु शामराजतात्या यांनीं पटवून दिली व ते कट्टे भागवतधर्मी बनले.

(वरील माहिती १९११ सालीं रा. रामचंद्र हरि केशवजी यांनीं प्रसिद्ध केलेल्या हरिजींच्या चरित्रांतून घेतली आहे. वर्षांचा हिशेबमात्र १९४२ च्या मानानें केला आहे.)

---

४ पुणें—देवळें—मठ—

११०

खुन्या मुरलीधर

श्रीयुत सदाशिव रघुनाथ उर्फ दादा गद्रे हे पेशवाईंत जे इतर थोर सावकार होते त्यांत अग्रगण्य होते. बुधवारांत जो किब्यांचा वाडा जळाला तो मूळचा ह्याच सावकार दादा गद्र्यांचा, आरसे महाल तिसऱ्या मजल्यावर असलेला, राहता वाडा

होय. पेढीचे सर्व व्यवहार, शनिवारांतील, जो सध्यां डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या मालकीच्या आहे, त्यांत चालत असत. आणि त्यांतच गुमास्त्यांची राहण्याची सोय केलेली होती. या दोन वाड्यांशिवाय सदाशिव पेठेंत कारकोळपुऱ्यांत जेथें दादांची बाग होती त्याच बागेच्या पूर्वेच्या कोंपऱ्यावर मुरलीधराच्या मूर्तीचीं स्थापना करण्याच्या उद्देशानें एक देवालय बांधून तयार करविलें आणि जयपुराहून सर्वोत्कृष्ट मूर्तिकार म्हणून बखतराम नांवाच्या शिल्प्यास आणविलें. मूर्ती करण्यास सर्वोत्कृष्ट असा शुभ्र संगमरवरी दगड त्याच शिल्पकाराच्या पसंतीनें आणवून त्याच्याकडून एक तांडव मुरलीधराची, दुसरी राधेची आणि दोन गाईच्या अशा चार अप्रतीम मूर्ति घडविल्या. त्या चार मूर्ती कशा आहेत तें प्रत्यक्षच पाहिलें पाहिजे. मूर्ति अत्यंत सुरेख व मनोहर आहेत. शिल्पकाराचें कौशल्य काय आहे तें दिसावें म्हणून वस्त्ररहित मूर्ति पहावी. राधेला फक्त काचोळी घातली असून बाकीचा देह मूळच्या दगडी स्वरूपांतच ठेवला आहे. मुरलीधराचीहि गोष्ट तशीच. मुरलीधराच्या मूर्तीची उंची १ फूट ११ इंच आहे आणि राधेची मूर्ति एक फूट साडेआठ इंच आहे. सिंहासन सुमारें दोन अडीच फूट उंचीचें व सोळा कोनांचें असून त्याचा दगड एकसंधी काळा आहे. सिंहासनावर चौफेर उत्कृष्ट नक्षीचें खोदकाम केलेलें असून असें सिंहासन कोठेंच बघावयास सांपडत नाहीं, इतकें तें अप्रतिम आहे. ह्या सर्व पांच वस्तूंच्या कारवाईबद्दल बखतरामाला दादा गद्रे यांनीं दहा हजार रुपये दिले असें सांगतात.

मुरलीधराची प्राणप्रतिष्ठा दादा गद्रे यांनीं स्वतः वैशाख शु. १० शनिवार पिंगलनाम संवत्सरीं सन १७९७ रोजीं म्हणजे शक १७१९ मध्यें केली. प्राणप्रतिष्ठेचें धार्मिक कृत्य चालू असतां मंदिराबाहेर अरब लोकांत मारामारी होऊन खून पडलें म्हणून हा मुरलीधर–खुन्या मुरलीधर या नांवानें प्रसिद्ध झाला. त्याच्या हकीकतीचीं दोन पत्रें खरे ऐतिहासिक मंडळसंग्रह भाग १० यांत प्रसिद्ध झालीं आहेत तीं पुढील प्रमाणें:—

ऐ. ले. सं.
भाग १० ले. ३९५२ } श्री { श. १७१९ चैत्र व. १
इ. १७९७ एप्रिल १२

विज्ञापना चैत्र व. १ बुधवार रा। दादा गद्रे यांणीं आपल्या बागेंत देवालय बांधविलें आहे. तेथें श्री मुरलीधर देव प्रतिष्ठा करून स्थापना करावयास प्रातःकालीं छ १५ सवाली आजी बागेंत गेले होते. तेथील चौकीस नानाकडील मेस्तर बैट कंपू यांजकडील लोक व आरब होते. त्या उभयतांच्या लोकांत कटकट होऊन कलह वाढला. तों दादा गद्रे कंपूकडे जाऊन बहुत प्रकार सांगत असतां ऐकिलें नाहीं. कंपूची व आरबांची गोळागोळी उडाली. तेव्हां गद्रे श्रींच्या देवालयांतून ब्राह्मणसुद्धां निघून आले ते नानांकडे जाऊन सांगितलेवरून त्यांनीं कजिया तोडावयाकरितां चोपदार

पाठविला त्यास गोळी लागून जखमी जाहला. गोळागोळी व तोफा रेखले असे मार होऊन जायाजखमी फार झाले. याजकरितां नानांच्या वाड्यापुढें आरब होते त्यांस आज्ञा होऊन ते जाऊन कंपूस मोडून त्यांच तोफा सोडवून आणिलेवरी स्वस्थ जाले. रेखल्यांचे गोळे व बंदुकीच्या गोळ्या भिरडीकरांच्या वाड्यांत येऊन पडल्या. आम्ही दरवाजा लावून बंदोबस्तानें होतो. शहरांत गलबल फार झाली. शिंदे व भोसले व मशरीन अगदीं तयार झाले होते. सरकारवाड्यांत बंदोबस्ती होती. आरबांची व कंपूची कटकट होऊन गोळागोळी झाली अशी बातमी सर्वांस समजल्यावरून स्वस्थ जाले. चारपांच घटका गोळागोळी झाली. शहराचे तमासगीर कांहीं जायाजखमी जाले. श्री राजेश्री गणपतरावांकडील पागेचा घोडा श्यामसुंदर याच्या पायास गोळा लागला. तीन पायांवर घोडा उभा राहिला. तेथें चौकशी होती. सबब नानांकडील कारकून व भालदार जाऊन घोडा पाहून आलेनंतर जबे करणेची आज्ञा झाली. त्याप्रमाणें जबे जाली. कंपूकडील मुडदे आहेत ते (कंपूवाले) नेऊं म्हणतात त्यांस आरब नेऊं देत नाहींत. येविषयीं नानांची आज्ञा होईल त्याप्रमाणें होईल. चोपदार ताकीद करून कजिया तोडावयास गेला तो जखमी झाला सबब नानांची मर्जी ठीक नाहीं. ताकीद होऊन बंदोबस्त होईल..................... ....कंपूची व आरबांची गोळागोळी जाली तेव्हां मी व विठू कानडा वगैरे तमाशा पाहात गच्चीवर जाऊन बसलों होतो तेथें गोळे येऊन पडूं लागले तेव्हां निघून आलों स्वामींच्या कृपेवरून सर्व सुखरूप आहों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

" ३ दादा गद्रे यांनीं सदाशिव पेठेंत देवालय मुरलीधराचें बांधले त्याची अर्चा वैशाख शु. १० शनवार छ ८ जिल्कादी केली ते दिवशीं मेस्तर बेट यांचे पलटणचे लोकांची व अरबांची कटकट त्या देवळाजवळ होऊन शें पन्नास मनुष्यें ठार पडली नंतर मुसोमोन्नम व शहामीरखान दरम्यान पडून कज्जा तोडला. कज्जाचें कारण विशेष नव्हते देवाजवळ अरब राहात होते तिकडून बैण्याचे लोक जाऊं लागले त्यास अरबानें मना केले ते त्यांनीं ऐकलें नाहीं त्याजवरून लढाई सुरू झाली." (खं. ७ पृ. २०)

खुन्या हें विशेषण ह्या मुरलीधर देवांस कां जडलें गेलें त्याची ही तत्कालीन पूर्ण विश्वसनीय व खरी माहिती अशी आहे. असें असतां श्री भाऊशास्त्री वझे ह्यांनीं आपल्या 'चित्रपटांत' पृ. १०७ वर खरे ऐ. ले. सं. तील लेखाचा निर्देश करून तर्कशुद्ध व विश्वसनीय रीत्या 'खुन्या' ह्या नांवाचें कारण ८।१० ओळींत दिलें आहे. आश्चर्य हें कीं, ह्यापुढें पुराणिक वझेबुवांनीं तर्कदुष्ट व अविश्वास्य वृत्त भरपूर दीडपान देऊन त्यावर मात्र कांहींच शेरा दिला नाहीं. खऱ्या वृत्तान्ताच्या पुरस्काराची ही पद्धति आम्हांस योग्य वाटत नाहीं.

मुरलीधराच्या रोजच्या पूजेकडील वेदमूर्ती नारायणभट्ट खरे यांस नेमण्यांत येऊन राघोबा या नांवाच्या एका ब्रह्मचारी ब्राह्मणास देवाचा शिष्य नेमण्यांत आलें. पुढें बाजीराव दुसरे पेशवाईवर आल्यावर त्यांचे वडील रघुनाथराव यांच्या विरुद्ध असलेल्या राज्यांतील मंडळींच्या छळवादास त्यांनीं सुरुवात केली. त्यांत प्रथम नाना फडनवीस यांचा बळी पडला. त्यांच्या मागून जे जे लोक तुरुंगांत डांबण्यांत आले त्यांत दादा गद्रे यांनाहि नगरच्या किल्ल्यांत तुरुंगवासांत राहावें लागले. दादा गद्रे यांना तुरुंगांत टाकल्यावर त्यांची सर्व इस्टेट सरकार जप्तींत गेली. त्यांत मुरलीधरहि जप्तींत पडला. त्या संस्थेची व्यवस्था बघण्याचें काम प्रथम बाजीरावांनीं खंडेराव नीलकंठ (रास्ते) यांजकडे दिलें परंतु त्यांच्याकडून योग्य व्यवस्था चालेना म्हणून बाजीरावांनीं आपाजी गंगाधर (माणकेश्वर) यांच्याकडे व्यवस्था दिल्याचें पत्र पुढीलप्रमाणें आहेः—

{ श. १७२४ श्रावण व. ४
{ इ. १८०२ आगष्ट २

87312 (गोल) इनामकमिशनचा शिक्का.

श्री

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री आपाजी गंगाधर गोसावी यांसि—

सेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सुा सलास मयातेन आलफ पेठ सदाशिव शहर पुणें येथील श्रीमुरलीधर देव व देवासन्निध बाग व घर सदाशिव रघुनाथ गद्रे यांजकडील आहे. त्याचे कामकाज खंडेराव निळकंठ यांजकडे होते ते दूर करून साल मजकुरी तुम्हांकडे सांगितलें असें. तरी इमाने इतबारे वर्तोन देवाकडील वगैरे कामकाज चौकशीनें करून देवाची वस्तभाव व भांडी वगैरे व घरांतील चीजवस्त व बागेकडील सिलकी दागिने वगैरे असतील त्याची मोजदाद करून घेणें जाणिजे छ १७ रबिलाखर आज्ञाप्रमाण (गोल) सीमालेख

ह्या पत्राप्रमाणें मुरलीधराचें संस्थान माणकेश्वरांचे ताब्यांत गेलें, त्यांनीं देवाचे दागदागिने, भांडींकुंडीं वगैरे सर्व कांहीं पुजारी नारायणभट्ट खरे यांस धाब्यावर बसवून उपटून नेलें. नारायणभट्ट वारल्यावर देवाची पूजाअर्चा वगैरे सर्व गोष्टी ब्रह्मचारी राघोबाच करीत असे व नारायणभट्ट खरे पुजारी यांची बायको भागीरथीबाई त्याच्याच संमतीनें चालत होती. तिलाहि माणकेश्वरानें बंगल्यांतून हुसकावून लावली तेव्हां ती मुरलीधराच्या आवारांतील एका जागेंत गच्चीखालच्या घरांत येऊन राहिली. पुढें राघोबा वृद्ध होऊन संन्यास घेण्याची तयारी करूं लागला म्हणून भागीरथीबाईनीं

देवाची पूजाअर्चा करण्यास आपल्या चुलत दिराचे दोन मुलगे लक्ष्मण ऊर्फ बाळंभट्ट आणि पुरुषोत्तम ऊर्फ बाबाशास्त्री यांस त्र्यंबकेश्वराहून येथें आणवून त्यांतील पसंत पडेल त्यास देवस्थानचें कार्य करण्यास ठेवून घेण्याचें ठरविलें. त्या दोघांचे वडील मोरेश्वर त्र्यंबक खरे हे त्र्यंबकेश्वरीं इंद्रेश्वराचें वार्षिक दोनशें रुपयांचें वतन संभाळून उदरनिर्वाह करून असत.

लक्ष्मण उर्फ बाळंभट्ट खरे हे भागिरथीबाईच्या मदतीला असल्यामुळें त्यांना ठेवून घेऊन धाकट्या बाबाशास्त्र्यांना परत त्र्यंबकेश्वरीं लावून दिलें. पुढें पेशवाई गेली व अंग्रेजी झाली; तेव्हां दादा गद्रे यांची आल्पिष्टन साहेबानें नगरच्या किल्ल्यां-तून सुटका केली व त्यांच्या सरकारी जप्तींत असलेल्या इस्टेटीची व्यवस्था काय करायची ती त्यांनीं करावी असें ठरविलें. पण दादा गद्रे यांचा स्वर्गवास झाल्यानें त्यांची इस्टेट ज्यांच्या हातीं होती त्यांच्याचकडे ती राहिली व तिच्यावर तेच आपली मालकी सांगूं लागले. त्यालाच अनुसरून माणकेश्वर हे आपणांस मुरलीधराचे मालक म्हणवून घेऊं लागले. पुजारीण भागिरथीबाई यांनीं त्याच वेळीं बाळंभटजी खरे यांस देवस्थानचें बक्षीसपत्र करून दिलें. नंतर थोडक्याच काळांत त्यांनीं स्वर्गवास केला. राघोबानें संन्यास घेऊन आधींच स्वर्गवास केला होता. त्याची समाध मुरलीधराच्या प्रदक्षणेच्या वाटेवर नैर्ऋत्येला आहे. तिच्यावरचें वृंदावन आतां नष्ट झालें असून दगडी चौथरा तेवढा अद्यापि कायम आहे.

यापुढें माणकेश्वर आणि बाळंभट्ट खरे यांच्यांत तंटा सुरू झाला. कोर्टकचे-र्यांचीं कामें सुरू झालीं. त्यांत खर्चास लागणारें द्रव्यसाहाय्य तत्कालीन सावकार बाळाजी नाईक केळकर यांनीं केलें आणि साहेब लोक व अधिकारी इत्यादिकांना भेटून काम सरळ मार्गास लावावयाचे श्रम श्रीयुत कृष्णशास्त्री वैजापुरकर यांनीं केलें. त्या प्रसंगीं इनाम कमिशनचें काम सुरू होतें. त्यांत वर दिलेलें बाजीरावाचें पत्र वैजापूरकरशास्त्री यांनीं रा. ब. गोपळराव हरि देशमूख यांच्या मदतीनें रुजू करून घेऊन भागिरथीबाईच्या ता. १७ मे १८५१ च्या बक्षीस पत्राप्रमाणें देवालय, बंगला आणि बाग हीं तिन्ही स्थळें पुजारी बाळंभट्ट खरे यांच्या नांवावर वारसा म्हणून नोंद-ण्यांत आलीं आणि माणकेश्वरांचा ताबा संपला.

माणकेश्वरांचा ताबा उडाल्यानंतर बाळंभट्ट खरे पुजारी यांचे ताब्यांत पुढील-प्रमाणें क्षेत्रफळाच्या तीन जागा आल्या—

बाग– २३५ × २१६, मंदिर– ११३ × ८६ आणि बंगला– १०३ × ७६; या तिन्ही जागा अद्यापि बाळंभट पुजारी यांचे दोघे पणतु गोविंदराव ऊर्फ नाथ आणि गोपाळराव यांच्या ताब्यांत वहिवाटदार मालक म्हणून आहेत व त्यांनाहि लहान मुलगे अनुक्रमें बाळकृष्ण आणि दिवाकर या नांवाचे आहेत.

बाजीराव गेल्यानंतर श्रीमुरलीधराचे इस्टेटीबद्दल बाळंभट्टांना जो सरकारांत माणकेश्वरांच्या विरुद्ध लढा लढावा लागला त्यांत त्यांच्या बाजूनें काम करणारे त्यांचे मदतनीस असे– गोविंदभट दाते, कृष्णशास्त्री वैजापुरकर, विष्णुशास्त्री देवधर पुराणिक, विनायकभट्ट दाते आणि बाळाजी नाईक केळकर–पांच इसम होते. यांतील शेवटचे केळकर हे देवाची इस्टेट स्थीरस्थावर करण्यास बरेच उपयोगी पडले. सध्यां जो लाकडी सभामंडप मुरलीधराचा आहे तो आणि गाभाऱ्यांत देवावर जी लाकडी मेघडंबरी आहे ती, त्यांनींच आपल्या खर्चानें बांधलीं.

त्यावेळीं पुण्यांत विसोबा अण्णा राजाध्यक्ष उर्फ घरमोडे या नांवाचे गृहस्थ पुण्यांतील जुन्या इमारती विकत घेऊन त्यांच्या विक्रीचा धंदा करणारे उद्याला आले होते. त्यांचा वाडा उंबऱ्या गणपतीस लागून जो सध्या लिमयांच्याकडे आहे तो होय. विसोबा अण्णांनीं शनिवार पेठेंतील हरिपंत भावे या नांवाचे श्रीमंत गृहस्थ भिकेला मिळाले होते त्यांचा वाडा खरीद करून, दिवाणखाना पांच हजार रुपयांस विकण्याचें प्रसिद्ध केलें. तेव्हां त्या दिवाणखान्यांतला अर्धा भाग बाळाजी नाईक केळकर यांनीं अडीच हजार रुपयांस विकत घेऊन तो मुरलीधराच्या सभामंडपाच्या कामीं लाविला. देवाचा वार्षिक श्रावण मासांतला दहा दिवसांचा उत्सव तेच करीत असत. परंतु पुढें देवाच्या इस्टेटीच्या समायिक मालकीचा प्रश्न निघून बाळंभट खरे व बाळाजी नाईक केळकर यांच्यांत तंटा सुरू झाला तेव्हां केळकरांनीं देवाचा उत्साह करण्याच्या कामांतून आपलें अंग काढून घेतलें. मग तें काम लगेच कै. रामचंद्र तिमाजी कानडे या गृहस्थांनीं आपल्या हातीं घेतलें. देवाचा उत्सव अद्यापि त्यांचेच वंशज दरसाल करीत असतात व केळकरांकडून उत्सवांतील नैवेद्य समर्पण केला जातो.

धारचे पवार सरकार देवाच्या सांजवातीकरतां वार्षिक पन्नास रुपये गेलीं सुमारें पाऊणशें वर्षें श्रावणमासांत धाडीत असतात. तेवढेंच देवाला बाहेरचें उत्पन्न असून पर्वती संस्थानांतून पूर्वीं कांहीं मिळत असल्यास न कळे ! बाकी देवाला उत्पन्न कांहीं नव्हतें. देवापुढें येणाऱ्या धर्मादाय वस्तूंवरच सर्व व्यवस्था पुजारी मालकांना भागवावी लागत असे. पण सध्यां ती स्थिति राहिलेली नाहींच. देवाच्या बागेचा सुमारें निम्मा भाग शिवाजीमंदिराकडे ९९ वर्षांच्या भाडेपट्टयानें देण्यांत आला असून त्याचें भाडें वार्षिक दोनशें रुपये मिळतें. बाकीच्या अर्ध्या जागेचे त्याचप्रमाणें कांहीं लोकांना कांहीं वर्षांच्या भाडेपट्टयानें इमारती बांधण्यास जागा देण्यांत आल्यानें तेंहि भाड्याचें उत्पन्न पुजारी मालकांना मिळतें. त्याशिवाय बंगला आणि देऊळ यांतील इमारतींचेंहि भाडें येतें. तें सर्व मिळून सध्यां मालकांना दरमहा अदमासें दोनशें रुपये मिळतात आणि देवापुढील तांदूळ वगैरे सांसारिक वस्तूंचाहि लाभ होतो.

मुरलीधराचे देवालयाभोंवतीं तटाप्रमाणें चौफेर सुमारें दीड पुरुष उंचीच्या भिंती असून मुख्य दरवाज्यावर नगारखाना आहे. चौघडा फक्त उत्सवाच्या दहा दिवसांतच वाजविला जातो.

वरील इस्टेटीच्या चतुःसीमा—दक्षिण, पूर्व आणि उत्तर या तिन्ही दिशांना सरकारी रहदारीचे रस्ते असून पश्चिमेला बागेला लागून अप्पा बळवंत मेहेंदळे यांचा बाग होता. सध्यां त्या जागेंत केळकर आणि बापट यांच्या इमारती आहेत.

एणेंप्रमाणें थोडक्यांत खुन्या मुरलीधराचा* इतिहास आहे. सध्यां ह्या देवळावर म्यु. घ. नं. ३९० सदाशिव असा आहे आणि हें मंदिर पुण्यांतील एक प्रसिद्ध धार्मिक कीर्तन प्रवचनाचेहि कार्यक्रमाचें स्थळ म्हणून विख्यात आहे.

---

* येथें दोनतीन गोष्टी सुचवाव्याशा वाटतात. 'खुन्या' हें ह्या मुरलीधराचें नांव समकालीन किंवा त्याच्या आसपासच्या कालांतील कागदांत प्रथम कोणीं कोठें योजिलें आहे हें पाहिलें पाहिजे. तसें पाहतां इ. स. १८११ पर्यंत ह्या नांवाची जोड ह्या देवास दिसत नाहीं. गद्रे कुलवृत्तांत पृ. २३७ वर इ. १८०२ चें जें पत्र छापलें आहे त्यांत किंवा दुसरे बाजीराव रोज. पृ. २९६ वर इ. स. १८११ ची नोंद आली आहे तींत 'मुरलीधर देव' किंवा 'दादा गद्रे यांचा मुरलीधर देव' असाच सोज्वळ निर्देश आला आहे. दुसरी गोष्ट ही कीं, ह्या मुरलीधराची स्थापना वा प्राणप्रतिष्ठा विशेषतः प्राणप्रतिष्ठा म्हणजे अर्चा कोणच्या दिवशीं झाली ? ऐ. ले. सं. भा. १० ले. ३९५२ मधील पत्रांत 'मुरलीधर देवप्रतिष्ठा' असा उल्लेख असून हें पत्र चैत्र व. १ चें आहे आणि रा. खं. ७ पृ. २० वर मुरलीधराची अर्चा वैशाख शु. १० शनिवारीं झाल्याचें टिपण दिलें आहे. हेंच टिपण 'मंडळ इति. वृ.' १८३६ पृ. १९५–९६ वर दिलें आहे. शक १७१९ हेंच वर्ष दोन्ही मितींचें आहे. तेव्हां दोनदां अर्चा झाली कीं काय ? विशेष हें कीं ह्या दोन्ही दिवशीं नेमकें मेस्तर बैट त्यांच्याकडील कंपू पलटण आणि अरब ह्यांत मारामारी होऊन खून पडले हें कसें ? वाटतें कीं, चैत्रांत देवप्रतिष्ठा झाली व तेव्हां देवळाजवळ अरब होते त्यांनीं, टोपीकरांचे मानानें आपणांस देवळाजवळ येण्यास जवळचे मानिले व म्हणून, कंपूवाल्या टोपीकरांस देवळाजवळून जाण्यास मना केलें. त्यामुळें कटकट माजली व कंपूवाल्यांचे व त्याबरोबर इतर कांहींचे खून पडले. हा प्राणप्रतिष्ठेस अपशकूनच झाला. म्हणून पुढें पुनः वैशाखांत पुनरर्चा झाली असावी व हें सांगत असतां 'तें दिवशीं' च्या म्हणजे चैत्रांतील झालेल्या कटकटीचा निर्देश केला असावा. तिसरी गोष्ट कीं, हें खुन्या नांव पडण्याच्या इतर ज्या दंतकथा खोट्या पण कोणीं सांगितल्या आहेत त्यांत नाना फडणिसांचा संबंध येण्याचें एक कारण आहे. ह्या मुरलीधराच्या पहिल्या स्थापनेच्या

१११

श्री कृष्णेश्वर

सदाशिवशास्त्री आणि कृष्णशास्त्री द्रवीड हे दोघे विद्वान् बंधु तैलंगणांतून थोरले माधवराव पेशवे यांच्या राजवटींत; पुण्यास आले. हे दोघे आगमपंथी सामवेदी ब्राह्मण होते. जैमिनी, राणायणी आणि कौथुमी ह्या ज्या सामवेदाच्या तीन गान-पद्धति त्यांपैकीं हे दोघे राणाय्णी शाखेचे होते. सदाशिवशास्त्री वैद्यशास्त्रांत अत्यंत प्रवीण असल्यानें त्यांना राजवैद्याचा मान प्राप्त झाला होता. त्यामीं सदाशिव पेठेंतल्या कारकोल पुऱ्यांत खुन्या मुरलीधराचे देवालयाचे पूर्वेच्या बाजूस रस्त्याला लागूनच आपलें घर बांधिलें. त्याचें क्षेत्रफळ २०० × १०० होतें. नाना फडणविसांच्या गोष्टींत जी एक 'नळाची व्यथा' झाल्याची गोष्ट आहे ती याच सदाशिवशास्त्री ह्यांचे संबंधी होय. त्यावेळीं त्यांच्या घरावरून नानांनीं आंबेगांवाहून आणिलेल्या पाण्याचा जो नळ रस्त्याखालून गेला आहे त्याला मधें तोंड पाडून नळाचें पाणी जें शास्त्रिबोवांना दिलें त्याचा उछ्वास अद्यापि 'द्रविडांचा हौद' या नांवानें प्रसिद्ध आहे.

सदाशिवशास्त्री हे महान् तपस्वी आणि सिद्ध पुरुष असल्यानें नाना फडणविसांनीं यांच्याकडून दीक्षा घेतली होती, असें सांगतात. या सामवेद्यांनीं जें आपलें घर बांधिलें व जेथें संसार थाटला तें सध्यां चार तुकड्यांत चार मालकांकडे विभागलें गेलें असून चौथ्या तुकड्यांत द्रवीड राहात आहेत.

सदाशिव शास्त्र्यांनीं वैद्यकीवर चांगलें द्रव्यार्जन केलें होतें. परंतु पोटीं संतान नसल्यानें त्यांनीं अखेरीस आपले बंधु कृष्णशास्त्री यांच्या नांवानें मृत्युपत्र करून आपण संन्यास घेतला. त्यांची समाधी वर सांगितलेल्या द्रविडांच्या हौदाच्या पूर्वदिशेला बेलाच्या वृक्षाखालीं असून त्या समाधीची पूजा-नैवेद्यादि कर्में अद्यापि चालू आहेत.

सदाशिव शास्त्री दिवंगत झाल्यावर त्यांचे बंधु कृष्णशास्त्री सर्व व्यवहार पाहूं लागले. नारो रघुनाथ साठे या नांवाचे एक चलाख गृहस्थ त्यांचे कारभारी झाले व

दिवशींच नाना वाड्यांत एक श्रीकृष्णाचीच पण मुरलीधर नव्हे, कालियामर्दन श्रीकृष्णाची, सुवर्णाची मूर्ति प्रतिष्ठित केली व तिकडेहि असाच कांहीं प्रकार होऊन कटकट झाली (ऐ. ले. सं. भा. १० ले. ३९५४ व ३९५८ पहा.). म्हणजे एकाच दिवशीं दोन ठिकाणीं प्राणप्रतिष्ठा व दोन्ही ठिकाणीं स्वतंत्रपणें कांहीं कटकटी व मारामारी झाल्या. नानांच्या ह्या सुवर्णमूर्तीचें दान झालें म्हणून त्याविषयींची अशी वार्ता सांगण्यास अधिष्ठान राहिलें नाहीं व ह्या बिचाऱ्या मुरलीधराविषयीं मात्र खुन्या इत्यादींची जोड फुकी चिकटली. देवस्थापनेचा वाढदिवस माघ शु. ५ स पाळला जातो हें वेगळेंच.--शं. ना. जोशी

त्यांनीं त्यांच्या घरापैकीं मुरलीधराला समांतर असा एक रस्त्याला लागून असलेल्या जमिनीचा पट्टा हौदाच्या पश्चिम भिंतीला लागून स्वतःस राहण्याकरितां मागून घेतला. व ते गाणपत्य असल्यानें त्यांनीं हौदाच्या अलीकडे एका शमीचे झाडाखालीं 'मोरेश्वर' नांवाच्या गणपतीचें छोटेंसें मंदिर बांधिलें व त्याच्या जवळच स्वतःला राहाण्यास एक हवेलीहि उभारली. पुढें कृष्णशास्त्री वारल्यानंतर त्यांचे पुत्र भाऊशास्त्री व्यवहार पाहूं लागले. कृष्णशास्त्री यांनीं आपल्या घरालाच लागून असलेली बखळ-जागा आपटे यांजकडून खरेदी करून तेथें आपल्या नांवाचें ' कृष्णेश्वराचें ' देऊळ बांधलें. या सर्व कार्याला त्यांनीं तीस हजार रुपये खर्च केले. कृष्णशास्त्र्यांचें हें घर व देऊळ याच्या चतुःसीमा—दक्षिण, पश्चिम व उत्तर या तीन बाजूंनी सरकारी रहदारीचे रस्ते व पूर्व बाजूला पेशवाईतील प्रसिद्ध नारोपंत चक्रदेव यांचा बाग, अशा होत्या. आतां चक्रदेव यांच्या बागेंत अनेक इमारती बांधल्या गेल्या आहेत.

कृष्णशास्त्री यांच्या पश्चात् त्यांचे चिरंजीव भाऊशास्त्री यांनीं व्यवहार चालविला. परंतु ते अति चैनी असल्यानें त्यांची वडिलार्जित इस्टेट लय पावूं लागली. त्यांनीं राहतें घर विकलें व ते कृष्णेश्वराच्या देवळांत येऊन राहिले. त्यांच्या राहात्या घराच्या जागीं सध्यां चिटगुप्पीकरांचा वाडा असून त्याच्या अलिकडे साठ्यांनीं जो इमला बांधला होता त्याचे मालक आतां परांजपे आहेत. नाना साठ्यांच्या नातवानें हा इमला कर्जात घालविला. आतां मोरेश्वराचें देऊळ, शमीचें झाड व थोडासा घराचा भाग त्यांच्या वंशजांच्या ताब्यांत आहे.

भाऊशास्त्री निवर्तल्यावर त्यांच्या मागें कृष्णेश्वराची मालकी शंकरभट्ट द्रवीड यांचेकडे आली. शंकरभट्ट राणायणी पद्धतीचे सामवेदाचे गायक म्हणून प्रख्यात होऊन गेले. त्यांना चार मुलगे होते. त्या वेळीं गणेश व रामचंद्र हे थोरले दोघे पुत्र पुण्यास चाफेकरांनीं जे रँड व आयर्स्ट यांचे खून केले त्या भानगडींत चाफेकर व रानडे यांच्या कडून मारले गेले. त्यांच्या खालचे लक्ष्मणशास्त्री सध्यां राणायणी सामवेद गायनपटु म्हणून प्रसिद्ध आहेत. चौथा मुलगा नीलकंठ हा प्लेगमध्यें मेला. खून झालेल्या गणपतरावांचा मुलगा हा सध्यां चांगल्या नांवलौकिकाचा वकील सध्यां पुण्यांत आहे.

व्यासांनीं सामवेद जैमिनीला शिकविला व त्याचे अनेक विद्यार्थी अनेक प्रकारांनीं तो वेद गाऊं लागले. त्यांतून वर सांगितलेल्या तीन पद्धतीच अस्तित्वांत राहिल्या. त्यांतील जैमिनी पद्धत सध्यां बहुतेक नष्टप्रायच झाली आहे; तशीच लक्ष्मणशास्त्र्यांच्या मागें राणायणी पद्धतीहि नष्टच होणार आहे. कौथुमी पद्धति मात्र अद्यापी सर्व हिंदुस्थानभर प्रचलित आहे.

औंधचे पंडित सातवळेकर सामवेदाच्या तिन्ही प्रकारच्या मूळ संहितांचा शोध करीत सर्व हिंदुस्थानांत हिंडले परंतु त्यांना एकच ब्राह्मण श्रीरंगम् येथें जैमिनी

पद्धतीचें स्वरगान करणारा जसा भेटला तसाच राणायणी पद्धतीचें सामगान करणारा पुण्यास लक्ष्मणशास्त्री हा विद्वान् ब्राह्मण भेटला. ह्यावरून त्या दोन्ही पद्धति नष्टप्रायच झाल्याचें दिसतें. श्रीरंगम्च्या ब्राह्मणाचीं मुलें जशीं इंग्रजी विद्येच्या नादीं लागलीं आणि आपल्या घरचें जुनें ठेवणें विसरलीं; तद्वतच लक्ष्मणशास्त्र्यांचींहि मुलें इंग्रजी विद्येच्या नादीं लागल्यानें वडिलार्जित विद्या शिकलीं नाहींत. आणि हेंहि काळाला अनुसरून योग्यच झालें म्हणायचें! असें आहे तरी सध्यांच्या पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे पारशी प्रिन्सिपाल डॉ. तारापूरवाला हे लक्ष्मणशास्त्र्यांपाशीं सामवेदाचें गान शिकत होते ही नवल करण्यासारखी गोष्ट आहे. असो. कालाय तस्मै नमः।

कृष्णेश्वराच्या देवळाचा म्यु. घ. नं. ५१७ आहे.

११२

काशीकरांचें लक्ष्मीनारायणाचें मंदीर

आत्मारामभट बिन कृष्णंभट पुराणीक या नांवाचे काश्यप गोत्री देशस्थ ब्राह्मण पेशवाईच्या शेवटच्या काळांत वाराणशी येथें एका संन्याशाजवळच वैद्यकीचें अध्ययन करीत होते. अध्ययन पुरें झाल्यावर त्यांनीं कलकत्त्यास आंग्रेज कंपनी सरकारकडे देशी वैद्य या नात्यानें नौकरी धरली. परंतु त्यांचें तेथें न पटल्यानें ते भोरकर सचिवपंतांच्या निमंत्रणावरून पुण्याकडे निघून आले. सचिवपंतांनीं त्यांना दोनशें रुपये वर्षासन सुरू केलें.

आत्मारामभट पुराणीक पुण्यास आल्यावर त्यांनीं हरिहरेश्वराचे देवालयाचे बोळांत एक जागा खरीद करून तेथें घर बांधलें आणि त्यांत ते सहकुटुंब राहूं लागून वैद्यकीचा धंदा करूं लागले.

आबा शेलूकर या आडनांवाचे एक दुसऱ्या बाजीरावसाहेबांच्या कारकीर्दींत सावकार होते. त्यांनीं आपला वाडा प्रसिद्ध सावकार परांजपे यांच्या वाड्याला लागून बांधला. त्यांतील कांहीं भाग अद्यापि शिल्लक आहे. वाडा उत्तराभिमुख असून त्याचा दरवाजा मोठा आहे. दरवाजांत दिंडी आहे. त्याचे मालक सध्यां कॉन्ट्रॅक्टर रानडे बदर्स हे आहेत. हा वाडा ज्या बोळांत आहे त्याच बोळाला **शेलूकरांचा बोळ** असें म्हणतात.

ह्या शेलूकर सावकाराचें बरेंच कर्ज दुसऱ्या बाजीरावांनीं घेतलें होतें. त्याची फेड व्हावी म्हणून बाजीरावांनीं त्यांना गुजराथेंतील आपल्या मालकीच्या महालांचें उत्पन्न लावून दिलें होतें. त्यामुळें शेलूकर तिकडे वसूलीस गेले असतां तिकडेच त्यांचा स्वर्ग-

वास झाला. त्यावेळीं पुण्यांतील त्यांचा वाडा त्यांची नायकीण (चिमा ?) हिच्या वहिवाटींत होता. पुढें पेशवाई गेल्यावर तीच त्याची मालकीण बनली. ती पुढें वयोवृद्ध झाली असतां दमा, पृष्ठिमूळ आणि रक्ती मुळव्याध यांनीं अतिशय पीडित झाली. तिनें अनेक औषधें केलीं परंतु गुण आला नाहीं. तेव्हां पुण्यास नवीनच येऊन वैद्यकी करूं लागलेल्या आत्मारामभट पुराणिकांचें औषध घेऊन पाहण्याची तिला इच्छा झाली. तिच्या इच्छेस फळहि आलें. पुण्यांतील ह्या वैद्यांच्या औषधानें तिला गुण वाटूं लागला व कांहीं दिवसांनीं ती खडखडीत बरी झाली. तेव्हां वैद्यबोवांच्या परिश्रमाचें आपण उतराई व्हावें म्हणून तिनें त्यांना देण्यास द्रव्य नसल्यानें आपलें घर आणि परांजपे सावकार यांचें घर यांच्यामध्यें जो एक जमिनीचा मोकळा लहानसा पट्टा अथवा पट्टी होती ती, त्या वैद्यबोवांना तिनें त्यांच्या परिश्रमाबद्दल बक्षीस दिली. काशीकर वैद्यांना संतोष झाला. ती बाई पुढें वृद्ध होऊन वारली. तेव्हां तिचें घर किवळेकर रामभाऊ रानडे यांच्या मालकीचें झालें. सध्यां त्यांचीं नातवंडें त्या घराचीं मालक आहेत हें वर सांगितलेंच आहे.

असो. यानंतरचा काशीकर वैद्यबोवांचा इतिहास पारमार्थिक कसा झाला तें सांगतों.

पेशवाईंतील प्रसिद्ध मोरोबादादा फडणवीस हे जलोदरानें अत्यंत पीडले गेले व कोणत्याहि औषधाचा इलाज चालेना; तेव्हां त्यांनीं काशीकर वैद्यांचें औषध सुरू केलें. चमत्कार असा झाला कीं, ते त्यांच्या औषधानें अगदीं निःशेष बरे झाले. त्यांची मर्जी वैद्यबोवांवर सुप्रसन्न झाली. ' इच्छा असेल तें पारितोषिक मागून घ्या. अनमान होणार नाहीं. इच्छा पुरी करण्यांत येईल. ' असें त्यांनीं वैद्यबोवांना सांगितलें. तेव्हां त्यांनीं दादांच्याकडून कोणत्याहि प्रकारची द्रव्याची अपेक्षा न धरितां त्यांच्या वाड्यांत एक गरुडवाहन लक्ष्मीनारायणाची मूर्ति होती तिची मागणी केली. ती शुभ्र संगमरवरी दगडाची मूर्ति मोरोपंतांनीं स्वतःकरितां मुद्दाम कारागिराकडून तयार करविली होती व तिची प्राणप्रतिष्ठा करून तिचें एक मंदीर बांधण्याचा त्यांचा संकल्प; तरी पण वचन दिलें गेल्यानें त्यांनीं ती मूर्ति काशीकर वैद्यबोवांना अनमान न करतां दिली व त्यांच्या ऋणांतून ते मुक्त झाले.

आत्मारामभट्ट पुराणीक काशीकर वैद्य बोवांनीं ती मूर्ति त्यांच्या वाड्यांतून उचलून आणून, शेलूकरीण बाईनें बक्षिस दिलेल्या जागेवर तिची प्राणप्रतिष्ठा केली. हरिहरेश्वराच्या बोळांतील घर विकून टाकून त्याच्या आलेल्या रकमेंतून त्यांनीं देवापुढें मंडप बांधला आणि बाजूला आपणांस सहकुटुंब राहण्यास घरहि उभारिलें.

देवतेचा पुजारी कशा वर्तनाचा असावा याचा शास्त्राधार काढून त्यांनीं मुकाट्यानें वैद्यकी वगैरे धंदे करणें गौण असल्याचें शास्त्रांत सांगितलें असल्यानें आपला वैद्यकीचा धंदा बंद केला व देवापुढें पुराण सांगण्याचा परिपाठ सुरू केला. त्यावर

त्यांचें कसेंबसें भागूं लागलें. त्यांनीं बांधलेल्या घराचा सध्यां म्युनिसिपल घरनंबर ६५२ आहे.

काशीकर वैद्यबोवांना गणपतराव व गोविंदराव या नांवाचे दोन मुलगे होते. गणपतरावांनीं आपल्या तीर्थरूपांचें स्मारक म्हणून लक्ष्मीनारायणाच्या देवळाच्या डाव्या बाजूस मध्यें बरेंच अंतर सोडून 'आत्मारामेश्वर' या नांवाच्या लिंगाची स्थापना केली. व त्यावर दगडी देवालय बांधिलें. वरील दोन्ही देवळें अद्यापि कायम असून धाकटे गोविंदराव यांच्या वंशजांच्या तीं वहिवाटीस आहेत. गणपतराव निपुत्रिक वारले.

धाकटे चिरंजीव गोविंदराव बाळपणींच घरांतून बाहेर पडून सांगलीकर नाटक मंडळींत गेले. तेथें त्यांनीं पौराणिक नाटकाच्या धंद्याबरोबर चित्रकलेचें ज्ञान संपादिलें. गणपतराव वारल्यावर ते परत आपल्या घरीं पुण्यास आले व मिळविलेल्या चित्रकलेच्या ज्ञानावर संसार करूं लागले. त्यांना तीन पुत्र झाले ते—विष्णु, महादेव आणि चिंतामणि. विष्णु मयत असून त्याचे दोघे पुत्र होळकरी संस्थानांत नोकऱ्या करीत आहेत. मधला महादेव हा आधुनिक ड्राइंगच्या कलेंत प्रवीण असून, धाकटा चिंतामणी हा पुण्याच्या चित्रशाळेंत लिथो आर्टिस्ट असून शंभर रुपये दरमहावर नौकर आहे.

लक्ष्मीनारायणाला कोठलेंहि उत्पन्न कांहीं नाहीं; आणि त्याची बरीच आबाळ होते हें जाणून, त्या देवतेची भक्ति करणाऱ्या एक गतभर्तृका अन्नपूर्णाबाई ऊर्फ अनुबाई जोशी या नांवाच्या निपुत्रिक बाई होत्या, त्यांची वार्षिक सवाशें रुपये उत्पन्नाची इस्टेट होती ती त्यांनीं लक्ष्मीनारायणाच्या वार्षिक उत्सवाप्रीत्यर्थ धर्मादाय केली व त्याचे रानडे कॉंट्रॅक्टर ब्रदर्स यांना ट्रस्टी नेमिलें. लक्ष्मीनारायणाचा श्रावण मासांतील वार्षिक उत्सव, ब्राह्मणभोजन इत्यादि सर्व रानडे ब्रदर्स करीत असतात.

११३

जोगेश्वरी–बेंद्रे

प्रस्तुतचे कागद पुणें येथील जोगेश्वरीचे पुजारी श्री. भालचंद्र दामोदर बेंद्रे यांनीं त्यांतील मतलब समजावून घेण्यासाठीं मजकडे आणले होते. या कागदांचीं मूळें मला पहावयास सांपडलीं नाहींत. मूळांच्या सुमारें ८० वर्षांपूर्वी कोर्टांत गुदरलेल्या नकला मला पहावयास मिळाल्या. त्यावरून असें दिसतें कीं, या नकलांचीं मूळें जीर्ण व जागजागीं फाटलेलीं होतीं. यामुळें व अज्ञानानेंही नकला सदोष बनल्या; पण कागद बव्हंशीं प्रामाणिक असावे असें वाटल्यानें ते येथें प्रसिद्ध करीत आहे.

१

सु. १०५१
हि. १०५१ जिल्हेज १७

श. १५६३ फाल्गुन शुद्ध ११
इ. १६४२ मार्च २

[शिक्यांत*] [1]العبد سیدی عنبر یاقوت خانی

از رختخانہ خاص بجانب عاملان حال و استقبال و دیسموکھان و دیسپاندیان و مقدمان و مزارعان قصبہ پونہ بدانند شہور سنہ احد [2]خمسین و الف درنیولا کیشو اننت کالے گرو پوجاری بتخانہ امرتے سروہ کہ در قصبہ پونہ در کچہری عدالت آمدہ معلوم نمود کہ حق و رسوم من از قدیم الایام چلیدہ آمدہ است و دیگر زناردار در حق من مانع می شوند ازین باعث تاکید از حضور پرنور شود کہ حق و رسرم من چنانچہ چلیدہ آمدہ است جاری باشد پس از روی تحقیقات معلوم گردید کہ حق و رسوم گرو مذکور در بتخانہ مذکور از بزرگان او چلیدہ آمدہ است باید کہ حق و رسوم گرو مذکور در بتخانہ مذبور چنانچہ از قدیم الایام چلیدہ آمدہ است روان دارند و دیگر بتخانہ کہ احداث شود در انجا ہم حق گرو مذکور است بموجب شد آمد قدیم بگرو مذکور باولاد و احفاد روان دارند و کسے دیگر برادر حق و رسوم او دست اندازی کردن ندہند درین باب تاکید دانند و تعلیق گرفتہ اصل بہ بہو گوتہ بگرو مذکور باز دہند

تحریر فی التاریخ ھفدھم شہر ذی حجہ سنہ ۱۰۵۱

پروانگی حضور خورشید ظہور اشرف اقدس ہمایون اعلی

[सारांश*]

सीदी अंबर याकूतखानी→अधिकारी, देशमूख, देशपांडे, मुकद्दम, शेतकरी, कसबे पुणें

या वेळीं पुणें येथील अमृतेश्वर देवळाचे पुजारी केशव अनंत काळे गुरव यानें अदालतीच्या कचेरींत येऊन कळविलें कीं माझे हक्क व रुसूम पूर्वीपासून चालत

१ मूळ पत्राचे आरंभीं खरोखरच येथें दिल्याप्रमाणें शिक्का असेल तर किंवा शिक्का मुळीच नसला तरी पत्राचा आरंभ व शेवट दोन्ही प्रामाणिक पत्रांच्या पद्धतीस धरून नाहींत. यामुळें पत्राच्या खरेपणाविषयीं शंका येते.

२ येथें ।निदान اربعین पाहिजे. बहुधा नकलकारानें अज्ञानानें सुहूर व हिजरी यांचे आकडे एकच असावयास पाहिजेत अशी समजूत करून घेऊन १०५१ लिहिलें.

आले आहेत. पण इतर ब्राह्मण त्यांत अडथळा आणीत आहेत. तरी हुजरून ताकीद व्हावी कीं, माझे हक्क व रुसूम चालत आल्याप्रा॥ चालू ठेवावे. विचारपूस करतां कळून आलें कीं, वरील गुरवाचे उपर्युक्त देवळाविषयीं हक्क व रुसूम त्याच्या वाडवडिलांपासून चालत आले आहेत. वरील देवळाबाबतचे हक्क व रुसूम पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणें चालवावे. नवीन देऊळ झाल्यास त्यांतही याचे हक्क असून तेही सुदामदप्रा॥ त्यानें वंशपरंपरेनें घ्यावे. कोणाही भाऊबंदास त्याच्या हक्करुसूमांत हात घालूं देऊं नये. या बाबतींत ताकीद जाणावी. याची नकल घेऊन असल भोगवट्यासाठीं गुरवास परत द्यावें. ता. १७ जिल्हेज सन १०५१ हिजरी; सु. ११५१. हुजूरच्या परवानगीनें.

२

जु. ४९ रमजान २९ }

{ श. १६२६ माघ शुद्ध १
इ. १७०५ जानेवारी १५

[शिक्यामध्यें*] ۱۱۰۲ عالمگیر سنہ بادشاہ خانہ زاد حسین خان

متصدیان مہمات حال و استقبال و دیسمکہان و دیسپاندیان و
پتواریان و مقدمان و مزارعان پرگنہ پونہ سرکار جنیر مضاف صوبہ
خجستہ بنیاد بدانند کہ بموجب پروانہ سیادت ماب فضیلت انتساب زین
العابدین واقع تاریخ ۱۹ شہر شوال سنہ ۳۱ جلوس والا و بموجب پروانہ
سیادت و وزارت پناہ دیانت خان واقع تاریخ ۲۷ شہر رجب المرجب
سنہ ۴۷ جلوس والا پانزدہ بیگہ زمین انعام درسواد قصبہ پونہ اشتاپور
از آب نالا گرد نواح مزار قدوۃ السالکین زبدۃ العارفین حضرت انگڑ شاہ
درویش و حاصل چہار بازار از سواد قصبہ مذکور در تصرفات عود و
گل و روشنی چراغ و عرس و لنگر فقراء و بجہتہ مدد معاش چمن شاہ
ابن عبداللہ شاہ متولی مزار حضرت موصوف باولاد و احفاد مقرر و
بحال نمودہ شدہ و از جمیع عوارض مرفوع القلم شمارند درین باب
تاکید اکید دانستہ حسب المسطور بعمل آرند فی التاریخ ۲۹ شہر
رمضان المبارک سنہ ۴۹ جلوس والا
نقل مطابق اصل نمودہ شدہ ۲۵ شہر اکتوبر سنہ ۱۸۶۲ رجوع
نمودہ شدہ قاضی سید علی متوطن بلدہ پونہ

[सारांश*]

हुसेनखान (खानह झाद बादशाह आलमगीर) ⇉ सुभे खुजस्ते बुनियाद व सरकार जुन्नरपैकीं पुणे परगण्याचे मुत्सद्दी, देशमूख, देशपांडे, पटवारी मुकद्दम व शेतकरी

ता. १९ शव्वाल सन ३१ जुलूसच्या[1] जैनुल आबिदीन याच्या व ता. २७ रजब सन ४७ जुलूसच्या[2] दियानतखान याच्या परवान्यांप्रो पुणें आस्तापूरपैकीं नाल्यापासूनची व हजरत अनगडशाह दर्वीश याच्या कबरीच्या आजूबाजूची (भोवतालची) पंधरा बिघे जमीन व उपर्युक्त कसब्यांतील चार बाजारांचा आदा या बाबी दर्ग्यांतील ऊद, गूळ, दिवाबत्ती, उरूस, फकीरांस लंगर आणि उपर्युक्त दर्ग्याचा मुतवल्ली चमनशाह बिन अब्दुल्लाहशाह याचा वंशपरंपरेनें निर्वाह यासाठीं नेमून बहाल केल्या आहेत. तरी या बाबतींत ताकीद जाणून लिहिल्याप्रमाणें करावें. तारीख २९ रमजान जुलूस ४९. पुणें येथील काजी सय्यिद अली यानें इ. १८६२ आक्टोबर २५ या तारखेस असलप्रो नकल केली व रुजू घेतली.

३

जु. ४९ मोहरम ७ } [शिक्का क्र. २ प्रमाणें*] { श. १६२७ वैशाख शुद्ध ८ / इ. १७०५ एप्रील २०

متصدیان مهمات حال و استقبال و دیسمکهان و دیسپاندیان
و مقدمان و مزارعان قصبه پونه بدانند که دریذولا ترمبک گوبند کالے گرو
قصبه مذکور استغاثه نمود که هری رام چند بدرے گرو......در حقوق
بتخانهای قصبه مذکور که از قدیم الایام به بزرگان من جاریست
متخیل می شود درین باب تاکید شود پس از اظهار زمینداران قصبه
مذکور بثبوت رسید که قدیم الایام وطن دار کالے گرو است و بدرے
از اولاد دختر کالے گرو است لهذا قلمی می گردد که بوجود اولاد
کالے گرو اولاد بدرے را دخل نیست و بدرے برضامندی کالے گرو
باشد و تمردی نه نماید و بدستور سابق معمول دارند درین باب
تاکید اکید بلیغ دانسته حسب المسطور بعمل آرند تحریر فی التاریخ
هفتم شهر محرم الحرام سنه ۴۹ جلوس والا

[सारांश]

हुसेनखान (खानह झाद बादशाह आलमगीर) → कसबे पुण्याचे मुत्सद्दी, देशमूख, देशपांडे, मुकद्दम, शेतकरी

यावेळीं त्रिंबक गोविंद काळे गुरव कसबे मजकूर यानें तक्रार केली कीं, हरी रामचंद बद्रे गुरव......माझ्या बापदादाकडे फार पूर्वीपासून चालू असलेल्या येथील

[1] जु. ३१ शव्वाल १९=श. १६०९ श्रावण वद्य ६=इ. १६८७ आगस्ट १८

[2] जु. ४७ रजब २७=श. १६२५ कार्तिक वद्य १४=इ. १७०३ नोव्हेंबर २६

देवालयांच्या हक्कांमध्यें दखल करीत आहे. याबाबत ताकीद व्हावी. कसबे मजकूरच्या जमीनदारांच्या जाहीर करण्यावरून पुरावा मिळाला कीं, काळे गुरव पूर्वीपासून वतनदार आहे व बदरे गुरव त्याच्या मुलीच्या वंशजांपैकीं आहे. तेव्हां लिहिलें जातें कीं, काळे गुरवाचा वारस असल्यानें बदरे गुरवाच्या वारसांना दखल करण्याची जरूरी नाहीं. बदरे गुरवांनीं काळे गुरवाच्या मतानें असावें. दांडगाई करूं नये. पूर्वींप्रमाणें अमलांत आणावें. या बाबतींत ताकीद जाणून लिहिल्याप्रो अमलांत आणावें. तारीख ७ मोहरम सन ४९ जलूस (आलमगीरी)

जु. ५ रजब १ } ४ { श. इ.

ظل سبحانی

کوندا بازی کدم [असे वाटोळे शिक्के*]

[वाटोळ्या शिक्क्यांत*] خادم الشرع

قاضی اسمعیل بن قاضی ابراهیم

مضمون متن بیان واقع است

حکمنامه

موازی دو بیگه زمین از آنچه که بموجب سند بمهر تهور و جلادت دستگاه باجی کدم نائب فوجداری و کونداجی ترنبک امین و مقدار ملازم سرکار امارت و امانت و مرشت رنبهاجی نمبالکر فوجدار و جاگیردار پرگنه پونه در قطعه آستاپور تعلقه قصبه مذکور بحضور دیشمکهه و دیسپاندیه و مقدم و مالی مهتریه و غیره رعایا قصبه مذکور بتصدق فرق مبارک بدکان حصن دروجه انعام باسم والهوجی و مانکوجی پسران ستوجی مهتریه گوروه سکنه قصبه مرقوم از.... تنخواه داده شد بمعه فرزندان متصرف منها نموده و پیموده و چک بسته داده شد بمعه فرزندان متصرف شده باشد

موازی دو بیگه باغات بمعه باوڑی متصل.....

درمیان جنوب و شمال
از مغرب

درمیان مشرق و
از شارع عام ۲۰ پاند

حد باغات دوگانه مالی ۴۰ پاند

بدانموجب دو بیگه زمین دروجه مدد معاش مقرر کرده داده شده

بمعه فرزندان ....

تحریر فی التاریخ غره شهر رجب المرجب سنه پنجم جلوس ....

گواه شد

قاضی محمد سید حسام الدین پیرزاده

گواه شد

راماجی گوپال نائب سرکان

[सारांश*]

परगणे पुण्याचे जागीरदार व फौजदार रंभाजी निंबाळकर यांचे चाकर बाजी कदम नायब फौजदार व कोंडाजी त्रिंबक अमीन यांच्या सनदेप्रो कसबे मजकुरापैकीं आस्तापुरांतील दोन बिघे जमीनीचा तुकडा देशमूख, देशपांडे, मोकदम, माळी, मेहतरे व इतर रयत कसबे पुणें यांच्या समक्ष इनामाच्या रूपानें सटवाजीचे मुलगे वाल्होजी व मानकोजी गुरव राहणार कसबे पुणें यांस मोजून व हद्दी बांधून दिला आहे. वंशपरंपरेनें आपल्या ताब्यांत ठेवावे.

दोन बिघे बागायत जमीन विहिरीसह

पूर्व व पश्चिम यांमध्यें बागेच्या हद्दीपासून...४० पांड	दक्षिण व उत्तर यांमध्यें सार्वजनिक गल्लीपासून २० पांड

याप्रमाणें दोन बिघे जमीन निर्वाहाकरितां मुकर्रर करून वंशपरंपरेनें दिली आहे. ...ता. १ रजब जुलूस ५.

---

५ पुणें–बागा–पूल––

११४

वसंतबाग

पेशवाईतल्या बागांचीं नांवें सांपडतात. अशीच एक याद पे. द. ४० ले. ५६ मध्यें आहे. हींत मालकांचीं नांवें आहेत. १७९१ मधील यादींत बागांचीं नांवें आहेत. वसंतबाग ही नक्की कोठें होती याविषयीं माहिती नाहीं. पर्वतीच्या बाजूस असावी.

श्री { श. १७१५ कार्तिक शु. १४
इ. १७९३ नोवेंबर १६

विनंती उपरी खासास्वारी **हिराबागांत** व **वसंतबागांत** भोजनास जाणार सबब ब्राह्मणास व साहित्यास वगैरे पत्रावली १००० येक हजार द्याव्या छ ११ राखर आर्बा तिसैन हे विनंती

[तुळशीबागवाले दप्तर]

११५

राधाबाईची बाग

[पुण्यांतील किंवा जवळच्या बागांची यादी पेशवे दप्तरांत प्रसिद्ध झालेली आहे व इतरत्रहि कांहीं बागांचे उल्लेख आढळतात पण ही बाग नवीनच आहे.]

श्रीमत राजश्री तात्यासाहेब साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक रामजी नाा बाबर मुाा हडपसर दंडवत विनंती विज्ञापना येसी जे श्रीमंत **राधाबाईचे बागांत** खासगीकडील कारकूण प्रवाचे दिवसी येऊन पाहून गेले आणि काल कारभारी व गवड्या येऊन बागची मोजणी करून टीप घेऊन गेले आहेत गाव × × यास आम्हास ठाऊक नाही परभा × करून घेऊन गेले आहेत साहे × × गावचा येक ब्राह्मण मात्र ने × × लकरी नव्हता बाग संताजी झाड × × वजी ढोल्या यास खडान दिल्हे × × तो बाग साहेबास कलावे हे विज्ञाप्ती.

[तुळशीबागवाले दप्तर]

११६

संगम-पुलाचें उद्‌घाटन

श्री { श. १७५२ ज्येष्ठ व. १२
इ. १८३० जून १७

सलाम आ की दरीविला **सगमाजवळ नवा पूल** सरकारातून बाधविला आहे त्याचा रस्ता चालू करावयाचा उच्छाहा पाहाण्याकरिता अलीशान गौरनर साहेब बाहादूर याची स्वारी ताा १८ माहे मजकुरी शुक्रवारी प्रातःकाली साहा वाजता येणार त्यास आपण पाहावयाची खुषी असल्यास गारपिरावर एजट कचेरीस ही चिटी बरोबर घेऊन आले पाहिजे हजरतीचे हुकुमावरून लिाा असे ताा १७ जून सन १८३० ज्यादा काय लिाो ष्यार कीजे हे किताबत

इंग्रजी सही

(प्रारंभीं कोपऱ्यांत) पौ छ २५ जिल्हेज सन इहिदे सलासीन मयातैन व अलफ शक १७५२ विकृती नाम सवछरे

(पाठिमागे) मेहरचा विनायकरावजी घोटवडेकर

११७

शुक्रवार पेठ–तोफखाना

श्रीगजानन { श. १७०४ भाद्र. ११ / इ. १७८२ आक्टो. ३

श्री

[1]पंतप्रधानचर
णि तत्पर घाशीराम
सावळदास कोत
वाल शहर पु
णे निरंतर

कबालेपत्र कोतवाली शहर पुणे विा घासीराम सावलदास सुा सलास समानीन मया व अलफ रा बाबुराव गोविंद देशपांड्ये तां मुठेखोरे हाली वा पेठ शुक्रवार शहर मार सन ११९२ शक १७०४ शुभकृत नाम संवत्छरे दिल्हे कबालेपत्र ऐसे जे शिदू वा गंगाजी जाधव वा पेठ मजकूर जागा पेठ मजकूरचा **तोफखान्याचे** पश्चमेस रस्त्याकडे खुली होती त्याची किा रुो अठावीस त्याणे तुम्हापासून घेऊन जागा आपले स्वसंतोषे तुम्हास विकत देऊन खो पत्र करून दिल्हे हाली त्या जाग्यावर तुम्ही छपरी घर बाधले ते तुम्ही पत्र चौत्रा आणून दाखविले त्याजवरून चौत्राहून कारकून कृष्णाजी बिन लक्ष्मण नाईक गवड्या चाकर निा सरकार यास पाठऊन जाग्याची मोजणी वगैरे चौकसी करून कलमे करार करून दिल्ही बितपसील

लाबी पूर्वपश्चम घराचे पुढील रस्त्याचे हदेस भितीचे आसार सुधा पीछवाड्यास पश्चमेस हदेचे भितीचे आसार सुधा गज सुमार २१॥।

यासी चतुःसीमा शेजार

१ पूर्वस मधी रस्ता दक्षणउतर जातो रुंद पूर्वपश्चम गज २६। सवासवीस पलिकडे **तोफखाना** असे

१ पश्चमेस मैनी कुणबीण इचे घर व लक्ष्मणराव नऱ्हेर याचा घराचा पीछवाडा असें

१ दक्षणेस आका वाणीण हिगमिरे इचे घर

रुंदी दक्षणउतर गज सुार ६॥१ ऐन गर्भी गज

०॥ चांदई दक्षणेकडील ऐन गज ०।३ पैकी निमे आका वाणीण हिगमिरे इची तसू ०॥ बाकी खुद

०।३ चांदई उतरेकडील ऐन गज ०॥० पौ निमे लक्ष्मणराव नऱ्हेर याची गज ०।३ बाकी खुद घराची

७।२॥

घरास शेतखाना आगवाड्यास रस्त्याचे हदेचें भिंतीस दक्षण कोपऱ्यास असे

कलम १

[1] वर्तुळी तीन कड्याची मुद्रा; समाप्ती मुद्रा अशीच त्रिवलयी अर्थात् लहान आहे.

१ उतरेस लक्ष्मणराव नऱ्हेर याचे घर आगवाडा असे — घराचे पाणी मोरी बांधून सिरस्ते प्रों रस्त्याचें मोरीस मेलवावे———कलम

—
४

घराचा आगवाडा पूर्वांमुख असे———
कलम १

एकूण लाबी पावणेंचेवीस गज व रुंदी सवासात्त गज अडीच तसु व कलमे बात येणेप्रो जागा तुम्हाकडे करार करून देऊन किमतीच्या रुपयावर सरकारसिरस्ता दर सदे रुो १० प्रों २॥। पावणे तीन तुम्हापासून घेंऊन हे कबालपत्र तुम्हास भोगवटियास करून दिल्हे असे तरी सदरहू जाग्यांत इमारत बांधून तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरा सुखरूप नादणे जाणिजे छ २५ सवाल मोर्तब सुद मोर्तब सुद

[स. ग. जोशी संग्रह]

६ पुणें-वाडे---

११८

दोन कबालपत्रें

१ पहिलें कबालपत्र केशवराव बल्लाळ *कोतवाल शहर पुणें याच्या शिक्क्याचें आहे. प्रल्हाद विठ्ठल नाईक तांबेकर यानें व्यंकाजी हरि भाव्ये याची बुधवार पेठेंतील ३ खण खपरेल जागा विकत घेतली. किंमत १६०० रुपये ठरली असून त्यावर सरकार सिरस्ता १६० रु. बसला होता. पण जागा रस्त्यावर नाहीं व भाड्याची उपयोगी नाहीं म्हणून ८० रु. माफ केले. श.१६९३ कार्तिक व.४ = २६।११।१७७१

२ दुसरें कबालपत्र +आनंदराव कासी कोतवाल पुणें शहर याच्या शिक्क्याचें आहे. घर घेणार शंकराजी आपाजी बेदरकर व देणार गोपाल नाईक तांबवेकर. तांबवेकराच्या आदितवार पेठेंतील राहात्या घरालगतची दीड मजला ५ खण जागा ५५० रु. स विकली. सरकार सिरस्ता ५५ रु. घेतला. दोन्ही कागद अस्सल असून स. ग. जोशी संग्रहांतील आहे. श. १७०२ श्रावण व.५ = २०।८।१७८० कबालपत्रें वरील ११७ प्रमाणें

---

* आडनांव केतकर + १७८२ त घाशीराम कायम कोतवाल झाला. १७७७ पासून आनंदराव कामावर नव्हताच.)

११९

कोथरूड येथील घर-विक्री

श्री { श. १७०७ कार्तिक वद्य ४
इ. १७८५ नोवें. २०

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सदाशिव नाईक व नारोबा नाईक तांबवेकर स्वामीचे सेवेसी

पो ‡रामराव आनंत बिवलकर मो पुणे साष्टांग नमस्कार विनती विशेष मौजे कोथरूड येथे खासगत जमीन व विहीर व सोपा इमला सुधा तुम्हास विकत दिल्हे त्याची किंमत रुा १३७५ पावणे चवदासे रुा खरिदीखत तुम्हास अलाहिदा दिल्हे आहे ते रुपये येणेप्रो पावले

८७५ मिती भाद्रपद शुा १० दौलताबाज
५०० मिती कार्तीक वद्य ४ पोतेचाली
१३७५

येकूण पावणेचौदासे रुा *सदरहू प्रो पावले मिती कार्तीक वद्य ४ शके १७०७ विस्वावसू नाम सवछरे हे विनंती

१२०

गुरुवार पेठेंतील सुतार राजगुरच्या घराची खरीदी

श्रीशकर { श. १६९२ मार्ग. वद्य ५
इ. १७७० डिसें. ७

खरीदीपत्र चौत्रा पेठ शुक्रवार कसबे पुणे शके १६९२ विकृतीनाम सवछरे मार्गश्वर वद्य ५ ते दिवसी खरिदी कर्दे राजश्री कचो रघुनाथ ठोबरे पेठ गुरुवार यास

---

‡ हे रामराव अनंत कल्याणचे सुभेदार जे रामाजी महादेव, त्यांचे नातू. हे दत्तक आले होते. ह्यांनी श. १८०७ ते १८१८ पर्यंत सुभेदारी केली. ह्या बिवलकरांचा पुणें येथें पुळाजवळ वाडा होता. ह्या रामरावांचे आधीं गोविंदराव कालेंकर हे कल्याणचे सुभेदार होते. (श. १७०५-०८ ?)

* हे दोन शब्द ओळीवर तेव्हांच लिहिले आहेत.

फ्रोख्त कर्दे राणोजी वा यमाजी राजगुर पेठ मार ब राणोजी मार याचे पुत्र राघो व गोविंद वा राणोजी सुतार राजगुर पेठ मार को मार सुा इहिदे सबैन मया व अलफ सन ११८० कारणे खरीदपत्र लेहून दिल्हे यैसी जे पेठ मारी आपले घर इमारत कोलार खण ४ च्यार होते तें तुम्हास दिल्हे त्याची हदमहदूद गजगणती गज सुमारी

रुदी दक्षणउतर गज

८ दक्षणेकडील चादई व उतरेचे चादई खेरीज करून जागा

.॥४ उतरेकडील चादई यैन .॥२ पौ मलोजी भुतकर याची तसू ०४ बाकी खुद असे

८॥४

यास सेजार चतुःसीमा

१ उतरेस मलु भुतकर

१ दक्षणेस भवानी परीट

१ पूर्वेस रस्ता बाजार उतरदक्षणेस (स)रा स र जात आहे

१ पश्चमेस गली रुद पूर्वपश्चम पलीकडे भाद्रपुरी गोसावी याचा मठ

४

पश्चमेस पीछवाड्यास गलींत जावयाचा दरवाजा भितीस आहे कलम १

लांबी पूर्वपश्चम गज

१६॥३ पुढील जोत्यापासून मागिल पीछवाड्याचे भिंत सुधा

० लग

१६॥३

वाड्यास शेतखाना पीछवाड्यास दक्षणेचे कोपऱ्यास पश्चमे आंगे आहे हालालखोराचे पाटीची चौकट बाहेर गलीत आहे कलम १

पश्चमेस गली रुद गज पूर्वपश्चम मोजणी दोन

२। प्रा तोंड उतरेकडील

३॥ प्रा तोंड दक्षणेकडील

५॥।

⌣— १

घराचे पाणी पश्चमेस गली आहे तीत मोरी बाधून पाणी शिरस्तेप्रो मेलवणें कलम १

सदरहू रुदी गज साडे आठ गज चार तसू व लांबी सोळा(?) गज तीन तसू व कलमे पांच याचा करार किमत रुपये १५०० पंधरासे हे आम्ही तुम्हापासून घेऊन आपआपले खुशरजावंदीने जागा इमारत तुम्हास दिल्ही असे पेठ मारची पटी वेठबिगार सिरस्ते प्रो देऊन तुम्ही आपले वौशपरपरेने सुखरूप राहाणें आणि आपले वौसीचा (अपूर्ण)

१२१

तुळशीबागेजवळील गायकवाड घर

श्री {श १६९९ श्रावण शु. १३*
{इ.१७७७ आगष्ट १६

खरीदीखत शके १६९९ हेमलंबी नाम सवतछरे श्रावण शुध १३ त्रयोदसी ते दिवसी राजश्री रामचेंद्र नारायेण कुलकर्णी मौजे पाडली समत कोरेगाव प्रात वांई सुभेदार प्रात पुणे यासी हैबतराव बीन येसाजी पा गायेकवाड मौजे यमोह्पुरे(!) नजीक वसंतगड हाली वस्ती पुणे नजीक तुन्लसीबाग सिलेदार चाकर दिा हुजरात निा राजश्री विसाजी कृष्ण बिनीवाले सुर सन ११८७ कारणे खरीदखत लेहून दिल्हे ऐसे जे अमचे राहाते घर तुलसीबागानजीक अहे ते अम्ही अपले स्वसंतोशे हे जागा तुम्हापासून रुपये २०० दोनसे घेऊन मातुश्री दारकाई व मथुरा येसी अवघी मिलोन तुम्हास जागा खुशरजावंदीने ईमल्यासुधा दिल्ही असे यासिं हरकोन्ही मुजाहिम होईल त्याचा जाब अपण करू हा कागद खरीदखताचा लेहून दिल्हा सही छ १२ रजब

निा कट्यार

(कट्यार चिन्ह)

गोही

[1]सेकोजी नाा बीन मल्लहारजी नाईक प्राा पुन नाईकवाडी

[2]रघोजी बीन नावजी नाईक सोरटे नाईक मंडळ पाा पुणे (?)

[3]सेखोजी नीन फिरगोजी पाा सितोळे मौजे कुरकुब ताा पाटस १

[4]भगवतराव बीन रावजी पाा सितोळे मौजे कुरकुब

[5]भगवत विठल जोसी कुलकर्णी पाटसकर काा पाटस वगैरे गाव १

(आडवा शेरा)

बीाा केसो माहादेव कुलकर्णी जोसी पाटसकर मौजे कुरकुब (व)गैरेगाव

[तुळशीबाग दप्तर]

---

* मोडक जंत्रींत त्रयोदशीचा क्षय दिला असून द्वादशी दोन दिवस दर्शविली आहे. पैकीं दुसरी द्वादशी धरून मिती व तारीख दिली आहे.

१-५ हीं अक्षरें वेगवेगळीं.

१२२

सदाशिव पेठेंतील राजेबहादूरांचा वाडा

श्री

{ श. १७७२ भाद्र. शु. १
{ इ. १८५० सप्टं. ७

यादी बालकृष्ण रामचंद्र भनगे वा। पेठ सेनवार यासी माधवराव त्रिंबक राजेबाहादर वस्ती पेठ सदासिव आमचा खा। वाडा पेठ मा।री आहे त्यातील आतील चौकांपैा उतरेचा सोपा दुमजला दरोबस्त कायेम ठेऊन त्या सोपयास हत न लावता तीन सोप्यांपैा तलमजला कायेम ठेऊन वरील टोप आमचा काढून देऊन बाकी मधील दुसरा मजला याचे खण १७ त्याचा ता।

१७ खण सुमारी चापेखणासुधा-तपशील लाकडाचा-१६ तुलया; ३२ खांब
१ लगा व पटई भुजोटे व लोहलोखंड खण सतराचे सामाण दरोबस्त—
१० खिडक्या महिरापदार दोन २ व कठडा १ व साध्या सुमारी ८ यो। १० फल्यासुधा
३ गलथे तीन सोप्याचे व खाली व वरची पटी नकाशाची घेऊन तुलई वरील तोड कडी कायम ठेऊन वरील तोडकडी मजल्यांची तुम्ही घ्यावी
१ कठडा खण ५ याचा व उभे खांब ४ व गोल आडवा व सिपाई दोन
१२ दारे कवाडाची १० विटाले २ यो। १२; ६ भडाऱ्या विटालीसुधा
११ तुलईची तोंडे ७ खिडक्यावरील आधाऱ्या

येणेप्रो सदरहूमधील मजल्याचे लाकूड जे निघेल ते तुम्ही घ्यावे लोहलोखंड सुधा याबदलचा आलाहिदा करारनामा लिहून आम्ही तुम्हास आज मितीस दिल्हा आहे ही याद लिहून दिल्ही सही मि।। भाद्रपद शु।। १ सके १७७२ दस्तुर वामण नीलकंठ कारकून नि।। राजेबाहादर

साक्ष

१ †गोविंद हरी दशपुत्रे दस्तुरखुद
१ †विठल नारायण लेले दस्तुरखुद
पंठ काले वावर

सही माहाराव त्रिंबक राजे बाहादर
वयाने लहान पालन करणार
मातोश्री आणपूरणाबाई भ्रतार
त्रिंबकरावसाहेब राजे बहादूर
दस्तुर वामण नीलकंठ कारकून
नि।। राजेबहादर

† अक्षरें भिन्न.

म्युनिसिपालिटी स्थापन होण्या पूर्वीचा
पुण्याचा कारभार

प्राचीन नगर संस्था--स्थानिक स्वराज्य संस्थेचा उदय हिंदुस्थानांत फार प्राचीन कालापासूनचा आहे. संघ, श्रेणी, गण, समूह इत्यादि संज्ञा अशा संस्थेचें अस्तित्व सिद्ध करतात. दक्षिण हिंदुस्थानांत व्यापारी वर्गाचे मोठमोठे संघ असून ते राज्यशासनांत महत्वाचे गणले जात. राज्यकारभारांत लोकमताचें प्राबल्य असलें तरी राज्यक्रांतींत लोकसंस्था अलिप्त राहात, किंबहुना राजा कोणीहि येवो, लोकांच्या संस्था, विशेषतः ग्रामसंस्था कांहींहि फरक न होतां पूर्ववत् चालू राहात. यामुळेंच राष्ट्राची संस्कृति किंवा जुनी परंपरा अव्याहत टिकून राही. जुन्या काळीं आपल्याकडे राजा आणि समाज यांचे पाश्चात्य राष्ट्रांतल्याप्रमाणें अभिन्नत्व नसे. तिकडे राजा किंवा सरकार म्हणजे राज्य आणि समाज या दोहोंवर अधिकार गाजविणारी वरिष्ठ सत्ता होय. तसें प्राच्य राष्ट्रांत नसे. राजाला समाजव्यवस्थेंत प्रमुख स्थान असे. पण त्याच्याच तंत्रानें सामाजिक-धार्मिक बाबतींत समाज चालेल असें मुळींच नसे. लोकांच्या दैनंदिन व्यवहारांत सरकारचा संबंध येत नसून गांवगंगेचा येई.

पंचायती—लोकलबोर्डें व म्युनिसिपालिट्या या पाश्चात्य राजशासनानें निर्माण झाल्या आहेत; तेव्हां आपल्या ग्रामपंचायतीशीं त्यांची मूलतः तुलना करतां येत नाहीं. अशा पंचायती-पद्धतीमुळेंच नवीन सरकारला आपलें राज्य स्थिर करतां येई. हाच अनुभव पेशवाई घेतल्यानंतर एल्फिन्स्टनला आला. परकीय राज्यसत्तेला येथें समाज-शासनसंस्था आयती तयार मिळे व तिला न दुखवितां राज्यकारभार सुरळीत हांकता येई. याच कारणानें हिंदुस्थानांत अनेक परकीय राज्यें, साम्राज्यें होऊन गेलीं तरी राज्यशासनतंत्र कोणीं फारसें बदललेलें दिसून येत नाहीं.

नगरसंस्थांचीं कामें— आज म्युनिसिपालिट्या जीं कामें करतात तीं स्मृतिकालीं ' समूह ' करीत, असें दिसतें. या समूहसंस्थांची व्यवस्थित घटना व नियम असत. हे नियम मोडणारांना फार कडक शिक्षा ठेविलेली असे. कौटिलीय अर्थशास्त्रांत देखील अशा संस्थांची व्यवस्था वर्णिली आहे. नगरपालिकेप्रमाणें असणाऱ्या या संस्थेच्या कक्षेंत व्यक्तीला न झेपणारीं मोठमोठीं लोकोपयोगी कार्यें पडत. उदाहरणार्थ, सार्वजनिक सभागृहांची व्यवस्था; देवळें, तळीं; धर्मशाळा; पाणथळें इ.चें संरक्षण; अशा गोष्टींच्या नव्या सोयी करणें; गरीब प्रजेचा परामर्ष घेणें, म्हणजे लोकांचें ऐहिक व पारमार्थिक कल्याण करण्याकडे या संस्थेचें लक्ष असे. दक्षिण हिंदुस्थानांत तर मोठालीं पाटबंधाऱ्यांचीं कामें या नगरसंस्थांकडून झालीं आहेत. कात्रजच्या तलावाप्रमाणें किती

तरी तलाव प्राचीनतर सांपडतील. हे तलाव गाळ सांचून ओहरूं नयेत म्हणून त्यांच्या निगेसाठीं उत्पन्नें करून ठेविलेलीं आहेत. अशा लोकोपयोगी कामांवर देखरेख करण्यासाठीं आतांप्रमाणें संस्थेच्या उपसमित्या असत. त्यांतील सभासदांची निवडणूक होत असे. त्यांची लायकी–नालायकी ठरविण्यासंबंधीं नियम असत. सभा चालविणें व त्यांतील ठरावांची अंमलबजावणी करणें या बाबीहि जुने लेख–ग्रंथ यांतून पाहावयास मिळतील. या प्राचीन स्थानिक स्वराज्यासंबंधीं विस्तृत व साधार माहिती डॉ. राधाकुमुद मुकर्जी यांनीं आपल्या 'लोकल गव्हर्मेंट इन् एन्शंट इंडिया' या ग्रंथांत दिलेली आहे. सर हेनरी मेन या विख्यात कायदेपंडिताचें मत असेंच होतें कीं, प्राच्य देशांतील स्थानिकस्वराज्यसंस्थांना पाश्चात्य खंडांत तोड नाहीं. अशा संस्था हें प्राचीचें वैशिष्ट्यच होय. [व्हिलेज कम्युनिटीज् इन् दि ईस्ट अँड दि वेस्ट]. तेव्हां आजच्या ब्रिटिश अमदानींत निघालेल्या नगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्था पोषक भूमीवर रुजविल्या आहेत यांत शंका नाहीं.

जुनें पुणें—पुणें शहर कसें बसलें व वाढत गेलें यासंबंधीचा इतिहास इतरत्र दिलाच आहे. मुसलमानी अमदानींत, १३ व्या शतकांत हें लहान शहर होतें. पुढें शिवाजी महाराजांच्या कारकीर्दींत दादाजी कोंडदेव यांनीं या शहराची पुनर्रचना केली. तिचे अवशेष अद्यापि कोठकोठें दिसतात. जमाबंदीची पद्धत यांनीं जी एकदां घालून दिली ती पुन्हां मराठी राज्यांत फारशी बदलावी लागली नाहीं. या दादाजी मलठणकरांप्रमाणेंच रंगो बाबाजी धडफळे यांची पुण्यानें आठवण ठेविली पाहिजे. हे मलिकंबरच्या वेळीं पुण्याचे ठाणेदार (?) होते (इ. स. १६२९). यांच्या अमदानींत मोठा दुष्काळ पडला व पुणें ओस पडलें. पण धडफळ्यांनीं पेठा स्थापून पुण्याची वस्ती वाढविली असें सांगतात [धडफळे यादी शक १८३५ इतिवृत्त पृ. ३७५–३९९].

शिवाजी महाराजांच्या वेळीं पुणें प्रांताचा सुभेदार राघो बल्लाळ अत्रे नांवाचा मोठा कर्तबगार पुरुष होता. त्याच्यानंतर पुढें पेशवा झालेला बाळाजी विश्वनाथ भट आला (१६९९). हा पेशवा झाल्यावर तर पुण्याच्या वाढीची तो जास्त काळजी घेत असे, असें पुढील त्याच्या ६ नोव्हेंबर १७१८ च्या पत्रावरून दिसतें.

"दाा माा अनाम हसनखान कोतवाल ठाणें पुणें यास बाळाजी विश्वनाथ प्रधान सुाा तिसा अशर मया अलफ (पु)ण्याच्या मार्गे बकाल खेपा करितात त्यांजपासून रास्ती जकाती देखील फौजदारी पूर्वील तहप्रमाणें घ्यावयाचा तह करून बकालास अभयेपत्र दिल्हे आहे त्यास मार्गांची अम–दरफती करून सालाबाद प्रमाणे जकात देखील फौजदारीतील चेहल दुपंचोतरा जकात मोगलाई तर्फेनें घ्यावयाचा तह होता यैसीयास हाली चेहलदूचा हासील मना केला असे तुम्ही बकालास तगादा न करणे छ २३ दिल्हेज पाा हुजूर."

—भा. इ. सं. त्रै. १९·३ पृ. ११२

पूर्वी पुण्यावर मराठे आणि मोगल या दोघांची सत्ता होती. पण १७२० मध्यें शाहू महाराजांच्या आठ स्वराज्य प्रांतांत पुण्याचा समावेश झाला; तेव्हां व्यापारी–उदिमांवर जो पूर्वी एक कर होता तो या पत्रानें रद्द केला.

इ. स. १७२५ त शाहू महाराजांनीं पहिल्या बाजीरावाला पुण्याची जहागीर दिल्यापासून तो पुण्यास राहून कारभार पाहूं लागला. तेव्हां साहाजिकच पुणें राजधानीचें शहर बनूं लागलें; व वाढत चाललें. नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दींत मराठ्यांचें साम्राज्य जसजसें अफाट होत गेलें तसतसें पुणेंहि विस्तार पावूं लागलें. पुण्याला राजवैभव व ऐश्वर्य जर कोणीं मिळवून दिलें असेल तर तें या पेशव्यानें. तेव्हां पुण्यानें नानासाहेब पेशव्याचे उतराइ झालें पाहिजे व त्यासाठीं त्याच्या नांवाला साजेल असें भव्य स्मारक या शहरांत केलें पाहिजे.

उत्तर पेशवाईत खाजगीवाले आणि तुळशीबागवाले या घराण्यांतील पुरुषांनीं पेठा बसविणें, व्यापार–उदीम वाढविणें, बंदोबस्त ठेवणें वगैरे कामें पार पाडलीं. पहिल्या बाजीरावाच्या वेळीं ज्याप्रमाणें बापूजी श्रीपत चित्राव यानें सुभेदार या अधिकारानें पुण्याची सर्व व्यवस्था पाहिली; त्याप्रमाणें पुढें नारो आप्पाजी तुळशीबागवाले यानें पाहिली. पुणें प्रांताचा सर्व कारभार या तुळशीबागवाल्यांकडे असे. तेव्हां यांच्याकडील हिशेबांत पेशवाईतील राज्यव्यवस्थेच्या सर्व बाबी सांपडतात.

गांवचा कारभार—मराठेशाहींत जुन्या पद्धतीप्रमाणेंच राज्यशासनाचा गांव हा सर्वांत खालचा पण स्वयंपूर्ण घटक असे. बारा अलुतेदार–बलुतेदार यांवर गांवची सर्व मदार असे. गांवांत दहाजण मुख्य असत म्हणून जुन्या कागदपत्रांतून ‘ समस्त दाहीजण ’ मौजे (अमुक) गांव अशा पद्धतीनें गांवाचा उल्लेख करण्याची वहिवाट असे. हे दहाजण गांवच्या पंचाइती तोडीत. गांवाचें स्वामित्व पाटलाकडे असे. या पाटलाचा अधिकार फार मोठा असे. तेव्हां पाटिलकी मिळविण्याची त्या काळीं फार धडपड दिसून येते. शिंदे होळकरांसारखे पहिल्या दर्ज्याचे सरदारहि आपलें जुनें पाटिलकीचें वतन सांभाळण्याच्या कामीं अत्यंत दक्ष असत. या पाटलाचा मदतनीस चौगुला व कारकून कुळकरणी. महाराकडे गांवच्या रखवालीचें व जबाबदारीचें काम असे; त्याच्या जोडीला जागल्या रामोशी असे. गांवावर जसे पाटील–कुळकर्णी तसे देश, प्रांत, महाल किंवा परगणा यावर देशमुख–देशपांडे असत. पुणें प्रांतावर देशमुख शितोळे व देशपांडे होनप असत. यांचीं वतनें फार प्राचीन आहेत.

ज्या गांवास पेठ व बाजार आहे त्यास कसबा म्हणत. कसब्यांत चौधरी, महाजन, शेटे, आवटी, डांगे; पथकी वगैरे वतनदार असत. वदनदारांत सरकार निसबत म्हणजे सरकारच्या चाकरीस असणारे व रयत निसबत म्हणजे लोकांच्या चाकरीस असणारे, असे दोन वर्ग असत.

कमाविसदार—साधारणतः तालुक्यावर मामलतदार किंवा कमाविसदार असे. तथापि मोठें गांव, त्याचा एकादा मोठा भाग किंवा पेठ यावर देखील कमाविसदार नेमीत. या कमाविसदाराकडे मुलकी व फौजदारी असे दोन्ही अधिकार असत. करवसुली करून शिवाय यानें गांवाचें संरक्षण करावयाचें असे. त्याला शिबंदी फौज या कामासाठीं दिलेली असे. या कमाविसी कामाचा मक्ताहि देत. थोरल्या माधवराव पेशव्याच्या कारकीर्दीत पुण्याची कमाविसी कचो रघुनाथ याला दिल्याबद्दलची सनद आहे.

यांत तीन सालाचे मिळून बेचाळीस हजार तीनशें पावणे पांच रुपये दीड आणा इतक्या मक्त्याचा करार केला आहे. मुदतीप्रमाणें दरसाल सरकारांत भरणा करावा. अकराशें रुपयांची नेहमीची वरातांची नेमणूक आहे त्याप्रमाणें सादर होणाऱ्या वरातांचा ऐवज द्यावयाचा; न्याहाल पेठेचा कौल पुरला आहे त्याचा कमाविसी आकार दरसाल सरकारी हिसेबी मक्त्याखेरीज जमा करावयाचा; जास्त अमल आणि जलेल रयतेवर करूं नये; मिरासपट्टी दर तिसरे सालीं वसूल करून सरकारच्या हिसेबाला जमा करावी. कमाविसदाराला दिवस्या आफ्तागिराची नेमणूक शंभर रुपयांची मंजूर आहे; निरखाची चौकसी दररोज करावी व उदमी लबाडी करतील ती करून देऊं नये; इत्यादि तेरा कलमे या सनदेंत आहेत. [वाड–थोरले माधवराव रोजनिशी भाग २ पृ. ३६९–३७८]

कोतवाली–प्रत्येक पेठेचे कमाविसदार निराळे असत. पुणें, नगर, पंढरपूर, नासिक यांसारख्या मोठाल्या शहरावर एक कोतवाल नेमलेला असे. त्याच्याकडे आजच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटप्रमाणें अधिकार असत. शहराची स्वच्छता व स्वास्थ्य यासंबंधी सर्व जबाबदारी कोतवालावर असे. घरांवर पट्ट्या बसवून झाडूवाले, भंगी वगैरे नोकरांचा पगार भागविला जाई. थो. माधवराव रोजनिशींतील सनदेंत (भा. २ पृ. २३३) कोतवालाचें काम व त्याचे हक्क, तसेच त्याचा इतमाम यासंबंधी माहिती सांपडेल. तीवरून शहराचा बंदोबस्त कसा ठेवला जाई हें चांगलें कळून येणार आहे. हा कोतवाली अंमल पुण्यास फार व्यवस्थित व कार्यक्षम असे, असें एल्फिन्स्टननेंहि प्रांजलपणें कबूल केलें आहे. घाशीराम हा पुण्याचा कोतवाल व कमाविसदारहि होता. वरील सनदेंत कोतवाल आणि कमाविसदार यांची अधिकारविभागणीहि दिसेल. सनदेंतील मजकूर सारांशानें खालीं दिला आहे.

१ शहरच्या पेठा व पुरे व कसबे येथील किरकोळ कजियां पेठेचा पेठेचे कमावीसदार यांनीं मनास आणावा. मातबर कजिया असल्यास कोतवालीकडे मनास आणून हरकी गुन्हेगारी घेत जाणे. २ जिनसाची अमदानी काय याचा अजमास पाहून कमजाजती तुमचे इतल्याने निरख करीत जावा. बाजाराचे निरखाची यादी

दररोज दफ्तरी आणून देत जावी. ३ शहरांतील छत्तीस खुम व ताफे जात यांजवर सरकारांतून बिगारीची आज्ञा करणें ते तुम्हास केली जाईल तुम्ही बिगारीचा बंदोबस्त करणे. ४ पाट–दाम दर रुपये १। सव्वा रुपया १ शेला; डांकास (?) दर टके १॥ दीड व नारळ व विडा येणेप्रमाणे अद्गज नवा करून देणे तो तुम्ही देऊन त्याचा शिरस्ता पेशजी असेल त्याप्रमाणे पेका घ्यावा. पेंढारी बाजेकरी यांजपासून घर उदीम पाहून रुपया अर्ध रुपया पेशजीचे शिरस्तेप्रमाणें घेत जाणें नव्या मापावर शिक्के करून देणे त्याचा शिरस्ता पेशजीप्रमाणे घेत जाणे व जुन्या मापाची चौकशी करणे. तेलीयाचे घाण्यास दररोज रुक्के ८३ प्रमाणें घ्यावे त्यापैकी नेहमी खर्च: ८३ श्रीनागेश्वर, ८६ पीर दर्गा २, ८३ चावडी कसब्यांतील. सदरहू पावटका वजा होऊन बाकी जमा होईल त्यापैकी वरकड चौथरे व दिवट्या वगैरेस खर्च करणे. दसऱ्यास गोंधळ वगैरे व बकरी याची रेघ व्हावी लागते त्याजवर सरकारचा हक्क रुक्के ८६ आहे. त्याचा शिरस्ता पाहून घ्यावे. भंगेरे (?) याजकडील दरमहा कोतवालीकडे शिरस्तेप्रमाणे घेत जाणे. खानेसुमारी एकंदर तुम्ही करावी आणि झाडा राखावा. जाणार येणार कुल कोतवालाकडे दाखल व्हावे, कमाविसदार पेठेचे आहेत त्यांनी आपलाले पेठांतील झाडा तुम्हांकडे द्यावा. एकूण कलमें दहापैकीं पाट–दामाचा सव्वा रुपया पेशजीप्रमाणें घ्यावा. शेला अलीकडे घ्यावयाचा शिरस्ता पडला आहे त्यास कूळ पाहून घेत जावा. रस्त्याचा गल्लीचा व घराचा कजिया लागेल त्याचा इनसाफ तुम्ही करून कजिया विल्हेस लावावा. सोदे जुवा खेळतात त्यांनी कोतवालाचे चिटीशिवाय खेळो नये. इतर लोकांनीं (सोद्याखेरीज) जुवा खेळूं नये. सोदे जुवा खेळतील त्यांवर सरकारचा अमल घेणे तो पेशजी कोतवालाचे शिरस्तेप्रमाणें घ्यावा. कोतवालीचे कारभारास चावडींत जागा बुधवार पेठेंत नेमून दिली असे. कोतवालीचा हिशेब महिन्याचे महिन्यास सरकारांत देत जाणें. दौंडी फिरविणें ते कोतवालांनीं फिरवावी. शहरांत जाग्याची खरेदी फ्रोक्त होईल ते तुमचे इतल्याने व्हावी. कोतवालीकडील पत्र करून देऊन सरकाराचा दस्तूर आहे तो घेत जाणे. तीन हजार दोनशें चौसष्ट रुपये सालीना करार केले असेत. चौकशीनें खर्च करणें. शहरांतील शेव पेटकरी सुदामत घेत आहेत त्याप्रमाणें घेतील. भोजन खर्च व तैवज खर्च व दफ्तर खर्च व रोशनाई जरूराती कार्याकारण लागेल ती खर्च करून सालाचे सालांत समजावून मखलासी करून घेत जावी. याप्रमाणें एकूण सोळा कलमें करार करून दिल्ही आहेत. (थोरले माधवराव पेशवे रोजनीशी, भाग २, पृ. २३३–२३६).

(नारायणराव बल्लाल यांच्या रोजकीर्दी पैकीं)

शहर पुणें येथील पेठा पुरेसुद्धां कोतवालीचा अंमल सरकारांतून राजश्री जनार्दन हरि यांजकडे आहे. त्यास तुम्हांकडे पेठा आहेत त्यास कोतवालीचे अमलाची कलमबंदी सनदेंत करून दिली आहे. त्याप्रमाणें पेठांचा अमल करतील व गल्ल्याचे

दर गोणीस पावशेरप्रमाणें घेतील व पेठ मजकुरी घरे खरेदी फ्रोक्त होतील त्यांचे कबाले कोतवाल करितील आणि सरकारी दस्तुरी घेतील तरी तुम्ही हरएकविशीं दिकत न करणें म्हणोन चिटणीसी पत्रें १ शिवराम रघुनाथ यांजकडे पेठा (गणेश पेठ, पेठ गंज, पेठ मुसाफरजंग, पेठ शुक्रवार, नागेश पेठ एकूण पांच पेठ). २ बाबुराव हरि यांस रविवार पेठेविशीं, ३ धनशेट करंजे यांस मंगळवार पेठेविशीं, ४ बापुजी आनंदराव कमावीसदार कसबे पुणें यांस सोमवार पेठेविशीं, ५ नारो आप्पाजी यांस वेताळ पेठेविशीं, ६ महादजी विश्वनाथ यांस नवे पेठेविशीं, ७ लक्ष्मण विश्वनाथ यांस शनवार पेठेविशीं, ८ बाळाजी नाईक भिडे यांस बुधवार पेठेविशीं अशीं आठ पत्रें दिलीं असेत. (थोरले माधवराव पेशवे रोजनिशी, भाग २, पृ. २३६)

पेठेचे कौल— गांवाची किंवा पेठेची वसाहत करण्यासाठीं कौल दिले जात. कौल देतांना किती काळजी घेतली जाई हें पुढें दिलेल्या कांहीं कौलनाम्यावरून दिसून येईल. एखादें गांव किंवा पेठ उजाड पडल्यावर पुन्हा त्याचा कौल देतांना मागील अडचणी सरकार लक्षांत घेत असे.

बुधवार पेठ औरंगजेब बादशहानें इ. स. १६९० त वसविली व त्याला मोहि- याबाद असें नांव ठेविलें असें धडफळे यादीवरून दिसतें. पण पुढें पुणें उध्वस्त झाल्यावर पेठाहि ओस पडल्या तेव्हां बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत पुनः पेठांचे कौल दिले.

" थल अस्तापूर पेठ होती ते खराब पडली ते जमीन माली याचे दुमाले करून पेठवरी तनखा बैसला होता तो माली याजकडे लाविला " [पेशवे दप्तर, जमाव भाग रुमाल नं. १७८– Poona, A Socio-economic survey, page 15] यावरून इ. स. १७४६ त मंगळवारपेठ पेठ अशी राहिलीच नव्हती. त्याचप्रमाणें याच वेळीं नारायण पेठ वसवावयाची आज्ञा नानासाहेब पेशव्यानें बर्वे मोकासी यास दिली व पेठेचे सर्व अधिकार करार करून दिले. [कित्ता पृ. १४].

" रामाजी नाईक व बाळाजी नाईक भिडे पोतदार यांचे नांवें सनद कीं, पेठ बुधवार कसबे पुणें येथील कौल पुरला, सालमजकुरीं महसूल व हासील घ्यावयासी तुम्हांस आज्ञा केली. त्यावरून तुम्ही विनंति केली कीं, जीवनमाफक मक्ता करार करून घ्यावा, त्याप्रमाणें उगवणी करून देऊं म्हणोन. त्यावरून मनास आणून मोह- तर्फा व ठाण व घरपट्टी व जकाती थलमोड थलभरीत व फुरोई देखील कलाल व गोली व बेलदार व लोणारी व चुनेवाले व छपरबंद लाकडवाले व लोहार वगैरे खुम तुम्हांला मक्ता करार केले. इस्तकबील अवल साल तागाईत आखेर साल रुपये २५०० (तपशील दिला आहे).

येणेप्रमाणें करार केले असे. सरकारांत ऐवज पावता करून कबज घेणें. भिक्षुक ब्राह्मण व सरकारचा चाकर फक्त असेल उदीम बेवसाव करीत नसेल, त्यास

पाळावें. फुरोई कुळाकडे पंचवीस रुपये पावेतों आकार होईल तो तुम्ही घेणें. जास्ती आकार होईल तो सरकारांत घेतला जाईल. याप्रमाणे करार असे. कुळांचा सरकारांत वसूल आला असेल तो अखेर हमे यांत मजुरा दिला जाईल म्हणोन सनद." [बालाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी भाग २ पृ. २११].

सदाशिव पेठेचा कौल थोरल्या माधवरावाच्या अमदानींत आपाजी मुंढे यास दिलाः—

" सदाशिव पेठ शहर पुणें येथें नवी वसाहत बाजार भरावयाचा सन तिसा सितैनापासून सन खमस सबैन पावेतों सात साला कौल देऊन राजश्री आपाजी मुंढे यांस आज्ञा केली असे. तरी तुम्ही पेठ मजकुरीं येऊन वसाहत करून उदीम वेवसाय करीत जाणें. कौल भरेतोंपर्यंत सरकारचा आजार लागणार नाहीं. कौल भरल्यावरी शिरस्तेप्रमाणें हांशील घेतला जाईल, तरी बेवसवसा येऊन उदीम वेवसाय करणें अभय असे. म्हणोन उदमी वेपारी यांचे नांवें कौल. "—[वाड–थो. मा. रोज. २. पृ. ३७९].

नवा वसाहतीचा कौल देतांना कोणत्या अटी घालीत याची आणखी कल्पना पुढील एका न वसलेल्या ' नवापुरा ' पेठेबद्दलच्या कागदावरून येईल.

जीवनराम घाशीराम यास भवानी पेठेच्या पूर्वेस नवापुरा पेठ वसविण्याची सनद दिली (१७८६) तेव्हां पुढील पांच कलमें घातलीं:—

" नवीं कुळें पेठ मजकुरीं येऊन राहतील त्यांस सालमजकुरापासून सात साला मोहोतर्फा व वेठ बेगार माफ केली असे. वस्ती करणें. कौल भरल्यावर मोहोतर्फा व वेठ बेगार वगैरे घेतली जाईल. कलम १

कोतवालीकडील व बट छपाईचा उपद्रव कुळांस कौल भरेतोंपर्यंत लागणार नाहीं. कलम १

सरकारची खरीदी व मातबर लोकांची खरेदी कौल भरेतोंपर्यंत पेठ मजकुरीं होऊं नये येणेंप्रमाणें. कलम १

पेठ मजकुरीं कुळें येऊन वसाहत करितील, त्यांस मागील देणेंदारांचा उपद्रव लागला तर देणें घेणें मनास आणून जीवन पाहून पैका घ्यावा. कलम १

शिबंदी, प्यादे व कारकून पेठ संबंधें व चावडी बांधावयास वगैरे लागवड लागेल त्याचा चौकशीनें खर्च करून हिशेब सरकारांत समजावणें. कौल भरल्यावर पेठेचे ऐवजीं देविला जाईल. कलम १ "—[वाड स. मा. रोज. ३. पृ. ३५४].

शेटेपण— आतां पेठांचे कौल दिल्यानंतर त्यांतून व्यापारी उदीम येऊन राहावेत व पेठा भरभराटाव्यात म्हणून कांहीं व्यापारांना शेटेपणाचा मक्ता देण्यांत येत असे. शेट्यांना विशिष्ट हक्क दिले जात. पुढील शेटेपणाचें वतनपत्र पाहाः—

'शेटेपणाचे हक्क बीतपसील:-वाणीयाचे दर दुकानीं बाजाराचे दिवशीं आठरोजीं सुपारी १ एक; तेलीयाचे दर दुकानास तेल आठरोजीं वजन कच्चे ०००९ नव टाक; पेठेंत किराण्याची अमदरफ्त होईल त्यास दर गोणीस किराणा वजन पक्के पावशेर ००।; कोष्टी व साळी पेठेंत जे राहातील व माग चालवितील त्यांनीं सारे मिळून सालीना पासोडी १ द्यावी; पेठेंत सण दसरा व दिवाळी व शिमगा व वर्ष प्रतिपदा दर सणीं दर दुकानीं गहूं, तांदूळ वजन पक्के ००। पावशेर. तुमचे अधोली बाजारांत जो नेईल आणि माप होईल तेव्हा त्याजपासून दर गोणीस मुठभर दाणे घ्यावें; तांबोळ्याचे दर दुकानीं दररोज पाने सुमार ५ पांच; बाजारांत अमदरफ्ती होईल त्यास दर गोणीस गल्ला कैली ०००= अर्धाशेरप्रमाणें; पेठेंत माल येईल त्यास दर दुकानास मुठभर शेव घ्यावी; पेठ मजकुरी चांभार वस्तीस राहतील त्यास सारे चांभार मिळोन पायपोस जोड २ दोन. पेठेंत लग्नें होतील त्यास दर लग्नीं खोबऱ्याची वाटी एक घ्यावी; खाटीक व खारखंडे वगैरे बाजारांत येतील त्यांजपासून शेवा दाखल मास व बोंबील वगैरे घ्यावें. तुमचीं उभयतां शेट्यांचीं घरें पाळावीं कलम १

याप्रमाणें एकूण तेरा कलमे करार आहे [बाळाजी बाजीराव भा. २ पृ. २१२]

शुक्रवार पेठेचें शेटेपण इ. १७५१ त गंगाराम व दयाराम खेत्री यांस दिल्याचा उल्लेख सांपडतो. [वाड, बाळाजी बाजीराव २. पृ. २१४] कसब्यांत 'शेट्याचा बाजार' फार जुना व प्रसिद्ध होता [पे. द. २२ ले. २९५]. पेठेचा झेंडा शेट्याकडे असून त्याबद्दल तो पट्टी घेई.

व्यापाऱ्यांना सवलती— पुण्यांतील व्यापार वाढावा यासाठीं बाहेर गांवच्या व्यापारी-उदिमांना सवलती देऊन पुण्यास आणण्यांत येई. बाहेरून व्यापाऱ्यांना व वसाहती करून राहाणाऱ्यांना जे आणतील त्यांना जमिनी वतनें वगैरे दिलीं जात. त्यांनीं घरें बांधून राहावें, बाजार उघडावेत, नवीन धंदे सुरू करावेत याविषयीं पेशवे सरकार आपल्या कोतवाल-कमाविसदारांकरवीं अशा लोकांना सवलती देववी. बऱ्हाणपूर, पैठण व इतर बाहेरच्या पेठा इकडून मुद्दाम रेशीम व जर तयार करणारे लोक पुण्यास आणविले, त्यांना घरें बांधण्यास जमिनी मोफत दिल्या व अशा रीतीनें पुण्यास हा नवीन धंदा जारी केला, दुकानें घालण्यास सरकार कांहीं व्यापाऱ्यांना कर्जाऊ रक्कम देई व त्यांवर पट्ट्या माफ करी.

शेटी सुपेकर यांना पुण्यांत दलालीचा धंदा करण्यास पुढील आज्ञापत्र दिलें आहे :

"तुम्ही अडतींचे उदीमाचा धंदा पूर्ववत् चालीप्रमाणें करून, शहर मजकुराची अमदानी करीत जाणें; आणि सदरहू दहा हजारांचा भरणा सरकारांत करून जाब घेणें; याउपरी तुम्हांवर कोणी आदावत करून आणखी जाजती नजर देऊं लागल्यास

ते सरकारांत न घेतां तुमचे तुम्हांकडे चालेल. तुम्ही सुखरूप पूर्ववत् प्रमाणें; धंदा करून शहरांत राहून पोट भरीत जाणें; अभय असे." [वाड, स. माधवराव २. पृ. २८३]

...तगाची नवीन कानू होऊन उदिमांना त्रास होऊं लागला; तेव्हां ती बंद केली व वाण्याचा तग वाण्याकडे सांगितला, अशी माहिती व वरील रोजनिशींतच मिळते. [२. पृ. २८१].

कारागीर— कारागीर लोकांना कांहीं पट्ट्या माफ असत. उदाहरणार्थ आदितवार व बुधवार पेठेंतील बेलदार, यांच्यावरची पंचोत्री पट्टी (शेंकडा ५) मक्तेदार घेत असे ती सरकारनें माफ केली. [वाड, बाळाजी बाजीराव २ पृ. २१२]

जकात— पेशवाईत जकातीचें उत्पन्न मोठें असे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं माल गेला कीं, दरवेळीं जकात द्यावी लागे. यामुळें व्यापाऱ्यांना फार त्रास होई. हा त्यांचा त्रास चुकविण्यासाठीं हुंडेकरी शहरांत असत. ते जकातदाराबरोबर करार करून ठेवीत व व्यापाऱ्यांकडून एकदाच ठराविक जकात घेऊन साऱ्या मुलखांत त्यांचा माल नेण्याआणण्याचा मक्ता घेत. हा जकातीचा मक्ता पेशवाई गेल्यावरहि इंग्रज सरकारनें कांहीं काळ चालू ठेविला होता. पेशवाईत इंग्रज व्यापाऱ्यांना मात्र जकात माफ असे. पण खुद्द इंग्रजींत ही सवलत काढून घेण्यांत आली !

जकात बैल-ओझ्यावर घेत व बैलावरील दर गोणीमागें तींतील माल पाहून किंमतीवर कमजास्त जकात आकारीत. ही जकात आठ रुपयांहून मात्र केव्हांहि अधिक नसे. कोणापासून जकात घ्यावी, कोणाला माफी द्यावी यासंबंधीं सरकार नियम घालून देत असे; उदा० पुढील पत्र पाहाः—

" पुण्यांत वाण्या उदम्यांची अमदानी होऊं लागली त्यांस कोण कोणापासून जकात घ्यावी न घ्यावी येविशीची आज्ञा जाहली पाहिजे म्हणोन, मशार निल्हेनीं लिहिलें तें विदित जाहले. ऐसीयास-कोकणांतून तांदूळ, व मीठ वगैरे जिन्नस देखील किराणा येईल त्यास जकातीचा तगादा न करणें; यंदा दंग्यामुळें गांवगन्नाचे कुणबी लुटले, नागवले याजकरितां ते पुण्याहून दाणे मीठ नेतील, त्यांस जकातीचा तगदा न लावणें; शिवाय वाणी उदमी जिन्नस नेऊं लागल्यास जकात घ्यावयाची असेल त्याप्रमाणें घेणें; भुसारास जकात घ्यावयाचा पहिल्यापासून शिरस्ता नाहींच; शिंग-शिंगोटीचा मजकूर, तरी कुणबियांची गुरें ढोरें दंगियामुळें लुटली गेलीं, सबब कुणबी पुणें यांत अगर हरएक गांवीं बैल टोणगे विकत घेतील त्यांस शिंगोटी मागूं नये. शिवाय वाणीउदमी घेतील त्यांची घ्यावी." [वाड-थो. माधवराव भा. २ पृ. ६८].

दुसऱ्या सनदेंत " वाणी उदमी देशांतून तूप, तेल, गूळ व हळद ऐसा जिन्नस घेऊन येतात, त्यास सांप्रत या जिनसांची अमदानी जाहली पाहिजे, याजकरितां हे

सनद सादर केली असे, तरी सदरहू जिनसांस दसऱ्यापर्यंत जकात सुदामत शिरस्त्यांपैकीं निमे घेत जाणें, व निमे माफ करीत जाणें." अशी आज्ञा आहे. [किता पृ.६९]

जकात माफीः— जकात माफीचे दस्तक दिले जात. "गंगाजी जाधव वस्ती पेठ सोमवार कसबे पुणें याचे बैल सर ६० खानदेशांत जाऊन सूत व खाया व छिटें वगैरे जिन्नस खरेदी करून, खेपा ३ तीन पुण्यास आणतील त्याला कोणेविशीं मुजाहिम न होणें म्हणून दस्तक देऊन सरकारची नजर करार केली" [बाळाजी बाजीराव रोज. १ पृ. ३१५].

सरकारची मंडळी, नोकरचाकर यांचा माल बाहेरून आणला गेल्यास अशींच माफीचीं दस्तकें देण्यांत येत. इ. स. १७९८ मध्यें दप्तरांतील कारकुनांचे तांदूळ वगैरे जिन्नस कोंकणांतून पुण्यास आणण्यासाठीं ३८४८ बैलांवरील ४२०॥ खंडी धान्याबद्दल १९१ दस्तकें दरबारांतून सोडलेलीं दिसतात. [दु. बाजीराव रोज. पृ. २०१–२०७].

पुणें सुभ्याचें हें जकातीचें उत्पन्न एक लाख रुपयांवर जाई. जकातीचे दर कसकसे त्या काळांत होते याची मोठी यादी भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष २० अंक ४ मध्यें दिली आहे.

अबकारी— पेशवाईत मिठावर कर नव्हता तरी जकात मात्र असे. अबकारी उत्पन्न सबंध पेशवे सरकारचे दहा हजार रुपये देखील नव्हते. पुण्यांत दारूचीं दुकानें नव्हतींच व बाहेरहि बहुधा घालून देत नसत. पेशव्यांप्रमाणें दारूबंदी ठेवावी असें एल्फिन्स्टननें वरिष्ठ सरकारांत शिफारस केली होती. पण बंगाल प्रांतांत दारूचें उत्पन्न इंग्रजी अंमलापासून झपाट्यानें वाढल्यानें सरकारला दारूबंदीचें धोरण कसें रुचावें ?

पट्ट्या—जमीनसारा, जकात यांखेरीज सरकारला उत्पन्न निरनिराळ्या पट्ट्यांपासून येई. सुमारें चाळीस पट्ट्या पुणें प्रांतांत असत. खुशाल पट्टी, गोसावी पट्टी, पासोडी पट्टी, स्वारीपट्टी, नजरपट्टी, दिवाणपट्टी, दहकपट्टी, तळेपट्टी, पालकपट्टी इ. पट्ट्या अधूनमधून वसूल करीत. घरपट्टी व दुकानपट्टी ही कायमची असे. कात्रजचें तळें बांधलें तेव्हां त्याला जो दोन लाख रुपये खर्च आला व पुन्हां त्याच्या दुरुस्तीसाठीं व व्यवस्थेसाठीं लागणारा खर्च मोठ्या लोकांवर पट्टी बसवून कांहीं वसूल केलेला आहे. या तळेपट्टीचा हिशेब 'पेशवाईच्या सावलींत' तुळशीबागवाले दप्तरांतील कागदांवरून छापला आहे. तसेंच 'नरहर पर्वती' या कामास १७७९ सालीं सुरुवात होऊन तें तीन वर्षांत संपलें. खर्च ८३२६८ रु. झाला. गटाराचें काम १७८२ ते १७८४ पर्यंत चाललें. या मोरीसाठीं सरदारांकडून कांहीं पैसे वसूल केले व बाकीचे सरकारानें दिले. तोफखान्याच्या कामासाठीं बाभूळपट्टी व बैलपट्टी सुरू केली. पालपट्टी म्हणजे मेण बाजारांत पालें उभारून दुकानें मांडतात त्यावर कर. खुशाल–किंवा संतोष–पट्टी म्हणजे राजाला

मुलगा झाल्याबद्दल आनंद दाखविण्यासाठीं लोकाकडून घ्यावयाचा कर. शक १७१९ त या संतोषपट्टीची रक्कम ७५०० रुपये सरकारांत जमा आहे. [पेश. सावलींत पृ. २९६].

पेठेचा कारभार— पुण्यांत स्थानिक करांचा मक्ता देत, असें दिसतें. मागें सांगितल्याप्रमाणें दर पेठेला एक कमाविसदार व शेट्या असे. शेट्या पेठेचा कारभार पाहून ठराविक पट्ट्या वसूल करी. 'पुणें नगर संशोधन वृत्त' खंड १ ला यांत गुरुवार पेठेचा कारभार कसा चाले हें सविस्तर दिलें आहे. पेठेंतील जमेच्या बाबी म्हणजे दुकानसारा, मेणबाजार (पालें देऊन बसलेला बाजार, जुना बाजार असतो तसा) यांत बसणाऱ्या दुकानदारांकडून भाडें, दुसऱ्या कुळांस जागा देतांना घेतलेली नजरपट्टी, रस्त्यावर दुकानांपुढील छप्परांचें भाडें, चावडी-पट्टी, उदिमांकडून घेतलेली पट्टी इ. असत. गुन्ह्यांबद्दल दंड घेत त्याचेंहि उत्पन्न येई. गुन्ह्यांच्या सदरांत कोणकोणत्या गोष्टी येत त्या पाहाः—" कमाविसी जमा—

१५ छटु जिनगर याची बाईल नारायण पेठेंत बद अमलात सापडली तिची शेट्यानें रदबदल केली सबब करार रु. २० पैकीं खर्चाचे सेट्यानें घेतले रु. ५ बाकी जमा

१० लक्ष्मण सिकलदार याणे कजिया बिगारीकरितां केला. घ्यायास मार-मार केली सबब

१० बुढण याचे कर्ज येणे सेट्याने वसूल करून दिल्हे सबब

२५ कलवंतीण लस्करची जाई ×× दिल्ही सबब

२५ गंगी गानेवाली लस्करात बद अमल केला सबब

१६० लक्ष्मी मालजादीन इचे घरी लस्करचे सोधे च्यार व सिव बेरडाचा लेक चोरीस धरिला सबब करार रुपये १९० पैकी सेट्याने घेतले ३० बाकी

३५ निंबी लोणारी इने लस्करांत बद अमल केला सबब रदबदलीमुले घेतले ते

१५ दिना खाटीक याचा व त्याचे भावाचा कजिया होता तो विल्हे लाऊन करार केले ते

१७ मानसिंग काछी याणे आपले बायको टाकली फारखती करून देविली सबब

× × × × ×

५० गुलाब तातलाला याचा मेहुणा याणे जीव दिल्हे सबब......"

याप्रमाणें कांहीं कमाविसी जमा एका जुन्या कागदांतून घेतल्या आहेत. साधी मारामारी, चोरी, तंटे, शिवीगाळ, लबाडी इ. किरकोळ गुन्ह्यांचा खंड कमाविसदाराकडे

शेत्याकडून जमा होई. मोठे गुन्हे कोतवालाकडे येत. लोकांनीं नीतीनें व धर्मानें चालावें याबद्दल फार कटाक्ष असे, हें वरील गुन्ह्यांवरून दिसून येईलच. एखाद्या गरती बाईस रखेली म्हणून कोणाजवळ राहावयाचें झाल्यास कोतवालाची परवानगी लागे. नवऱ्यानें टाकलेली किंवा विधवा असेल तरच योग्य कारण पाहून सरकारची परवानगी मिळे. [स. माधव. रोज. ३·११५८ पृ. ३५२].

शिक्के— वजनें–मापें यांवर सरकारी शिक्के मारीत व त्यासाठीं स्वतंत्र अधिकारी असे (पे. द. २२· ले.१९२). बाहेरून कापड शहरांत येईल त्यावर छाप मारून घेण्यासाठीं छपायतीची कमाविसी दिली जाई. त्यासंबंधीं एका सनदेंतील कलमें अशीः

" बाहेरील कापड शहरांत येईल त्याजवर छापा करून किमतीवर दरसदे रुपये ५ पांचप्रमाणें घेत जावे; शहरांत नवें कापड होईल त्याचा शिरस्ता दरसदे रुपये २॥ अडीचप्रमाणें घेऊन छापीत जावे; पहिलें कापड शहरांत उदम्याचे घरीं आहे तें आणून छापावें. किमतीवर दरसदे रुपये २॥ अडीच घ्यावे. बिनछापी कापड जो विकील त्यापासून गुन्हेगारी घ्यावी.

शिबंदीची नेमणूक सालीना रुपये १६७५

छपायतीची कचेरी, समशेर बहादर याचे दरवाज्यापुढें चौत्रा आहे, त्याजवर करावी. कचेरीचे साहित्य करावे. छापा सरकारांतून घ्यावा " [बाळाजी बाजीराव रोज. भा. १ पृ. ३२०]

नाकीं— पुणें शहरांत १८०४ सालीं पुढील नाकीं होतीं—१ विठ्ठलवाडी, २ पूल, ३ गणेशखिंड, ४ कात्रज, ५ संगम, ६ मुसाफर जंग याचे घरानजीक, ७ भवानी पेठ. [दु. बाजीराव रोज. पृ. २८०]. पुण्यांत येणारा लाकूड माल वगैरे या ठिकाणीं तपासून त्यावर जकात घेण्यांत येत असे.

१७६७–६८ सालीं गुरुवार पेठेचा वसूल १४३९ रु. होता पण पुढें १७८७-८८ सालीं नुसता दुकानसारा १८५६॥· रुपये आला व एकंदर जमा ३४२५।· होती.

घरपट्टी—मुख्य उत्पन्नाची बाब म्हणजे हल्लींप्रमाणेंच घरपट्टी असे व ती कायमची असे. गुरुवार पेठेंत १७६८ सालीं घरें सुमारें २०० होतीं त्यावर पट्टी हजार रुपयांच्या आंत असे. पुढें पेशवाई अखेर घरें ५५० पर्यंत वाढलीं पण त्यांत ३९१ घरांकडूनच पट्टी घेण्यांत येई. बाकीच्यांना माफी असे. पट्टीचा वसूल त्यामुळें २००० रु. पर्यंतच येई. देवळें, मठ, धर्मशाळा, सार्वजनिक जागा, सरकारवाडे, कांहीं सरकारी नोकर, यांना पट्टी अजीबात माफ असे; कांहींना थोडीफार माफी असे. अशी माफीची यादी याच खंडांत पृ. ९० वर दिली आहे.

रस्ता आडवणूक— मूळ घरापुढें रस्त्यांत नवीन पडवी वगैरे बांधकाम केलें तर आजच्याप्रमाणेंच जादा आकार पडे.

' रामशेट बीन हरशेट वीरकर शेटे याणी पेठ सदाशिव शहर पुणें येथें आपले घरापुढें रस्त्यांत नवीन पडवी पांच खणांची बांधली आहे. त्यास दर खणास पट्टी रुपये ५ प्रमाणें सरकारांत घ्यावयाचा शिरस्ता आहे ते यास माफ केले असत. तरी याचे नांवें माफ खर्च लिहून तगादा न करणें. मशारनिल्हेनीं पडवींत घरचें दुकान घालून उदीम केल्यास सालाबादची पटी माफ केली असे ती न घेणें. बाहेरील दुकानदार भाडेकरी ठेविल्यास वरकडाचे शिरस्तेप्रमाणें याजपासून पटी घेत जाणें. " असा १७९६ सालीं दिलेला हुकूम आहे [दु. बाजीराव रोज. २४८ पृ. २७९–८०]

बेवारसी जागा— शहरांतील बेवारसी, गतकुलीची जागा जागेच्या क्षेत्र-फळाच्या मानानें किंमत घेऊन दुसऱ्यास विकत देत.

" रामचंद्र व शामा हलवाई रोजेकर पेठ आदितवार कसबे पुणें यांसः– लक्ष्मण सोनार याची जागा बेवारस आदितवार पेठेंत होती. ती सरकारांतून हरदुजणांस विकत दिल्ही. किंमत रुपये २५० अडीचशें लांब हात ६० व रुंद हात १०॥ साडेदहा याप्रमाणें करार करून दिल्ही असे. " [बाळाजी बाजीराव रोज. २·३४५] त्या वेळची जमिनीची किंमत २५० रु. स ६३० चौरस हात म्हणजे किती स्वस्त होती पहा.

जागा खरेदी— जागेचें किंवा घराचें खरेदीखत कोतवाली चौऱ्यावर नेऊन दाखवावें लागे. म्हणजे कोतवालचा कारकून व गवंडी जाग्यावर जाऊन ती मोजीत व नंतर या कोतवाली कचेरींतून खरेदी–विक्रीचा दाखला मिळे. या दाखल्याला **कबाले-पत्र** म्हणत. याबद्दल सरकारचा आकार साधारणपणें शेंकडा १० रु. असे व तो खरेदी-दारांकडून घेतला जाई. अशा कबालेपत्रांत जागेचें सविस्तर वर्णन, हद्दी, रस्ते वगैरे असे. रस्त्यावर मोरी अमके बाजूस आहे तेथें घरांतील सांडपाणी नेऊन मिळवावें असा आदेशहि असे. [पुणें सं. वृत्त पृ. ५०–५१ भा. इ. सं. त्रै. व २१·३·२७१].

नळ मोऱ्या—नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत कात्रजचें तळें बांधलें व गांवांत हौदांतून कांहीं ठिकाणीं पाणी सोडलें. हें **नहर काम** थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दींत (१७६९) सुरू झालें होतें. [पे. सा. २५१]. तथापि सांडपाण्याचा निकाल नव्हता. १७८२ मध्यें ' गांधानाला ' बांधून नदीकिनाऱ्यानें कुंभारवेशी-पलीकडे मोरींचें पाणी सोडून दिलें. [पुना गॅझेटीयर ३२६. पेश. सा. ४१. पुण्याचें वर्णन ५२]. " ही **मोरी गळ्याइतकी खोल असून सुमारें दोन हात रुंदीची** आहे. हिची बांधणी सर्व दगडी असून वर छावणी कमानदार आहे. ही उक-रण्यासाठीं मध्यें दगडाच्या छावण्या बसविल्या होत्या, त्या आलीकडे १८६४ सालीं म्युनिसिपल कमिटीनें काढून फळ्या बसविल्या. " [जोशीकृत पुणें वर्णन पृ.११३]. रस्त्यांत मोठा मोरीचा नळ घातल्यावर घरांचें पाणी या मोरीला मिळविण्यांत आलें. कोतवालाकडे या मोरीचा खर्च व पट्टी असे.

" सरकारचे जागे शहरांत आहेत, त्यांचे रस्ते यांतील मोऱ्या जागोजागीं बांधिल्या, त्यास खर्च जाहला तो......एकूण दोनशें सवीस रुपये मोरीचे कामास लागले ते कोतवालींचे हिशेबीं खर्च लिहिणें, मजुरा पडतील म्हणौन, घासीराम सांवळदास कमावीसदार कोतवाल शहर पुणें यांचे नांवें. " [स. मा. रो. ३·११६५]. हा सरकारी मोऱ्याविषयीं उल्लेख आहे; पण खाजगी घराचा, पुढील उतारा पाहाः—

" भोज्या शिंदा याचें घर पेठ शुक्रवार शहर पुणें येथें आहे, तेथील मोरी कोतवालीकडून बांधली त्याचा आकार रुपये ७ शिंदा मजकूर यास माफ केले असेत तरी कोतवाली शहर पुणें येथील हिशेबीं खर्च लिहिणें म्हणोन, धोंडो बाबाजी कोतवाल शहर पुणें यांचे नांवें. " [किता ३·११५६]

रस्ते— पूर्वी मोठ्या शहरांत देखील रस्ते फार रुंद नसत. कारण अशा शहरी रस्त्यांतून जाणारीं वाहनें म्हणजे पालख्या, मेणे, डोल्या, हत्ती, घोडे हेच असत. यांना रस्ता मोठा लागत नाहीं. पुण्याच्या एका कबालेपत्रांत सरकारी सडक १० गज म्हणजे ३० फूट असल्याचें नमूद आहे. राजरस्त्यांवरून व वाटांकडे जाणाऱ्या रस्त्यांवरून फरशा बसविल्या असत. अद्यापहि कांहीं जुन्या शहरांत अशा फरसबंदी सडका आढळतील. इंग्रजी अमदानींत १८३७ सालीं पुण्यांतील फरसबंदी रस्ते मोडून मोठ्या सडका केल्या. [पुणें न. सं. वृत्त १·११] रस्ते चांगले व मोठे असावेत अशाविषयीं पेशवाईत कल्पना नव्हती असें नाहीं. " शहरांतील रस्ते चांगले राखावें, पडवी वोटे पुणें जळाल्यावर नवे परवानगीशिवाय जाले असतील ते मोडून टाकणें पुढें देऊं नयेत. " [स. मा. रो. ३·५१] अशी सरकारी आज्ञा स्पष्ट आहे. तथापि आजच्या डामरी विस्तृत रस्त्याची कल्पना त्या काळीं कोणाला येणें शक्यच नव्हतें.

पाणी— पूर्वी पुण्यांत पाण्याचा दुष्काळ क्वचित् पडे. पण पुढें कात्रजचा नळ, हौद झाल्यापासून तर एक प्रकारचें वैभव दिसे. नानाफडणीस, रास्ते व चौधरी यांनीं स्वतंत्रपणें बाहेरून नळ बांधून आणून हौद केले होते. विहिरी दीड हजारांवर होत्या. यांची सविस्तर यादी पुणें नगर संशोधनवृत्तांत (१. पृ. १३—१५) दिलेलीच आहे. विशेष म्हणजे **पाणीपट्टी अजीबात नसे.** ती घरोघरीं नळ आल्यापासून बसली. एखादेवेळीं पाणी कमी पडल्यास किंवा कात्रजच्या नळाचें पाणी खराब झाल्यास पर्वतीच्या तळ्यांत विहिरी खणण्याची योजना असावी [पे. द. ३९ पृ. ६८१३]. कारण हें तळें ५५० × २२५ चौरस यार्ड इतकें मोठें असे व सुमारें २५ एकर जागा त्यानें व्यापिली होती. या प्रेक्षणीय व उपयुक्त सरोवराचें महत्त्व पुढें अजीबात जावें हा दैवदुर्विलास होय.

गस्त— लहान गांवांतून जसे जागले रामोशी गस्तीला असतात त्याप्रमाणें शहरांत कोतवाल रामोशी मुद्दाम ठेवीत. शिवाय गस्तीचे लोक असत. " शहरांत फंदफितुरी वगैरे येऊन राहातात त्यांची चवकशी पेठांपेठांतून कोतवालाचे कारकून वगैरे

आहेत त्यांजकडून बारकाईनें बातमी राखीत जाऊन वरचेवर सरकारांत कळवीत जाणें........ शहरांत रात्रीची गस्त कोतवालीकडील फिरत्ये त्याजबराबर कारकून व प्यादे चौकस देत जाऊन रात्रीच्या गस्ती नेहमी फिरऊन बंदोबस्त राखीत जाणे व बारकाईनें चोरांचा पत्ता लाऊन चोर धरून आणून सरकारांत देत जाणें... " [स. मा. रो. ३-११५८] म्हणून सरकारी हुकूम कडक होते. आजचे पोलीस अशा गस्ती कितपत घालतात ? रात्रीं ११ वाजतां तोफ होई. त्यापुढें कोणी परवान्यावांचून फिरावयाचे नसे. सकाळीं पुन्हां तोफ झाली कीं व्यवहार सुरू होत. [मोस्टीनची डायरी, पृ. ३२४]

बागा— त्याकाळीं शहरांत सरकारी व खासगी बागा पुष्कळ होत्या. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील २५ बागांचीं नांवें पेशवे दप्तरांत एके ठिकाणीं (४० ले. ५६) प्रसिद्ध केलीं आहेत. हिराबाग तर प्रसिद्धच आहे. या बागा लोकांच्याहि उपयोगी पडत. पण आजच्यासारखी गांवांत गर्दी नसल्यामुळें प्रत्येकाच्या घरांत किंवा जवळ बागेसारखी कांहीं सोय असेच. सरकारी बागेवर देखरेख करण्यासाठीं स्वतंत्र अधिकारी असे. [पे. द. २२·२०७]. पुण्यांत लावण्यासाठीं ७५ रु. स. २५ खुरूचीं झाडें औरंगाबादेहून आणल्याचा उल्लेख सांपडतो. [पे.द. २२·२१४]. सारांश, बागांचें महत्त्व त्यावेळींहि वाटत होतें, यांत शंका नाहीं.

दिवे— आज ज्याप्रमाणें रस्त्यांतून दिवे लागतात त्याप्रमाणें पूर्वीं सोय करणें शक्यच नसे. राकेल तेल गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत व्यवहारांत आलें. तेव्हां मोठे लोक बाहेर जातांना मशाली बरोबर घेत. मशालजी व तेल यांचा जादा तनखा मोठ्या सरकारी नोकरांना देत. मोठ्या मिरवणुकींच्या वेळीं हवाया चंद्रज्योती पाजळीत.

शाळाखातें— इंग्रजी अमदानीपूर्वीं स्वतंत्र विद्याखातें नसे. शास्त्री, पंडित, भिक्षुक हे वैदिक अध्यापन खाजगी करीत व त्यांना दक्षिणा व इतर संभावना गृहस्थ मंडळी व सरकार करीत. श्रावण मासाची पेशव्यांनीं सुरू केलेली दक्षिणा ही केवळ विद्येच्या उत्तेजनासाठींच असे व म्हणून पेशवाईनंतर एल्फिन्स्टननें त्या दक्षिणेच्या रकमेचा एक फंड करून त्यांतून संस्कृत पाठशाळा १८२१ सालीं विश्रामबागेंत काढली. पुढें या शाळेचें रूपांतर डेक्कन कॉलेजांत झालें. १८२६ त पुण्यास पहिली मराठी शाळा निघाली. १८४२ त संस्कृत पाठशाळेला इंग्रजी वर्ग जोडला. यापूर्वीं कांहीं वर्षें मिशनऱ्यांनीं इंग्रजी–मराठी शाळा चालविल्या होत्या; त्यांत कांहीं मुलीहि असत. पण प्रथमच मुलींची शाळा आपल्या हिंदु मंडळींनीं काढली. ती १८५१ सालीं. पुढें श्री. ज्योतिबा फुले यांनीं फार कष्ट सोसून मुलींचीं व अस्पृश्यांची शाळा चालविली. तात्या पंतोजींच्या व व्यापारी वर्गांतील मुलांसाठीं जमाखर्चांच्या शाळा खाजगी तऱ्हेनें अनेक चालत.

वैद्यखातें— १८२३ सालीं पुण्यांत पहिलें इस्पितळ स्थापन झालें. सरकारी डॉक्टरांनीं रोग्यांना मोफत दवा द्यावा असे जाहीरनामे गांवोगांवीं लागले. या बाबतींत मिशनऱ्यांचा फार उपयोग झाला. पेशवाईत पर्वतीस वैद्यखाना असावा असें 'धोंडभट पर्वती वैद्यखान्याकडे' या इ. स. १७६० च्या उल्लेखावरून वाटतें [पे. सावलींत पृ. २११–२२]. ज्याप्रमाणें सरकारी शिक्षणखातें नसे त्याचप्रमाणें वैद्यखातेंहि नसे. मात्र परोपकारी व तज्ज्ञ वैद्यहकीमांना सरकार इनामें वगैरे देई.

पेशवाई कारभार पुढें चालू— पेशवाई गेल्यानंतर इंग्रज सरकारनें बरींच वर्षे पूर्वींचिच राज्यव्यवस्थेची पद्धत चालू ठेविली व जरूर तेथेंच थोडे फेरफार केले. असें करण्यांत एल्फिन्स्टनची फार दूरदृष्टि होती. प्रजेला राजी राखून बारीक चौकसी करण्याचें धोरण त्यानें आंखून दिलें. चांगलीं समजूतदार व अनुभवी माणसें त्यानें जिंकलेल्या मुलखावर ठेविलीं. पुणें शहर व प्रांत यावर एच्. डी. राबर्टसन कलेक्टर असे, त्याच्याकडे मुलकी, दिवाणी व फौजदारी हे सर्व अधिकार दिलें. "हच राबिसन। गोकुळीं किसन। मेजावर बसून। लेखणी तासुन। मनसबा केलें॥ जी जी जी॥" या कडव्याचें एक तमाशांतलें गाणें आहे, त्यावरून या कलेक्टराची लोकप्रियता दिसून येते. [रू. ब. गोडबोलेकृत एल्फिन्स्टन चरित्र, उत्तरार्ध पृ. ११]. या साहेबानें आपल्या वरिष्ठांकडे जे वेळोवेळीं अहवाल पाठविले ते अद्याप अप्रसिद्ध आहेत. त्यांतील एक प्रो. चिं. ब. जोशी (वाडिया कॉलेज) यांनीं भा. इ.सं. त्रैमासिकांत छापला आहे. तो पाहिल्यास त्यावेळेस पुणें आणि पुण्याचे लोक आतांप्रमाणेंच कसे होते तें स्पष्ट कळतें.

खानेसुमारी— पेशवाई गेल्यानंतर साधारणपणें दोनतीन वर्षांनीं पुण्याची सर्व बाजूंनीं पाहाणी–नोंदणी करण्यास सरकारनें सुरुवात केली. पेठांच्या खानेसुमारी (घरांच्या), घरपट्ट्या, पडीक जागा इ. ची मोजणी सुरू झाली. या मोजणीचे कागद पेशवे दप्तरांतून व इतर खाजगी दप्तरांतून सांपडतात. १८४४ सालीं सरकारनें शहरांतील सर्व जकाती उठविल्या. [Act. XIX of 1844]. त्यापूर्वी एक वर्ष मीठ, कापूस व साखर यावर फक्त जकात असे. १८४१ पासून पुण्यांत नवीन घरें होऊं लागलीं. पांच वर्षांत ४०० नवीं घरें बांधलीं गेलीं असें १८५७ चें थॉर्नटनचें गॅझेटियर सांगतें. नागझरीवर खासगी पैशानें नवा पूल बांधण्यांत आला. लकडीपूल लाकडाचा होता, त्याजागीं दगडाचा पूल आला. वेलेस्ले पूलहि सरकारनें आपल्या खर्चानें तयार केला (१८३०) व तो उघडण्याच्या वेळेस ब्राह्मणांना दक्षिणा वांटली! शहराचा पूर्वेचा भाग–लष्कराला लागून असणारा, खडीच्या सडका घालून चांगला दिसेल असा केला. पेशवाई गेली तेव्हां लोकसंख्या १,१०,००० होती ती १८३८ त ७५,१७० इतकी कमी झाली. १८५१ सालीं ७३,२०९ इतकी वस्ती होती. घरें १०,२४५ व गुरें ९,६९२ होतीं. १८६० सालांत घरें ९,८६२, बिऱ्हाडें २७,८०० व बखळी

१७४५ होत्या. १८६४ त म्हणजे म्युनिसिपालिटी झाल्यावर सात आठ वर्षांत वस्ती ८०,००० झाली. याप्रमाणें पन्नास वर्षांत पुण्याच्या वस्तींत चढउतार होत गेला. त्याचीं कारणें येथें देण्याचें कारण नाहीं.

म्युनिसिपालिटीची स्थापना— म्युनिसिपल कमिटी असावी असें लोकांचें मागणें नसतांहि सरकारनें १८५६ सालीं विशिष्ट नियम करून या संस्थेची स्थापना केली व लष्करी आणि पोलिस खात्यांतील अधिकारीच प्रथम मुंबईतल्या-प्रमाणें या स्थानिक स्वराज्यांत घुसविले. या नगरपालिकेला सर्व गोष्टी अथपासून कराव्या लागल्या. उदा० नव्या सडका, पाण्याचे हौद, घरें पाडणें, मोऱ्या साफ करणें घरपट्टया सरसकट सर्वांवर बसविणें, गुरांवर कर लादणें, इ. यांसंबंधीं व पुढचा इतिहास पुढील प्रकरणांतून येणारच आहे.

सूची

हा पुणें न. सं. खं. २ रा असला तरी सूचीमध्यें १ ला व २ रा असे दोन्ही खंड घेतले आहेत. सूचींतील नांवापुढील आंकडा पृष्ठाचा आहे. नांवांतील व्यक्तिनामांत आडनांव असल्यास तें आधीं देऊन मग व्यक्तिनाम दिलें आहे. तथापि प्रसिद्ध ऐ. व्यक्ति-महादजी शिंदे, सदाशिवराव भाऊसाहेब पेशवे इ. हीं नांवें व्यक्तीनामाप्रमाणेंच दिलीं आहेत. एकाच पानांत एकाहून अधिक वेळां तें नांव आलें असतें, म्हणून सबंध पान पाहण्याचें करावें. अनुस्वाराची स्वतंत्र बाराखडी समजून ती, ओ–औ नंतर अं, आं, इं अशी दिली आहे व त्यापुढें जोडाक्षरें दिलीं आहेत. ऐ. पत्रांत येकनाथ (एकनाथ) वोंकार (ओंकार), राजरीस (राजर्षि), सिंदे (शिंदे), अशीं नांवें क्वचित् येतात. तरी सूचींत सांप्रतचा शुद्ध उच्चारच दिला आहे. कांहीं लेखांत नांवांच्या यादी आल्या आहेत, उ० घरपट्टी माफीची यादी (पृ. ९०), वंशावळ (पृ. ४५, ५४, ९६, १३४), साक्षी (पृ. ९९, १५७); खानेसुमारी (पृ. ७, १४, १९, २४) इ. इ. अशा यादींतील सर्व नांवें लेखांतच पाहण्याचें करावें. **विषयसूचींत** हे लेख दर्शित केले आहेत.—शं. ना. जोशी

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ

वर्ष २४ वें] **त्रैमासिक** [अंक १ ला

निवेदन

वर्ष २४ चा हा पहिला अंक आहे. यांत **पुणें नगरसंशोधन वृत्त खंड २ रा** समग्र दिलें आहे. खंडासंबंधीं विवेचन त्याच्या प्रस्तावनेंत आहेच. या पुढील अंक **संकीर्ण निबंधा**चा निघेल.

× × × ×

मंडळाचें संमेलन व वाढदिवस योजनेप्रमाणें व्यवस्थित पार पडलें. साधारण सभा होऊन शक १८६४ चा अहवाल व जमाखर्च यांना मंजुरी मिळाली व १८६५ चे अंदाजपत्रकाला सभेनें संमति दिली. वाढलेला खर्च भागण्यासाठीं नवीन देणग्या व सभासद पाहिजेत. याबाबत मंडळाच्या कार्यांत मनोभावानें लक्ष घालणाऱ्या मंडळींची मोठी मदत होईल अशी आशा धरून आहों.

× × × ×

मंडळाशीं दीर्घकाल निगडित असणारे मंडळाचे संशोधक सभासद श्री. वि. गो. दिघे व श्री. मो. गं. दीक्षित यांना इतिहास विषयांत ‘पंडित’ (पीएच्. डी.) पदवी मुंबई विद्यापीठाकडून मिळाल्याबद्दल मंडळाला अभिमान वाटतो. डॉ. दिघे हे पेशवे दप्तरांत रा. ब. सरदेसाई यांचे बरोबर काम करीत असत. ते आतां मुंबई रेकॉर्ड- मध्यें संशोधन करीत आहेत. त्यांचा पदवीप्रबंध ‘पहिला बाजीराव’ हा होता. आणि डॉ. दीक्षित यांचा ‘महाराष्ट्रांतील युद्धकालीन वसाहती’ असा होता. डॉ. दीक्षित ह्यांचा शिलालेख–ताम्रपट वाचनाचा अभ्यास चांगला असून मंडळांत त्यांनीं यासंबंधीं बरेच निबंध सादर केले आहेत. प्राचीन लिपिशास्त्र, वास्तु–शिल्पशास्त्र या विषयांचा शास्त्रीय अभ्यास करणारे विद्यार्थी आपल्याकडे फार थोडे आहेत.

आम्ही डॉक्टर–द्वयांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों व त्यांनीं मंडळाशीं वाढतें सहकार्य करून संशोधनकार्य चालू ठेवावें अशी प्रेमाची सूचना करतों.

× × × ×

जूनच्या आरंभीं महाराष्ट्र साहित्य परिषदेनें एक ऐतिहासिक सभा भरविली. तिचे अध्यक्ष रा. ब. सरदेसाई होते. त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत इतर प्रांतीय इतिहासाभ्यासी, मराठे लोकांवर जे आरोप करतात व ज्यांना आपण बिनतोड उत्तर देऊं शकत नाहीं अशा आरोपांचा उच्चार केला. त्यांपैकीं 'मराठ्यांनीं अटकेवर झेंडे लाविले नाहींत' हा एक होता. या विषयावर चर्चा करण्यासाठीं मंडळांत तज्ज्ञांची मुद्दाम एक सभा भरविली. रा. ब. सरदेसाई उपस्थित होते. या सभेंत प्रा. शेजवलकर व श्री. ग. ह. खरे यांनीं मराठ्यांनीं अटक घेतली होती याबद्दलचे निश्चित पुरावे पुढें मांडले व रा.ब.ची खात्री करून दिली. त्यांनींहि मोठ्या प्रांजलपणें आपण इंग्रजींतून हे पुरावे दाखवून सरकारादिकांचें समाधान करूं असें आश्वासन दिलें. या पुराव्यांसंबंधींचा इंग्रजी लेख याच अंकांत दिला आहे. वारंवार अशाच चर्चा इतर वादग्रस्त प्रश्नांवर होत गेल्यास किती तरी गोष्टी निश्चित व सर्वमान्य होतील.

× × × ×

'**दंडनीति**' हा स्वीयमालेंतील ग्रंथ शक १८६४ च्या सभासदांना नियमाप्रमाणें मिळेल. सभासदांनीं मागणी करावी.

पुण्याबाहेरच्या सभासदांनीं मंडळाची वर्गणी त्रैमासिक टपालखर्च (सहा आणे) यांसह चेकनें जर पाठविली तर चेकचा वटाव म्हणून आणखी आठ आणे पाठवावे, अशी विनंति आहे.

चिटणीस

MARATHAS BEYOND ATTOCK.

[Editorial]

Students of Maratha History know that just before the third battle of Panipat, the Marathas had extended their sway over the whole of the Punjab and even had gone beyond the Indus. 'Taking the flag beyond Attock' is now a proverb in Marathi language. But there is a school of Indian historians who questions this claim. According to this school the Marathas never went beyond the Chenab; therefore the claim put forth by the Maratha historians of their forefathers having crossed the Indus at Attock is considered by this School as an ignorant boast. Recently Rao Bahadur G. S. Sardesai

reiterated this doubt in his address to the History Conference held under the auspices of the Marathi Sahitya Parishad, Poona.

This School is headed by Sir Jadunath Sarkar who in his 'The Fall of the Mughal Empire' Vol. II makes the following statement on pp. 75, 76 :—

'The Marathas did not venture to carry the war across the Chenab, because the river was too deep for fording and the country beyond it was mostly tenanted by Afgan supporters of the Durani cause.'

Sir Jadunath has added a foot-note to this statement which runs as follows :—Not a single maratha soldier crossed the Chenab. The assertion that the Maratha standards were carried up to the Indus at Attock is an ignorant boast.

In support of this statement Sir Jadunath mentions a letter written by one Hari Raghunath Bhide and addressed to Nanasaheb. This letter is published in S. P. D. Vol. 27 as No. 218. In this letter tentatively dated 21 April 1758 the writer says 'Jehankhan and Taimurshah fled across the Chenab leaving their heavy artillery behind which was later captured by the Maratha forces. The river was in floods and was not fordable. Otherwise the Marathas would have crossed the river with their artillery and would have pursued the enemy right up to Attock.'

From this letter Sir Jadunath draws an inference that the Marathas never crossed the Chenab. He even makes the statement that not even a single Maratha soldier crossed the Chenab. We fail to understand the validity of such a sweeping remark. From the letter mentioned above one can legitimetely infer that on the particular day mentioned by Bhide the Marathas could not pursue the enemy, beyond Chenab. But it does not follow that they did not do it afterwards or that the Chenab was always unfordable to the Marathas. As a matter of fact the very letter on which Sir Jadunath has based his conclusion belies it. The letter further adds that though the entire Maratha force with its heavy artillery could not cross the Chenab, small parties did cross the Chenab and reached Attock.

चिनाबेस पाणी थोडे असते तरी आटक परियंत जाती सहात (?) मात्र आट(क)पार होऊन गेली.

The editor of the S. P. D. has put a question mark against the word sahāta. The correct reading for this word is Sabāta and not Sahāta, Because, the word was read as Sahāta the editor naturally could not understand it. S abāta means parties of ten or eleven horsemen. Sabāta is th e plural of the Arabic word subat. The sentence therfore suggests that though the entire body could not cross the river, parties of soldiers crossed the river and marched as far as Attock. Either Sir Jadunath did not read the letter in the original or even reading it found this sentence in convenient and therefore ignored it.

Even leaving this letter out of account for the time being we can conclusively prove that the Marathas not only crossed the Indus at Attock but succeeded in collecting dues from the territory around.

A letter dated 4th June 1758 in the Dabholkar collection (unpublished) contains the following statement :—

लाहोराकडे चालोन गेलो तैमूर सुलतानखान व जहानखान अबदालीची पंचवीस हजार होती ती पळोन गेली लाहोर घेतले आटकेपर्यंत मोकळे आहे दोन चार छावन्या केल्या तर वजीर पातशहा खेरीज करून आपला कोडीचा बल्की दीडाचा सुटेल.

'As the army of twenty five thousand of Taimurkhan Sultan and Jehankhan Abdali has been routed it is now easy to go as far as Attock. By marching three or four stages it is possible to secure territory which would yield a crore and half rupees.'

That the Marathas succeeded in carrying this object is clear from a letter No. 163 in S. P. D. Vol. 21. The letter is dated 5th September 1758.

पूर्वील मुलुकाखेरीज लाहोरचा सुधा आटकपावेतों दो करोडाचा मुलुक यासालीं महाराजाचा जाला आतां पश्चमेस मुलतान काबुल व पूर्वेस बंगाल अयोध्या प्रयाग राहिली.

This means that though the Marathas did not cross the Chenab in April they did so afterwards and before September of the same year had reached the Indus.

We give below two more extracts from a letter probably written by Tukoji Holkar and addressed to Malharrao Holkar. The letter is not dated but from the contents of the letter one can infer that it must have been written sometime in November 1759.*

It is of a much later date but it mentions clearly that the Marathas succeeded in collecting dues from the territory as far as Attock.

या प्रांतांतील सरंद् व दुबाब लाहोर प्रांत मुलतान आटक येथील जो वसूल आला तो सिदी यानेंच घेतला आम्हास पोटास जो यैवज लागला तितकाच मात्र दिल्हा (Selections from Chandrachud Daftar published by The Gwalior Records department in 1934 p. 4.)

आपले आज्ञापत्र इंदूरचे मुकामाहून आले त्यांत आज्ञा लिहिली कीं **तुम्ही अटक परियंत बंदोबस्त केला** परंतु सरकारांत पैसा पाठवला नाहीं येश्यांस पैका जो आला तो रा साबाजी पाटलांनीं घेतला आम्हास रा जनकोजी बाबांचे पत्र आणून दिले कीं तुम्ही पोटापुरता रोजमुरा मात्र घेणें (Letter No. 49 p. 56 Chandrachud Daftar published by B. I. S. M. in 1920.)

The two extracts are published in separate volumes of the Chandrachud Daftar. One volume was publised in 1920 i. e. several years before Sir Jadunath published his volume. We mention this because Sir Jadunath always puts forth a claim that before making any statement he studies all published and even unpublished papers bearing on the statement.

So far we have given authorities from the Marathi records. They are, we submit, quite sufficient to prove to an *unbiassed* and *impartial* student that the Marathas were masters of Attock at least for a period of five or six months. But Sir Jadunath has neither of these two requisites of a Scientific historian. He may find it convenient to stamp all the authorities

---

*गिलच्या अद्याप लाहोर प्रांतींच आहे पंचवीस हजारा फौजेची खबर आहे बटाल्यापर्यंत त्याचा प्रवेश जाला यैसे वर्तमान आहे. The mention of Abdali's army being at Batala helps us to put the date about November 1759.

quoted by us as spurious and unauthentic simply because they are written in Modi, a script which Sir Jadunath finds difficult, if not impossible, to read. We therefore give below two extracts from Persian letters which mention that the Marathas had crossed the Indus at Attock and were reported to be in Peshawar. It is clear that the Marathas could not have gone to Peshawar for a picnic. Nor was Peshawar known in those days to have been a place of pilgrimage. The fact therefore that the Maratha soldiers were freely moving between Peshawar and Attock suggests only one conclusion viz. That the Marathas not only crossed the Indus but even went beyond, and that they did not go there as tourists in a foreign land but were there as Masters.

These extracts are taken from news letters from Delhi addressed to the Peshwa. These are styled as Akhbar-i-darbar-i-wala or mualla. These news letters contain such a wealth of information about dates and persons that unless otherwise contradicted by superior sources such as the Royal firmans, the news letters must be taken as authentic.

The first extract runs thus :—

رسیدن توکوجی وغیره سلاحداران فرستادهای راو ملهارجی
هولکر و راو جنکوجی سندهیه در پشاور

The news letter is dated 20th December 1758 and contains a summary of a letter sent on 22nd November 1758. The extract is taken from this summary. In English the sentence will read as "the arrival at Peshawar of the Silahdars Tukoji and others who were sent by Rao Malharji Holkar and Rao Jankoji Sindhiya."

In the body of the same news letter occurs the following passage :—

خبر رسیده که نرسوجی پندیت و توکوجی وغیره سلاحداران
فرستادهای راو ملهارجی هولکر و راو جنکوجی سندهیه که از پشاور
بموجب طلب میر حسن علی خان و خواجه میرزا خان عازم لاهور
شده بودند......

This means 'Received the news that Narsoji Pandit and Tukoji and other silahdars who were sent by Rao Malharji Holkar and Rao Jankoji Sindhiya and who as desired by

Mir Hasan Alikhan and Mirzakhan had left Peshawar for Lahore '............

The second news letter from which another extract is given below is dated 15th April 1759. The extract runs thus :—

خبر رسید کہ صاحبجی پٹیل از پشاور کوچ کردہ بصوبہ لاہور داخل شدہ توکوجی کھنڈوجی کدم وغیرہ سلاحداران راو ملہار جی و راو جنکوجی سندھیہ کہ دران جا اقامت می داشتند ملاقات نمودند

This means 'Received the news that Sahibji Patel (Sabaji Patil Shinde) after returning from Peshawar to the Subah of Lahore met Tukoji, Khandoji Kadam and other silahdars of Rao Malharji Holkar and Rao Jankoji Sindhiya, who were stationed there.'

These extracts need no more comment. That the importance of Attock as the key of the Punjab was understood by the Poona Darbar is evident from the following extracts. These extracts are taken from letters published in S. P. D. vols. 2 and 27. Letter No. 98 in vol. 2 contains the following.

नाहीं तर लाहोर प्रांते अमल बसलाच आहे पुढें आटकपावेतों जाऊन पैका मिळे तो करणें.

This means the control up to Lahore has been established. It should further be extended right up to Attock and money be collected. Letter No. 231 in vol. 27 contains the following extract :—

जनकोजी सिंदे यासी कागदपत्र आमच्या कागदाबराबर पाठवावे त्यांत मतलब तुम्ही पत्रदर्शनी दिल्लीस जाऊन रोहिल्याचे पारपत्य सत्वर करणें पुढें अंताजीपंत आहे परंतु तुम्ही सत्वर उपरालियास जाणें व लाहोरचा बंदोबस्त अटकपर्यंत खासा जाऊन करणें.

This means 'send an order to Jankoji that he must proceed against the Rohillas, defeat them and establish his control in Lahore subah by personally marching up to Attock'.

Thus it is clear that the Marathas realised the importance of holding Attock. It is also amply proved that the Marathas were masters of Attock at least for a period of four months. Therefore the claim made by the Maratha historians is not an ignorant boast as Sir Jadunath wants us to believe.

मंडळ–वृत्त

पाक्षिक सभा

ह्या पहिल्या तिमाहींत म्हणजे श. १८६५ चैत्र ते ज्येष्ठ महिन्यांत ६ सभा झाल्या. त्यांत पुढीलप्रमाणें निबंध–वाचन झालें.

पा.स.	निबंधलेखक	निबंध
१	श्री. शं. ल. वैद्य	(१) नोकर लोकांचे करारनामे
,,	श्री. कृ. वा. पुरंदरे	(२) श्रीतुकाराम महाराजांचा परिवार
,,	,, ,,	(३) आषाढपाटींचें सामान
,,	श्री. चिं. ग. कर्वे	(४) गणपतीस मूळ चिठी
,,	,, ,,	(५) मामलतीबद्दल लाच
,,	श्री. ग. ह. खरे	(६) कांहीं पत्रांच्या तारखा
,,		(७) कांहीं शिवकालीन कागद
२	श्री. शं. ल. वैद्य	(८) बाळंभट व विश्वनाथभट वैद्य यांचें रघूजी भोसले यांच्या व्यवहारासंबंधीं पत्र
,,	श्री. चिं. ग. कर्वे	(९) वाघे मुरळ्या
,,	श्री. शं. ना. जोशी	(१०) श. १६४६ कुतवळ पाटील सुपे यांजकडील चकनामा
३	श्री. ग. ह. खरे	(११) हिंगणे यांजकडील आणखी नवीं पत्रें
,,	श्री. शं. ल. वैद्य	(१२) थोटे पंतप्रतिनिधि यांचे लग्नसंबंधीं पत्रें
,,	श्री. शं. ना. जोशी	(१३) पुणें ते टोकें प्रवास, नाना फडणीस श. १७१२
४	श्री. शं. ल. वैद्य	(१४) नारायण बाबुराव वैद्य यांचीं नाना फडणीस व नबाब भेटीविषयीं लष्करांतून पत्रें
,,	श्री. शं. ना. जोशी	(१५) कोंकणांतील जकातीचीं ठिकाणें व तेथील इजारे
,,	,, ,,	(१६) कोंकणांतील महालानिहायचें उत्पन्न
५	श्री. य. रा. गुप्ते	(१७) थो. शिवछत्रपतींनीं बाजी मुरारास चंद्रराव मोऱ्यांच्या पथकांतून आपल्या पदरीं घेतलें
,,	,, ,,	(१८) मुरारबाजी पडल्यावर छत्रपति महाडास त्यांच्या स्त्रीस भेटण्यास गेले

पा.स.	निबंधलेखक	निबंध
„	श्री. य. खु. देशपांडे	(१९) अष्टादशभुजा दशमुखा महिषासुरमर्दिनी
„	श्री. चिं. ग. कर्वे	(२०) घोटवडे येथील खुर्द्यांची टांकसाळ
„	श्री. ग. ह. खरे	(२१) हिंगणे यांजकडील पत्रें
६	श्री. शं. ना. जोशी	(२२) वडू येथील शिवले दोख यांजकडील कागद
„	श्री. य. खु. देशपांडे	(२३) छत्तीसगड विभागांतील इ. १८२३ मध्यें झालेली शिलालेखासंबंधानें पाहणी
„	श्री. य. रा. गुप्ते	(२४) मुरारबाजी कोठें पडले? त्यांच्या खीस शिवछत्रपतींची देणगी

पुणें नगर संशोधन—पाक्षिक सभा

पा. स.	निबंधलेखक	विषय
५७–२८-४-४३	ल. ना. जोशी	(१) पेशवाईतील कांहीं आठवणी हप्ता ३
	चिं. ग. कर्वे	(२) ढेन्यांचें घर
	शं. ल. वैद्य	(३) गणपतराव थत्ते यांचें राघो सदाशिव थत्ते यांस अमृतनगराहून पत्र
५८–१२-५-४३	ल. ना. जोशी	(४) पेशवाईतील कांहीं आठवणी हप्ता ४ था व ५ वा
	चिं. ग. कर्वे	(५) कांहीं दस्तकें
५९–९–६–४३	ल. ना. जोशी	(६) पेशवाईतील कांहीं आठवणी हप्ता ६
	शं. ल. वैद्य	(७) कै. आप्पासो पेशवे यांच्या घरांची पेठवार यादी
	य. रा. गुप्ते	(८) धाकटे चिमणाजी आप्पा यांचे पुण्यांतील वाडे
	चिं. ग. कर्वे	(९) पत्रावळींचा हिशेब
६०–२३-६-४३	य. रा. गुप्ते	(१०) सोमवारांतील जुना बेलबाग
	चिं. ग. कर्वे	(११) शनिवारवाड्याभोवतींचीं घरें
		(१२) बुधवार पेठेचे कमाविसदार, तांबेकर, पुण्याचा जुना कोट, रात्रीची तोफ, एकबोटे वाडा, केदारेश्वर
		(१३) परांजपे यांची जागा पागेसाठीं खरेदी

ग्रंथालय

चैत्र शु. १ ते ज्येष्ठ वद्य ३० शक १८६५ अखेर मंडळास देणगी दाखल व अभिप्रायार्थ आलेल्या पुस्तकांची यादी.

ग्रंथकार	ग्रंथनाम	देणगी देणार
ओक वा. दा.	वामन पण्डितकृत कवितासंग्रह भाग २ रा (अपूर्ण)	नी. पां. ऊर्फ भय्या साहेब हिंगणें
गद्रे महेश्वर जनार्दन	गद्रे कुलवृत्तांत	गद्रे महेश्वर जनार्दन
गुर्जर जनार्दन महादेव	मनुस्मृति प्राकृत भाषांतरासह पृष्ठें १–६, ७७–११६ व २७७–३१६ (अपूर्ण)	नी. पां. ऊर्फ भय्या साहेब हिंगणें
देशपांडे वि. वि.	वारसा आणि विवाह	देशपांडे वि. वि.
नाइक ए. व्ही.	भुलेश्वर टेंपल् निअर यवत	नाईक ए. व्ही.
"	स्टडीज इन् दि नागार्जुनकोंडा	"
बानर्जी ए. सी.	पेशवा माधवराव फर्स्ट	बानर्जी ए. सी.
भिडे स. मो.	श्रीनृसिंहवाडीचा इतिहास व वर्णन	कुलकर्णी द. ए.
सांकलिया एच्. डी.	दि आर्कि ऑ लॉजी ऑफ् गुजरात (इन्क्ल्यूडिंग काठियावा)	सांकलिया एच्. डी.
सुबंध प्रऱ्हाद सीताराम	पासष्टीप्रदीप	जोशी शं. ना.
वुइल्किन्स चार्लस	ए ग्रामर ऑफ दि संस्कृत लँग्वेज	कुलकर्णी द. ए. (१८०८ इ.)

स्वीय व पुरस्कृत ग्रंथमाला

भा. इ. सं. मंडळ, पुणें	ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड ४ था (स्वीय)	
बेंद्रे वा. सि.	दंडनीति प्रकरणम्	स्वीय
भावे वा. भा.	श्रीशिवकाव्य (पुरस्कृत)	
शिरवळकर पं. बा.	किल्ले विशाळगड (पुरस्कृत)	

ग्रंथालयाकरितां खरेदी केलेलीं

राजकवि नथुराम सुंदरजी	श्रीझालावंशवारिधि
केतकर श्री. व्यं.	महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण
पंडित अयोध्यानाथ	ऑरिजिन् अँड् ग्रोथ ऑफ् दि हिंदी लँग्वेज अँड् इट्स् लिटरेचर
कर्नाडिस ब्राझ ए.	ए गाईड टु दि लइन्स ऑफ् बेसीन

नवीन सभासद शक १८६५

गेल्या तिमाहींत पुढील सद्‌गृहस्थ मंडळाचे नव्यानें सभासद झाले.

क्रमांक	सभासदाचें नांव	गांव	वर्ग
२२३२	श्री. शिवराम विष्णु मोडक	पुणें २	४ वार्षिक
२२३३	श्री. सिताराम नागेश दातार	पुणें २	४ वार्षिक
२२३४	श्री. रघुनाथ त्रिंबक महाजनी	पुणें २	४ वार्षिक
२२३५	श्री. एन्. डी. देवधर	हैद्राबाद द.	४ वार्षिक
२२३६	श्री. सखाराम कृष्ण केळकर	पुणें २	४ वार्षिक
२२३७	श्री. प्रल्हाद सिताराम सुबंध	पुणें १	४ वार्षिक
२२३८	श्री. गणेश लक्ष्मण ढेकणे	पुणें २	४ वार्षिक
२२३९	श्री. डी. एस्. सावरकर	पुणें २	४ वार्षिक
२२४०	श्री. चिंतामण निलकंठ जोशी हैद्राबाद (दक्षिण)	हैद्राबाद द.	४ आजीव
२२४१	श्री. भास्कर बळवंत भोपटकर	पुणें २	४ वार्षिक
२२४२	श्री विनायक महादेव कुळकर्णी	पुणें २	४ वार्षिक
२२४३	डॉ. वामन नारायण केळकर	पुणें २	४ वार्षिक
२२४४	श्री. लक्ष्मण केशव भागवत	पुणें ५	४ वार्षिक
२२४५	रा. ब. रामचंद्र केशव भागवत	पुणें ५	३ वार्षिक
२२४६	श्री. अनंत विश्वनाथ नाईक	पुणें २	३ आजवि

---

३० वें संमेलन आणि ३३ वा वाढदिवस

हे दोन्ही प्रतिवार्षिक समारंभ पूर्व सूचनेप्रमाणें वैशाख वद्य ११-१३ आणि आषाढ शु. १ ह्या दिवशीं बऱ्या प्रकारें साजरे झाले. सार्वत्रिक अनेक प्रकारच्या अडचणींमुळें बऱ्याच परस्थ मंडळींचें येणें घडलें नाहीं. तथापि त्यांचे निबंध वगैरे आले होते. दोन्ही प्रसंगीं वाचलेल्या निबंधांची यादी पुढें दिली आहे व प्रदर्शन, व्याख्यानें इत्यादि झालेला कार्यक्रमहि तेथें दर्शित केला आहे. नेहमींप्रमाणें ह्यांतील निबंधांचें वा ऐतिहासिक पत्रांचें प्रसिद्धीकरण मंडळ-त्रैमासिकाच्या द्वारें होईलच. कागदाची टंचाई व महर्गता जाचत आहे हें सांगणें नको.

संमेलनांतील दुसऱ्या दिवशीं म्हणजे वैशाख व. १२ रविवारीं सकाळीं मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. अध्यक्ष श्री. **र. चिं. सोहनी** हे होते. सभेंत शक १८६४ च्या इतिवृत्ताचें व आयव्यय पत्रकाचेंहि वाचन झालें. त्यासंबंधीं थोडी चर्चा व स्पष्टता झाल्यानंतर तें सर्वानुमतें संमत झालें. तेव्हांच शक १८६५ चें अंदाजपत्रकहि वाचून मान्य झालें आणि मागील अध्यक्ष, उपाध्यक्ष व हिशेबतपासनीस ह्यांची निवडणूक सर्वानुमतें मंजूर झाली. रा. ब. गो. स. सरदेसाई यांनीं आपल्या प्रदीर्घ इतिहासाभ्यासाची कांहीं टिपणें सभेंत खुलाशानें मांडलीं. ह्या गोष्टी विशेष उल्लेखनीय झाल्या. ह्या समारंभ–प्रसंगानें झालेल्या व्याख्यानांचे सारांश शक्य तर पुढील अंकीं देऊं

देणग्या

शक १८६४ ह्या वर्षीं मंडळास देणगी म्हणून मिळालेल्या पोथ्या; चित्रादि वस्तू.

श्री. **गदाधर आपाजी गोऱ्हे**, पुणतांबे, ४३५ पोथ्या

श्री. **गंगाधरशास्त्री भिकाचार्य** आणि **पिलाचार्य ऐनापुरे**, वाई, १ तैलचित्र व ६१८ पोथ्या

श्री. **रघुनाथ रामचंद्र लिमये**, वाई, १ जुनें चित्र व ४४ पोथ्या

श्री. **वा. सी. बेंद्रे**, पुणें, १ जुनें चित्र व १ फोटो.

श्री. **ल. ना. जोशी**, पुणें, ५२ मुद्रित दृश्यें, फोटो, चित्रें.

श्री. **य. रा. गुप्ते**, पुणें, १३ फोटो.

श्री. **मुरलीधर चतुरभुज लोहिया**, पुणें, ६ जुन्या तसबिरी.

श्रीमंत **तात्यासो पटवर्धन**, मिरज सं. चे राजे, २०४ गीतेचे अखंड ठसे.

क्यूरेटर **आशुतोष** म्यूझियम ऑफ इंडियन आर्ट, कलकत्ता, १२ फोटो प्रिंट्स्

श्रीमंत सरकार **संस्थान देवास** यांचे दरबारकडून 'जरीपटका'. पूर्वीं श्रीमंत सरकार **संस्थान भोर** आणि **इचलकरंजी** यांचेकडून जरीपटका, भगवा झेंडा, शिवंदी निशाण हीं संग्रहार्थ आलींच आहेत.

राव. **बाबासाहेब देशपांडे**–Escape of Shivaji from Agra, सुमारें ४०० प्रती.

या देणग्यांबद्दल मंडळ उपर्युक्त सद्गृहस्थांचे अतिशय आभारी आहे.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

तिसावें वार्षिक संमेलन-कार्यक्रम

दिवस १ ला-वैशाख वा। ११ शनिवार, ता. ८।५।४३ सकाळीं ८॥-१०॥

स्वागतपर भाषण—कार्याध्यक्ष प्रा.द.वा. पोतदार-बृहत्सूचीची आवश्यकता

संदेशकथन—चिटणीस श्री. चिं. ग. कर्वे

निबंधवाचन—

श्री. य. रा. गुप्ते (१) मानाजी आंग्र्यांची स्थापना कोणीं केली ? मानाजी आंग्र्यांचें जिवाजी खंडेराव चिटणीसांस पत्र

(२) डुबल, सालोखी, देश-चौगुले यांचें घराणें कऱ्हाडांत अदिलशाहीपासून नांदत आहे

श्री. शं. ल. वैद्य (३) परशरामभाऊ पटवर्धन व खर्ड्यांच्या लढाईच्या विजयाचें इंगित

श्री. वा. कृ. भावे (४) मराठवाडा व महाराष्ट्र

श्री. ह.ना.नेने (नागपूर) (५) दत्तात्रेयाविषयीं महानुभव पंथांतील प्रचलित माहिती

प्रदर्शन—श्री. शं. ल. वैद्य-प्रेक्षणीय मोडी बारीक अक्षराचीं व लहान पाकिटावर पत्ता लिहिलेलीं २ पत्रें. श्री. ग. ह. खरे-मिरीकर पोथ्यासंग्रह.

शनिवार-सायंकाळीं ५॥-७॥

निबंधवाचन—

श्री.दा.के.ओक(नागपूर) (६) कविवर्य मुक्तेश्वरांचा मृत्युशक

श्री. र. कृ. पाटणकर (७) कर्मयोगी जनक व त्याचा संप्रदाय

श्री. शं. ना. जोशी (८) यौवराज्याभिषेक विधि-मराठी बखर

डॉ. एम्. ए. चघताई (९) Study of some of the Persian Mss. found in the collection of the B. I. S. Mandala.

म. म. प्रो. वा. वि. मिरासी-(१०) कुमार वरदत्त राजाचा गुंजी येथील प्रस्तर-लेख. (नागपूर)

श्री. चिं.ब.लेले-धार सं.(११) राणी मैनाबाई

दिवस १ रा–वैशाख वा११रविवार,ता.३०।५।४३ वेळ सकाळीं ८॥–१०॥

मंडळाची वार्षिक साधारण सभा—(१) मागलि साधारण सभेचें वृत्तान्त वाचन; (२) शक १८६४ चें वार्षिक कार्यवृत्त–कथन व आयव्यय पत्रक आणि (३) शक १८६५ चें अंदाजपत्रक, यांना मंजुरी.

प्रदर्शन—श्री. **चिं. ग. कर्वे**–प्रेक्षणीय विविधाकृति–आडकित्ते, पळ्या व
४५ १७
वज्र्या. श्री. **दि. गं. केळकर**–संग्रह.
१८ गणपती ९

रविवार–सायंकाळ वेळ ५॥–७॥

निबंधवाचन—

श्री. शं. ना. जोशी (१२) 'श्रीकार' = महाराष्ट्रराज्यांतील सरदारादिकांचीं दैवतें
श्री. ग. ह. खरे (१३) हिंगणे दप्तरांतील कांहीं महत्त्वाचीं पत्रें

व्याख्यान—श्री. **द. वि. आपटे**, बाळाजी बाजीराव तथा नानासाो पेशवेकालीन राजकारण

दिवस २ रा–सोमवार, वैशाख वा १३ दि. ३१।५।४३ सकाळ ८॥–१०॥

निबंधवाचन—

श्री. **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव** (१४) महाराष्ट्रवसाहतीची प्राचीनता
श्री. **चिं. ग. कर्वे** (१५) पुणें शहराचा म्युनिसिपालिटीपूर्वीचा कारभार
प्रो. **प. कृ. गोडे** (१६) दाराशुकोहकृत समुद्र–संगम
श्री. **भा.रा.भालेराव**(ग्वालेर) (१७) खर्ड्याच्या स्वारीचा मुहूर्त सांगणारा ज्योतिषी गौरी शंकर जोशी दिल्लीकर

प्रदर्शन–शं. ना. जोशी–एक पोथी ताडपत्री. भगवद्गीता, तंत्रग्रंथ व न्यायशास्त्रांतील एक ग्रंथ–लिपी देवनागरी **पांगारकर** संग्रह.

दिवस २ रा–सायंकाळ वेळ ५॥–७॥

निबंधवाचन—

श्री. **र. कृ. पाटणकर** (१८) श्रीमत्याज्ञवल्क्य गीतोपनिषद्: आणि याज्ञवल्क्य–सहधर्मिणी
श्री. **श्री. शा. हणमंते** (१९) हणमंते घराण्याविषयीं अधिक माहिती
श्री. **लक्ष्मणराव झाशीवाले** (२०) झाशीच्या राणीची चित्राचीकित्सा चर्चा

श्री. वि. अं. कानोले (२१) मुकुंदराजांच्या अंबा नगरीसंबंधीं थोडा निर्णायक खुलासा.

समारोप

ह्याशिवाय, श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं मुद्रांची-म्ह. शिक्के व मोर्तब यांच्या सूचीचें काम चालविलें आहे त्याची, माहिती सांगितली. रा. ब. सरदेसाई यांनीं आपलीं अभ्यासाचीं टिपणें सभेपुढें मांडलीं.

प्रा. द. वा. पोतदार यांनीं गोखले व खांबटे (केळशी) यांचे संग्रहांतील 'रामदास चरित्र हस्तलिखित, लेखन काल श. १७५२ ' भेट म्हणून दिलें.

तेहतिसावा वाढदिवस कार्यक्रम

शनिवार आषाढ शुा १ शक १८६५ ता. ३।७।४३

सकाळीं ७॥ ते १०॥ मंगलवादन-चौघडा, सनई ७॥-८॥

प्रो. पोतदार-स्वागतपर प्रास्ताविक भाषण. **दंडनीति व श्रीशिवकाव्य यांचें प्रकाशन**

निबंधवाचन—

श्री. य. रा. गुप्ते (१) खंडो बल्लाल चिटणवीस यांच्या स्त्रीचें पादोदक थो. शाहू छ. नीं आपल्या राण्यांस घ्यावयास सांगितलें.-श्रीमंत पोतनवीस यांचेकडील बखरींतील उतारा.

(२) शिवाजी नगरांत शिवाजी-श्रीमंत पोतनिसांकडील बखरींत उल्लेखिलेला थो. शिवछत्रपतींचा शाइस्तेखानावरील हल्ला (छापा).

(३) चंद्रराव मोरे बखरींतील दुरुस्त्या, शब्दांवर टीपा, त्यांचे व वंशजांचे उल्लेख व त्यांच्या मुली.

प्रा. द. वा. पोतदार (४) कोंकणांतील परांजपे खोत यांजकडील कागद.

(५) मुऱ्हा रायरेश्वर=शिवाजीमहाराजांच्या शपथेची भूमी.

श्री. शं. ना. जोशी (६) देशमुखी वतन.

प्रदर्शन—श्री. चिं. ग. कर्वे–पेशवाईतील वस्त्रें, श्री. केळकर–संग्रह.
—श्री. बा. बा. राजेघोरपडे–पौराणिक प्रसंगावरील ३०-४० चित्रें

सायंकाळ ५–८

निबंधवाचन—

श्री. चिं. नी. जोशी (७) ज्ञानदेवाचें गीतासार.
डॉ. वि. गो. दिघे (८) दाभोळकर संग्रहांतील पत्रें.

सायंकाळीं ६॥

व्याख्यान— डॉ. रा. ग. हर्षे–संशोधित पोथ्यांचें शास्त्रीय संपादन.
अध्यक्ष–डॉ. श्री. कृ. बेलवलकर.

रात्रीं १० वाजतां–

कीर्तन–राष्ट्रीय कीर्तनकार श्री. कोल्हटकरबुवा. विषय–शिवाजी महाराजांची शेवटची स्वारी.

रविवार ता. ४।७।४३

सायंकाळ ६॥–८

व्याख्यान—प्रो. गोपाळचारी (स. प. कॉ.)–दक्षिणेंतील शिल्प.
अध्यक्ष–डॉ. सांखळिया, डेक्कन कॉलेज.

भेटी

श्री. केळकर–डहाणू, श्री. खंडकर–इंदूर, श्री. दाते–बारामती, श्री. ह. मा. वायचल, श्री. मुळे–पुणें, श्री. भा. र. गोविलकर–खांडवा, श्री. पटवर्धन–मिरज, श्री. फणसळकर–सातारा, श्री. बापट वकील–उमरावती, श्री. पुरंदरे पोलीस इन्स्पेक्टर–पुणें, श्री. संघी–डाय. शु. मिल्स गोरखपूर, श्री. मायदेव, डॉ. पोपटलाल, एम्. एल्. ए.–कराची.

श्री

भारत–इतिहास–संशोधक मंडळ, पुणें

कारभारी वृत्तांत

(शक १८६४)

प्रास्ताविक–मिति चैत्र शुद्ध १ ते फाल्गुन वद्य ३० शक १८६४ या तेरा महिन्यांतील (या सालांत अधिक महिना होता) मंडळाचा वृत्तांत थोडक्यांत सादर करीत आहों. त्रैमासिकांतून मंडळाच्या कारभाराची विशेष माहिती देण्यांत येतच असते. तेव्हां हा वृत्तांत त्रोटकच देत आहों.

दुखवटा–या सालांत जे सभासद कालवश झाले त्यांच्यासंबंधीं दुखवटा कारभारी मंडळाच्या सभांतून वेळोवेळीं केलेलाच आहे. प्रि. महादेव रामचंद्र परांजपे, रा. सा. विष्णु नारायण वर्तक, रा. ब. वा. शि. तोरो, डॉ. न. गो. सरदेसाई, डॉ. वि. सी. सुकथनकर, रा. वि. पां. नेने, प्रो. नी. बा. भवाळकर, प्रो. श्री. नी. चाफेकर, रा. या. मा. काळे, रा. ब. बाम्बर्डेकर या प्रसिद्ध व मंडळाशीं विशेष संबंध असणाऱ्या सभासदांचा येथें विशेष उल्लेख करणें जरूर आहे. त्यांच्या निधनामुळें मंडळाची मोठीच हानी झाली आहे.

सभासद–या वर्षारंभीं मंडळाचे एकंदर आठशें पासष्ट सभासद होते. अहवालाच्या सालीं वार्षिक सभासद सत्तावन व आजीव सभासद तीस मिळून सत्त्याऐंशीं सभासद मिळाले; तथापि राजीनामे व मृत्यु यांमुळें चोवीस सभासद जुन्यापैकीं कमी झाले. नवीन सभासद मिळविण्याचे कामीं कचेरीनें खटपट केली त्याप्रमाणेंच विशेष खटपट श्री. शंकर लक्ष्मण वैद्य यांनीं केलेली आहे. त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

कचेरी–कचेरीचे कामाची वाढ जास्त जास्त होत आहे. पत्रव्यवहार बराच करावा लागतो व ऑडिटर दरमहा हिशेब तपासत असल्यानें ते तयार ठेवावे लागतात. तेव्हां कधीं कधीं जादा कारकून लावून काम उरकण्यांत येत असतें. दप्तरखाना खातें व संशोधनखातें यांनाहि कचेरीकडून साहाय्य देण्यांत येतें.

दप्तरखाना व संशोधन–दप्तरखान्याकडे या सालीं विशेष लक्ष देण्यांत येऊन कारभारी मंडळांतील श्री. रु. वा. पुरंदरे यांच्याकडून शिलकीं दप्तरें तपासून लावून घेतलीं. या कामीं श्री. पुरंदरे यांचा फार उपयोग होतो. चिंचवड संस्थान, तुळशीबागवाले, नगरकर इत्यादिकांकडून नवीन आलेले हजारों कागद आहेत. जुने मंडळांत आलेलेहि अद्यापि तपासावयाचे शिल्लक आहेत. तेव्हां पुरंदऱ्यांप्रमाणें आणखीहि संशोधक हवेच आहेत. दप्तरखान्यास व ग्रंथसंग्रहास जागा आतां कमी पडू लागली आहे. तेव्हां मंडळांत व कांहीं तरतूद करणें अत्यावश्य होऊन बसलें आहे. मंडळामागील जागेवर दप्तरखान्याची नवी इमारत लवकर व्हावी अशी इच्छा आहे. मंडळांतील श्री. शं. ना. जोशी व श्री. ग. ह. खरे यांचें नेहमींचें संशोधन-कार्य अव्याहत चालूच आहे. अभ्यासूंना मदत करणें, शिक्षक विद्यार्थ्यांना माहिती देणें, बाहेरून कागदपत्रें व वस्तू मिळवून आणणें या आतां नित्याच्याच गोष्टी झाल्या. मंडळाबाहेरचे संशोधक म्हणजे श्री. शां. वि. आवळसकर, श्री. बा. बा. राजे घोरपडे, श्री. चिपळुणकर वगैरे होत. यांचा व्यासंग वाखाणण्याजोगा आहे. मंडळाचे जुने मुनशी हे फारशी कागदांच्या नकला करतात. मंडळांतील आलेल्या पोथ्यांची पत्रसूची श्री. खरे हे करीत आहेत. तिचा संस्कृत–मराठी वाङ्मय अभ्यासकांस फार उपयोग आहे.

पाक्षिक सभा-संमेलन-वाढदिवस–यांसाठीं मंडळांतील संशोधकांना निबंध टांचणें तयार करावीं लागतात. अहवालाच्या सालीं साधारण पाक्षिक सभा अठरा झाल्या व नगर–संशोधन सभा एकोणीस झाल्या. दोन्ही मिळून १६० निबंध–टांचणें वाचण्यांत आलीं. यांतील निबंध ठराविक क्रमाप्रमाणें त्रैमासिकांतून खंडवार प्रसिद्ध होत असतात.

त्रैमासिक व प्रकाशनें–त्रैमासिकाचें जुनें स्वरूप बदलून शिवचरित्रात्मक, संकीर्ण ऐतिहासिक, संकीर्ण वाङ्मयीन अशा पद्धतीनें सभा–सम्मेलनांतून आजवर वाचलेल्या निबंधांचें वर्गीकरण करून त्याप्रमाणें एकेक त्रैमासिक स्वतंत्र खंड म्हणून प्रसिद्ध केला जातो. यामुळें सर्व जुन्या प्रकाशण्यास योग्य अशा निबंधांना प्रसिद्धि मिळते व सभासदांच्या हातीं दर तीन महिन्यांनीं एक भरीव पुस्तक पडतें. हा उपक्रम चांगला असल्याबद्दल बऱ्याच सभासदांनीं कळविलें आहे. या पद्धतीनें चालू सालीं शिवचरित्र–साहित्य खंड आठवा व ऐतिहासिक–संकीर्ण–साहित्य–खंड चौथा व संकीर्ण–वाङ्मय–साहित्य खंड पहिला प्रसिद्ध झाला. मंडळाचे एक नाणावलेले संशोधक श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं संपादिलेला केशवपण्डिताचा **दण्डनीति** हा शिवकालीन न्यायशासनपर स्वतंत्र संस्कृत ग्रंथ स्वीय–ग्रंथमालेंत प्रसिद्ध होत आहे. पुरस्कृत -ग्रंथमालेंत पुरुषोत्तम कवीकृत **श्री शिवकाव्याचें मराठी पद्यात्मक भाषांतर** लवकरच प्रसिद्ध होत आहे. यंदां सरकारी मदत अपेक्षेपेक्षां फार कमी आली. पुढील सालीं असें होऊं नये याबद्दल तजविजींत आहों.

संमेलन–वाढदिवस-समारंभ–हीं सालाबादप्रमाणें व्यवस्थित पार पडलीं. यांची हकीकत त्रैमासिकांतून दिलेली सांपडेल. राजवाडे–दिनाच्या प्रसंगानें डेक्कन कॉलेजचे डॉ. सांखळिया यांचें व्याख्यान झालें. व्याख्यानाचा सारांश गेल्या त्रैमासिकांत दिला आहे.

ग्रंथसंग्रह–अहवालाच्या सालीं २७६ नव्या पुस्तकांची भर पडली. मंडळांत पुस्तकें वाचावयास सभासदांखेरीज बरीच मंडळी येतात. वाचनालयाचा उपयोग सार्वजनिक होतो. पुढील सालीं इतिहासावरचीं इंग्रजी व इतर भाषांतील नवीं पुस्तकें घेणें जरूर आहे. तेव्हां अंदाजपत्रकांत तशी तरतूद ठेवली आहे.

कारभारी सभा व उपसमिती–कारभारी मंडळाच्या सभा दरमहा ठराविक दिवशीं भरत असतात व मंडळाचा कारभार सभेच्या आदेशाप्रमाणें चालतो. जरूर तेव्हां उपसमित्यांच्या बैठकी होतात.

प्रचार–प्रा. पोतदार व श्री. खरे हे त्रावणकोर येथें नाताळांत भरलेल्या Indian Historical Records Commission च्या बैठकीस उपस्थित होते. वाटेंत त्यांनीं बरीच ऐतिहासिक माहिती गोळा करून ती मंडळापुढें ठेविली. श्री. खरे व श्री. जोशी हे संशोधनासाठीं कांहीं गांवीं गेले होते.

आयव्यय–यासंबंधीं तक्ते पुढें दिलेलेच आहेत. जमेंत अंदाजापेक्षां १२७२ रु. ची वाढ आहे. याचें कारण नवीन सभासद वर्गणी ९०० रु. नीं अधिक आली व देणगींत १८५ रु. ची वाढ झाली. मुंबई सरकार, पुणेंनगरपालिका, चिंचवड संस्थान, व धारच्या श्री. उमाबाई लेले यांचे त्यांनीं दिलेल्या देणग्यांबद्दल मंडळ फार आभारी आहे. चालू सालीं अंदाजापेक्षां खर्चहि कमी झाला. विमानहल्ला–प्रतिबंधासाठीं ५०० रु. ची तरतूद केली होती. पण त्यासाठीं १६ रु. ८ आ. इतकाच खर्च करून भागविलें. ग्रंथालयाकडे फारसा खर्च केला नाहीं. पण तो यंदा करावा लागेल. याप्रमाणें खर्च जरूर तेवढाच करून शिल्लक उरविली आहे. तिचा विनियोग पुढील सालासाठीं होईल.

अंदाजपत्रकाचा खुलासा–यांत बराच खर्च वाढलेला दिसेल, पण तो देणग्या, नवीन सभासद व काटकसर यांयोगें भरून निघेल असा विश्वास वाटतो. खर्चाची वाढ जी दिसत आहे त्याला कारणें म्हणजे पुढील सालीं इंपीरियल रेकॉर्डच्या मराठी कागदांचा खंड, हिंगणे दप्तर व इतर एक दोन प्रकाशनें यांसाठीं छपाईचा खर्च जास्त होईल. प्रदर्शन–विभाग व ग्रंथालय यांवर नवीन खर्च करणें जरूर झालें आहे. मंडळाच्या इमारतींत थोडी किरकोळ वाढ व दुरुस्ती करावयाची आहे. मोठमोठे देणगीदार मिळवावयाचे झाले तर प्रवास व सत्काराचा खर्च करणें प्राप्तच आहे. तो बुडीत खर्च नव्हे. त्याप्रमाणें कांहीं नैमित्तिक सभा–समारंभ

करावे लागतात. तेव्हां तो खर्च वाढला. मंडळाच्या कार्याला आंतली आहे ही जागा, कमी पडते. तेव्हां मंडळानें बाहेरची आपली जागा जी नोकरांना राहण्यास मोफत दिली आहे ती खाली करून घेऊन या मंडळींना दुसरी भाड्याची जागा घेण्यासाठीं मदत म्हणून कांहीं दरमहा भत्ता द्यावा लागेल. तो खर्च या अंदाजपत्रकांत धरला आहे. याप्रमाणें शक १८६५ चा खर्च आठ हजारांवर गेला आहे. पण तो करणें मंडळाच्या कार्यक्षमतेसाठीं जरूर आहे.

आभार–ज्यांचें ज्यांचें चालू सालीं मंडळाला साहाय झालें त्या सर्वांचे नामनिर्देश न करतां आभार मानतों. मंडळाचे कित्येक वर्षांचे हिशेब–तपासनीस श्री. ग. स. मराठे हे या सालीं निवृत्त झाले. व त्यांचे जागीं गव्हर्मेंट सर्टिफाइड ऑडिटर श्री. गो. द. आपटे यांची कारभारी मंडळानें योजना केली. या दोघांचे मंडळ फार ऋणी आहे.

याप्रमाणें हें शक १८६४ चें इतिवृत्त व जमाखर्च कारभारी मंडळानें मंजूर केलेले सादर करीत आहों.

वैशाख शुद्ध १ शक १८६५

गं. ना. मुजुमदार,
चिं. ग. कर्वे,
चिं. ब. जोशी,
चिटणीस

आयव्यय व अंदाजपत्रक

शके १८६४ जमा

शक १८६४ अंदाज	खातें नांव	प्रत्यक्ष जमा रु.	आ.	पै	श. १८६५ अंदाज
२२००	वर्गणी	३०९५	१०	०	२५००
५१	त्रैमासिक	५४	०	०	५१
२३००	सरकारी देणगी	१५००	०	०	३०००
	इतर देणगी	९८५	०	०	२५००
२५०	मंडळ ग्रंथविक्री	२४३	८	३	२५०
२५	विक्रयालय	४४	५	९	३०
१००	टपाल	८६	४	९	१००
७३५	व्याज	७४९	६	११	७५०
२०	शिलकी सामान	४०	०	०	२०
०	अनामत	१००	०	०	०
०	ग्रंथालय	२	१०	०	०
०	मंदीर	४४	०	०	१०
०	नोकर कर्जफेड	१५	०	०	५०
२०	किरकोळ	०	०	०	२०
२५	तसलमात	२५	०	०	०
०	चित्रखातें	[illegible]०	०	०	१०
०	मुद्रणखातें	[illegible]०	०	०	०
२-९-३	इनकमटॅक्स	[illegible]०	०	०	०
५७२८-९-३		[illegible]८४	१३	८	९२९१

१९४६८।१५।० अव्वल शिल्लक

२६९५३।१२।८ एकूण जमा

शके १८६४ खर्च

शक १८६४ अंदाज	खातें नांव	खर्च प्रत्यक्ष रु.	आ.	पै	श. १८६५ अंदाज
६०	चित्र	०	०	०	६०
७५०	क[illegible]	७५१	७	३	८००
४७५	ग्रंथ[illegible]य	३५१	१२	३	५००
२००	टपाल	२५९	११	३	२५०
११०	भाडेपट्टा	६३	२	०	६५
२५०	मंदीर वि[illegible]	३४१	१०	०	८००
२४३-१४-३	विक्रयालय कार[illegible]	५५	२	६	१०
७५	कागदवाहा	७१	५	६	१००
१५००	मुद्रण	२१०५	१४	०	३०००
०	नोकर कर्ज	६५	०	०	०
०	नगर संशोधन	५	१०	९	१०
०	ग्रंथ खरेदी	२५९	०	०	०
०	इनकमटॅक्स	२	९	३	०
०	शिवाय खातें	६०	६	०	०
१६०	वीज	१६७	८	०	१५०
७५	शिलकी सामान	५६	३	६	७५
६०	समारंभ	१०७	१५	०	४००
८५०+३००†	दप्तरखाना	११८५	११	३	१३२५
२०	[illegible]रकोळ	२३	९	६	२५
१०००	[illegible]शोधन खातें	१०१०	११	६	११२५
२५	[illegible]न	५६	३	०	५००
९	[illegible]न	८	१२	११	९
५८६२-१४-३		७००९	५	५	९२०४

११९४४—७—३ अ. शिल्लक

२६९५३-१२—८ एकूण

वरील जमाखर्च तपासून पाहिले व ते बरोबर आहेत.

ता. २९-४-४३

गो. द. आपटे
गव्हर्मेंट सर्टिफाईड ऑडिटर

† पुरवणी म्हणून कारभारी मंडळानें मंजूर केलेले.

भारत—इतिहास—संशोधक—मंडळ—स्वीय [illegible]थमाला

* ह्या खुणेचे ग्रंथ मुंबई सरकारानें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयासाठीं मंजूर केले आहेत. ‡ हें पुस्तक शैक्षणिक (training) संस्था व शिक्षक-ग्रंथालयें यांसाठीं मंजूर झालें आहे. त्रैमासिकाच्या फु[illegible]क अंकास रु. १॥

१ अहवाल (शके १८३२) ३
२ „ (शके १८३३) ५
३ सुवंत विचार(कै.वि.का.राजवाडे)१०
४ वार्षिक इतिवृत्त (शके १८३४) ५
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (कै.वि.का.राजवाडे)१ा८
*६ प्रथम संमेलन वृत्त (शके १८३५)ा१२
*७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३५) ६
*८ द्वितीय संमेलन वृत्त (शके १८३६)३
*९ वार्षिक इतिवृत्त (शके १८३६) ३
*१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) ३
*११ वार्षिक इतिवृत्त (शके १८३७) ६
*१२ तृतीय संमेलन-वृत्त(शके १८३७)३
*१३ मुकुंद—महाभाष्य (संस्कृत) ा८
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ा८
*१५ स्फुट प्रकरणें भाग १ ला ा१२
*१६ स्फुट प्रकरणें भाग २ रा ा१२
***मंडळ—त्रैमासिक** प्रत्येक पुस्तक ३
*१७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३८) ३
१८ चतुर्थ-संमेलन-वृत्त (शके १८३८)३
*१९ राजवाडे-खंड-स्थलसूची ४
*२० पंचम संमेलन-वृत्त (शके १८३९)३
२२ चंद्रचूड—दप्तर—कला १ ३
२३ महाराष्ट्र—सारस्वत (संपलें) १०
२४ षष्ठ संमेलन-वृत्त (१८४०) ४
२५ सप्तम संमेलन-वृत्त (१८४१) ३
२६ संशोधकाची छोटी जंत्री ा४
२७ प्रदर्शन परिचय ा४
*२८ फारसी पत्रव्यवहार ५
२९ फार्सी—मराठी कोश ४
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला १ा८
३१ Historical Miscellany १

३२ पुरंद[illegible] भाग १ ४
३३ शिवचरित्रसाहित्य खं. २ रा ४
३४ [illegible]सि[illegible]ा मध्ययुगीन इतिहासा[illegible] साध[illegible]ड १ ला २
३५ ऐति[illegible]सिक संकी[illegible] साहित्य खं.१,२
३६ [illegible]ाराम—चरितम् १ा८
३[illegible]डळांतील नाणीं १
[illegible] शिवचरित्रसाहित्य खंड ४ १ा८
३९ गोवळकोंड्याची कुत्वशाही रु. ४
†४० ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ ला. १ा८
†४१ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड २ रा. २
†४२ [illegible]हासिक संकीर्ण सा.खंड २ १ा८
४३ [illegible]ळ चित्र ग्रंथ चित्रें २० ा८
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह खं.३ २॥
‡४५ विजयनगर स्मारकग्रंथ ४
†४६ ऐतिहासिक फारसी सा.खंड २ १ा८
४७ शिवच[illegible]साहित्य खं. ६ १ा८
†४८ मरा[illegible]ा सत्तेचा उत्तरेकड[illegible]स्तार ा१२
४९ शिवच[illegible]त्तसंग्रह कानडी वि[illegible] १
५० शि[illegible]त्रसाहित्य खंड ७ १ा८
†५१ ऐ[illegible]सिक फार्सी साहित्य खंड ३ १ा८
५२ } शिवचरित्रवृत्तसंग्रह २ व ३ रा
†५३ } खंड : फार्सी विभाग प्रत्येकी १ा४
५४ पुणें नगर संशोधन—वृत्त खंड १
५५ शिवचरित्रसाहित्य खंड ८ १ा८
५६ ऐ. संकीर्ण साहित्य खंड ४ २

टीप—ट. ह. व बंगी, व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. † हा ग्रंथ त्रैमासिकांत भागशः प्रसिद्ध झाला आहे. ४०-४२,४६,४८,५१,५३ स्वतंत्रहि मिळतात.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

छापत आहे

य ग्रंथमाला क्र. ५८

लीन केशव पंडितकृत

नीति

संपादक

रा. सि. बेंद्रे

पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ३८

शिवकाव्य

त्तम पंडितकृत

संस्कृत शिवकाव्याचें मराठी पद्यमय भाषांतर

प्रस्तावना-द. वि. आपटे

काव्यविवेचन-शं. ना. जोशी

सार्थ ज्ञानेश्वरी

श्री नेश्वरी टीका

सह (राजवाडे प्रत)

पृ. ०४ : किं. रु. १०

लेखक : कै. ग. कृ. आगाशे

बी. ए. एल्‌एल्. बी.

(माजी कारभारी सं. मिरज)

विवेचक प्रस्तावना, विषयसूची, शब्दार्थ चर्चा, इत्यादिसह